रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड | शुक्रवार । दि. २६ जून २०२६ । अंक २० । पृष्ठे १० । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** राज्यात पुढील २४ तासांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असून, हवामान विभागाने २६ जूनसाठी २३ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, धुळे, जालना, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती आदी जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसाचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणात छापेमारी

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळासारखे दिसणारे बनावट संकेतस्थळ तयार करून नागरिकांना 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली जाळ्यात ओढणाऱ्या सायबर फसवणूक टोळीविरोधात सीबीआयने देशव्यापी कारवाई केली आहे. 'ऑपरेशन चक्र-६' अंतर्गत १६ राज्यांतील ८० ठिकाणी छापे टाकून या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला. सीबीआयने या मोहिमेसाठी ६० विशेष पथके तैनात केली होती. पंजाब, गुजरात, आसाम, मणिपूरसह विविध राज्यांमध्ये एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईदरम्यान चेन्नई येथील बी. नरेश आणि कोलकाता येथील संजीव साहा या दोन आरोपींना अटक करण्यात आली.

## वे|ध|क

### औषधांवर क्यूआर कोड अनिवार्य

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या औषधांवर आळा घालण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता लसी, प्रतिजैविके, कर्करोगावरील औषधे तसेच मादक व मनोविकारांवरील औषधांवर क्यूआर कोड किंवा बारकोड लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने औषध नियम १९४५ मध्ये सुधारणा करून या नियमाची व्याप्ती वाढवली आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर औषधाचे नाव, उत्पादक कंपनी, बॅच क्रमांक, उत्पादन व समाप्ती तारीख यासह संपूर्ण माहिती ग्राहकांना पाहता येणार आहे. सरकारच्या मते, या निर्णयामुळे बनावट औषधांची ओळख पटविणे सोपे होईल तसेच औषधांच्या पुरवठा साखळीवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवता येईल. नवीन नियम १ जुलै २०२७ पासून लागू करण्यात येणार आहे.

# 'राम-लखन'ला शेकापचा अल्टिमेटम

**पाच दिवसांत काम पूर्ण करा, अन्यथा काळं फासू**

**चित्रलेखा पाटील यांचा इशारा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पुलाचे काम अद्याप अपूर्ण असतानाच नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेला पर्यायी बंधारा पहिल्याच मुसळधार पावसात वाहून गेला. परिणामी, देहेन आणि भाकरवड या दोन्ही गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला असून, ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी गुरुवारी (दि.२५) घटनास्थळी भेट देऊन पुलाची पाहणी केली. यावेळी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर आणि ज्यांची नावं गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहेत, अशा राम आणि लखन या ठेकेदारांवर जोरदार टीका केली.

पाच दिवसांच्या आत पर्यायी पुलाची किंवा वाहतुकीची सुरक्षित व्यवस्था करण्यात यावी, अन्यथा शेकापच्यावतीने बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तसेच लोकांना वेठीस धरणाऱ्या अधिकाऱ्यांना काळे फासण्यासही आम्ही मागे-पुढे पाहणार नाही, असा आक्रमक पवित्रा त्यांनी यावेळी घेतला.

कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिकांना सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. पुलाचे काम रखडले, पर्यायी बंधाराही वाहून गेला, मग जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करत चित्रलेखा पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाचा निषेध केला. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा निष्काळजी कारभाराला शेकाप •> पान ५ वर





### 'लखन'च्या मागचा 'राम' कोण?

हिंदी चित्रपटातील 'राम-लखन'ची जोडी सर्वांनाच माहिती आहे. सध्या देहेन-भाकरवड पुलाच्या कामानिमित्त अशाच एका 'राम-लखन' जोडीची चर्चा परिसरात रंगली आहे. या पुलाचे काम लखन नामक ठेकेदार करीत असल्याची माहिती आहे. परंतु, मुख्य ठेकेदार वेगळाच आहे. वाहून गेलेल्या पुलाची जबाबदारी घेण्याऐवजी, लखनच्या मागे उभे राहण्याऐवजी हा राम मैदान सोडून पळून गेल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे हा 'राम' म्हणजेच मुख्य ठेकेदार नक्की आहे तरी कोण? याविषयीच्या चर्चांना उधाण आले आहे.

> देहेन-भाकरवडच्या नागरिकांना वेठीस धरण्याचा अधिकार कोणालाही नाही. पुलाचे काम दहा महिने रखडले, पर्यायी बंधारा पहिल्याच पावसात वाहून गेला आणि दोन गावांचा संपर्क तुटला. हा केवळ निष्काळजीपणा नसून, नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे. पाच दिवसांत सुरक्षित पर्यायी व्यवस्था उभी राहिली नाही तर शेकाप रस्त्यावर उतरेल. जबाबदार अधिकारी आणि संबंधितांवर कारवाई झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.
>
> – चित्रलेखा पाटील, प्रवक्त्या, शेकाप

# म्हसळ्याचे ग्रामीण रुग्णालय 'आजारी'




■ सात महत्त्वाची पदे रिक्त; रुग्णांचे हाल

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याचा आधार असलेल्या ग्रामीण रुग्णालयाची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली असून, मनुष्यबळाच्या तीव्र टंचाईमुळे रुग्णालयच 'आजारी' पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांची अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून, त्याचा थेट फटका सर्वसामान्य रुग्णांना बसत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हसळा ग्रामीण रुग्णालयात एकूण २५ पदे मंजूर आहेत. मात्र, त्यापैकी वर्ग-१ आणि वर्ग-२ अधिकाऱ्यांसह एकूण सात महत्त्वाची पदे रिक्त असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, आवश्यक मनुष्यबळाविना रुग्णालयाचा कारभार चालविण्याची वेळ प्रशासनावर आली आहे.

विशेष म्हणजे, दंतशल्य चिकित्सक, स्त्रीरोग तज्ज्ञ, फिजिशियन आणि अस्थिरोग तज्ज्ञ (ऑर्थोपेडिक) यांसारखी अत्यंत महत्त्वाची पदे रिक्त असल्याने रुग्णांना तज्ज्ञ •> पान ५ वर

### विवाहासाठी सवलतीत एसटी

**मुंबई :** शेतकरी कुटुंबांना लग्नसमारंभ व अन्य शुभकार्यांसाठी सवलतीच्या दरात एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत केली. शेतकरी कुटुंबांनी मागणी केल्यास एसटी बस त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करत त्यांचे परवाने रद्द करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. राज्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी ८,३०० नवीन एसटी बस खरेदी करण्यात येत असून, त्या टप्प्या-टप्प्याने सेवेत दाखल होत आहेत. काही मार्गांवर एसटीची वारंवारता वाढविण्याबरोबरच रस्ते सुरक्षेसाठी विशेष उपाययोजनाही करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# कुरुळजवळ अपूर्ण रस्ता ठरतोय जीवघेणा

**एमएसआयडीसीच्या कारभारावर अवधूत पाटील यांचा संताप**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळ (एमएसआयडीसी) यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या अलिबागसहाण बायपास रस्त्याच्या कामातील हलगर्जीपणाचा फटका आता थेट वाहनचालक आणि प्रवाशांना बसू लागला आहे. कुरुळ परिसरातील सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण अवस्थेत असून, त्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच या रस्त्यावरील धोकादायक स्थिती उघड झाली असून, संबंधित यंत्रणा मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर शेकापचे युवा नेते अवधूत पाटील यांनी एमएसआयडीसीच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे.



अलिबाग-सहाण बायपास रस्ता हा कोट्यवधी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात असला तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कामे अपूर्ण अवस्थेत पडून आहेत. त्यामुळे रस्त्याचा वापर करणाऱ्या वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः कुरुळजवळील भागात रस्त्याचे काम अर्धवट सोडण्यात आल्याने वाहनचालकांसमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोर •> पान ५ वर

# दि.बांच्या नावासाठी शेकाप आक्रमक

**|| रश्मिता पोपेटांच्या आमरण उपोषणाला नवे बळ || बाळाराम पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या रश्मिता पोपेटा यांच्या आमरण उपोषणाला आता राजकीय आणि सामाजिक स्तरावर मोठा पाठिंबा मिळू लागला आहे. शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून, त्यामुळे दि.बा. पाटील नावाच्या लढ्याला नवे बळ मिळाले आहे. शेकापचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार बाळाराम पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देत सरकारने याप्रश्नी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.




### समाज बांधवांचा वाढता सहभाग

उपोषणस्थळी शेकापचे खजिनदार अतुल म्हात्रे, आम आदमी पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष संतोष भगत, युवा नेते राजेश जुईकर, समाजसेवक निशांत भोईर, निशांत भगत तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी ठाण मांडून आहेत. सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून आंदोलनाला मिळणाऱ्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त केले.

### प्रकृतीबाबत चिंता वाढली

आमरण उपोषणामुळे रश्मिता पोपेटा यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गुरुवारी त्यांची आरोग्य तपासणी केली. आंदोलनाचा कालावधी वाढत असल्याने त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्रलंबित असल्याने दिबा समर्थकांमध्ये संतापाची भावना वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सोमटणे •> पान ५ वर

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**पनवेल :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अयाज परवेज खान (रा. स्वप्नसागर सोसायटी तळोजा फेस टू) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित तरुणी सोबत ऑगस्ट २०२४ ते एप्रिल २०२६ दरम्यान तिच्या घरी आरोपी अयाज खान याने पीडितेला वारंवार लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# परत आलात तर मारुन पाठवेन

**खा. संजय दिना पाटलांची पत्रकारांना धमकी**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माझ्या नादाला लागू नका. मी पाच लोकांना ठार मारलंय, असं म्हणत उघड धमकी देणाऱ्या शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना पातळी सोडली आहे. धमक्या देण्याच्या ओघात पाच जणांना ठार केल्याची अप्रत्यक्ष कबुली देणाऱ्या पाटलांनी आज पत्रकारांना थेट शिवीगाळ केली. रेकॉर्ड करा आणि आयुक्तांना दाखवा, अशा शब्दांत खासदार संजय पाटलांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली.



माध्यमांचे प्रतिनिधी खासदार संजय दिना पाटील यांची प्रतिक्रिया घेत होते. काही वेळ पत्रकारांशी संवाद साधल्यावर पाटलांचा पारा अचानक चढला. मी तुमच्याशी दोन मिनिटं बोललो ना आता. आता तुम्ही अति करताय.. बंद कर आता.. नाही तर मी विसरुन जाईन मी खासदार आहे. इज्जत करतोय, इज्जत करा. तुम्ही उगाच माझ्या % बोट घालताय. हे रेकॉर्ड करा. तुमची इज्जत करतो. उगीच डोक्यात जाऊ नका. आता परत आला तर मारुन पाठवणार तुम्हा लोकांना. जे लिहायचंय ते लिहा. रेकॉर्ड करुन आयुक्तांकडे तक्रार करा. खूप दिवस सहन केलं, असं म्हणत संजय दिना पाटलांनी पत्रकारांना •> पान ५ वर

# लोणावळा-अलिबाग एसटीचा अपघात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

लोणावळा ते अलिबाग मार्गावरील एसटी बसचा गुरुवारी (दि. २५) सकाळी सागावजवळील मोरीजवळ अपघात झाला. चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी संरक्षक रेलिंगला धडकली आणि त्यानंतर चिखलात रुतली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एसटी बसचे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही बस पेण आगाराची असून, पहाटे साडेपाच वाजता पेणहून लोणावळ्याकडे रवाना झाली होती. त्यानंतर सकाळी सव्वा सात वाजता लोणावळ्यातून अलिबागच्या दिशेने प्रवास सुरू करण्यात आला. बस पेणमार्गे अलिबागकडे जात असताना सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास सागाव बसस्थानकाच्या पुढे मोरीजवळ पोहोचली. यावेळी अचानक चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने बस रस्त्यालगतच्या लोखंडी रेलिंगवर आदळली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या चिखलात जाऊन अडकली.




■ सुदैवाने जीवितहानी टळली

■ बसचे नुकसान

अचानक झालेल्या या अपघातामुळे बसमधील प्रवाशांमध्ये काही •> पान ५ वर

# बारवर कारवाई, १४ जणांविरोधात गुन्हा दाखल

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलिसांनी पिके मुन नाईट बार अँड रेस्टॉरंटवर छापा टाकत महिला वेटर, कॅशियर, मॅनेजर आणि तीन पुरुष वेटर अशा १४ जणांविरोधात २३ जून रोजी गुन्हा दाखल केला.

२२ जून रोजी रात्री अकराच्या सुमारास पिके मुन नाईट बार अँड रेस्टॉरंट, पळस्पे गाव येथे सात महिला ठेवणे बंधनकारक असताना सातपेक्षा जास्त महिला दिसून आल्या आणि या महिलांनी नियमांचे उल्लंघन केले. या महिलांनी मद्यपान गृह, उपाहारगृह येथे नृत्य करण्यास मनाई असतानाही तोकडे कपडे परिधान करून ग्राहकांशी अंगाशी लगट केले, तसेच अंग विक्षिप्त, अश्लील कृत्य करून नृत्य करताना दिसून आल्या. तसेच बारमधील मॅनेजर अजय अयोध्या पास्वान आणि पिंटूकुमार यादव, संजय साकेत, प्रकाश त्रिपाठी, अरविंद यादव यांच्यासह बारमधील नऊ महिला वेटरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याने बारमालकांचे धाबे दणाणले आहेत.



**अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सज्ज | महाडमध्ये तळ ठोकणार विशेष पथक**

# जुलैच्या पहिल्या आठवड्यात एनडीआरएफ रायगडात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात जुलै महिन्याच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविल्याने जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. अतिवृष्टीमुळे पूरस्थिती, दरडी कोसळणे, झाडे उन्मळून पडणे तसेच जीवित व वित्तहानीचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) रायगडमध्ये तैनात करण्यात येणार आहे. १ जुलैपासून एनडीआरएफचे पथक रायगडमध्ये दाखल होणार असून, महाड येथे त्यांचा तळ असणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

**पूर, दरड आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सतर्क**

रायगड जिल्ह्याने मागील काही वर्षांत अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना केला आहे. जून २०२० मध्ये 'निसर्ग' चक्रीवादळाने जिल्ह्याला मोठा फटका दिला होता. त्यानंतर जुलै २०२१ मध्ये झालेल्या विक्रमी अतिवृष्टीमुळे महाडसह अनेक भागांत महापूर आला होता. याच काळात महाड तालुक्यातील तळीये गावावर दरड कोसळून मोठी जीवितहानी झाली होती. त्या भीषण दुर्घटनेत एनडीआरएफच्या जवानांनी बचाव व मदतकार्य राबवत अनेकांना सुरक्षित स्थळी हलविले होते, तर ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेऊन जखमी व मृतांना बाहेर काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले होते.




यंदाही मान्सूनने रायगडमध्ये दमदार हजेरी लावली आहे. २३ जूनपासून जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली असून, अनेक भागांत जोरदार पाऊस कोसळत आहे. कधी रिमझिम तर कधी मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडत असल्याने शेतकरी वर्ग समाधान व्यक्त करत असला, तरी काही ठिकाणी बंधारे तुटणे, झाडे कोसळणे आणि लहान-मोठ्या दुर्घटना घडण्यास सुरुवात झाली आहे.

हवामानाचा अंदाज आणि मागील वर्षांच्या अनुभवाच्या आधारे जुलै •> पान ५ वर

# अहवालांच्या दिरंगाईने जातवैधता प्रमाणपत्रे रखडली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जातवैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, त्रुटींची पूर्तता आणि विविध विभागांकडून मागविण्यात येणारे अहवाल वेळेवर प्राप्त होत नसल्याने कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये तब्बल ३ हजार ५५४ प्रकरणे प्रलंबित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील ९४२ प्रकरणांचा समावेश असून, या दिरंगाईचा थेट फटका उच्च व व्यावसायिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे.

राज्य शासनाने •> पान ५ वर



■ पाच जिल्ह्यांतील ३,५५४ प्रकरणे प्रलंबित

■ रायगडमध्येच ९४२ अर्ज अडकले

■ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासमोर मोठे संकट

### विद्यार्थ्यांना आवाहन

अकरावी-बारावी (विज्ञान), अभियांत्रिकी, डिप्लोमा आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांमार्फत तातडीने सादर करावेत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून करण्यात आले आहे. प्रशासनातील दिरंगाई, अपूर्ण अहवाल आणि रखडलेली पडताळणी प्रक्रिया यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य टांगणीला लागले असून, संबंधित विभागांनी तातडीने समन्वय साधून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, अशी मागणी पालक व विद्यार्थ्यांकडून जोर धरत आहे.

# वलगणीचे मासे पकडण्यासाठी मोठी झुंबड

**उरण :** गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने अखेर रायगड जिल्ह्यात दमदार हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला आहे. मात्र, पावसाच्या आगमनाने सर्वाधिक आनंद झाला आहे तो मच्छीप्रेमी आणि खवय्यांना. समुद्रकिनारी आणि खाडी परिसरात वलगणीचे मासे पकडण्यासाठी सध्या मोठी लगबग सुरू झाली असून, आबालवृद्धांची झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जून महिन्याच्या सुरुवातीपासून समुद्रातील मासेमारी बंद असल्याने मच्छीप्रेमींचे लक्ष वलगणीच्या माशांकडे लागले होते. अखेर पावसाने दमदार हजेरी लावताच खाडी आणि समुद्रकिनारी भागात वलगणीच्या माशांची हालचाल वाढली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. केदार विठ्ठल पाटील, २) श्री. प्रदिप विठ्ठल पाटील ३) श्री. रोहन विठ्ठल पाटील सर्व रा. घर क्र. २४२, खंडोबा मंदिराजवळ, कोळीवाडा, पो. ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| डावाले ता.अलिबाग | २०६/१ | ०-१४-१०<br>पो.ख. ०-०१-००<br>०-१५-१० | १.१० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २५/०६/२०२६

**ॲड. आसावरी सु. घरत**
मु.पो.वरसोली, अलिबाग
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मिळकत मालकांकडून जाणे-येणेच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याची बोलणी केली आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत.**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.हे.आर | आकार रु.पै. | मिळकत मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ८७१/२ | १-३०-४०<br>पो.ख.०-६८-२०<br>१-९८-६० | ४१-६८ | कविता विक्रांत पटवर्धन<br>विक्रांत शरदचंद्र पटवर्धन |

वरील मिळकती पैकी कविता विक्रांत पटवर्धन व विक्रांत शरदचंद्र पटवर्धन यांच्या हिश्श्याच्या ०-२६-१० हे. आर इतक्या क्षेत्रापैकी ०-०५-१० हे. आर बागायत क्षेत्र या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

वरील वर्णन केलेली मिळकत, खुद्द मालकीची असून निर्वेध व बोजाविरहीत असलेबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, बक्षीस, बोजा, जाणे-येणेचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग
दिनांक: २५/०६/२०२६

सही/-
**ॲड. रश्मी शिंदे**
सरिता सदन, जे. एस. एम कॉलेज रोड,
ता. अलिबाग जि. रायगड
मोबाईल नं. ८३८०८०८००२

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस सदरच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

माझे अशिल रेखा विजय पाटील, रा. खडतालपुल जवळ, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देतो ती खालीलप्रमाणे

वर नमुद माझे अशिल यांनी मौजे सारळ येथील गट नं. २९६ व मौजे मिळकतखार येथील गट नं. १५१ तसेच गट नं. १५४ या मिळकतींबाबत अलिबाग येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रे, मु. क्र ७४ /२०२६ तसेच मे उपविभागीय अधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात आर.टी.एस अपिल क्र. ६६/२०२६ दाखल केलेले आहे. रे. मु. क्र ७४/२०२६ ची पुढील तारीख ०४/०७/२०२६ नेमण्यांत आलेली असून आर. टी.एस अपिल क्र. ६६/२०२६ ची पुढील तारीख २०/०७/२०२६ नेमण्यात आलेली आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा करार किंवा/अथवा खरेदी व्यवहार करू नये. असा कोणताही करार केल्यास तो माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्यानंतर होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी तसा करार करणाऱ्या त्रयस्थ व्यक्तींवर राहिल व संबंधीत इसमांविरूद्ध माझे अशिल दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे.

अलिबाग
दिनांक : २६/०६/२०२६

**ॲड. निकेत रामचंद्र चवरकर**
त्रिवेणी कॉम्प्लेक्स, रूम नं.८,
संत रोहीदास नगर रोड, मु. चेंढरे
पो.ता.अलिबाग जि. रायगड
मो. नं. ९०४९४९२३८०

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of our clients we are investigating the ownership right, title and interest of **Mr. Anil Krushnaji Angane**, residing at 703, Blue Bell, Vasant Valley, Film City Road, Near Dindoshi Bus Depot, Malad (East), Mumbai Suburban District, Maharashtra 400 097, in respect of the residential premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the "**said Flat**"). All person/s having any claim or interest in or to the said Flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**:

ALL THAT 5 (Five) fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive numbers 72 to 76(both inclusive) bearing Share Certificate No.13 dated 28th September, 2009 issued by "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" and corresponding ownership rights to **Flat No. 14** admeasuring 648 sq. ft. (Built-up area) on the Second Floor of the building known as "**Sagar Darshan**" together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

Dated this 26th day of June, 2026

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that under the instructions of our clients we are investigating the ownership right, title and interest of **Mrs. Ankita Anil Angane**, residing at 703, Blue Bell, Vasant Valley, Film City Road, Near Dindoshi Bus Depot, Malad (East), Mumbai Suburban District, Maharashtra 400 097, in respect of the residential premises more particularly described in the **SCHEDULE** hereunder (hereinafter referred to as the "**said Flat**"). All person/s having any claim or interest in or to the said Flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or otherwise), charge, gift, trust, inheritance, tenancy, possession, lease, sub-lease, licence, lien, easement, occupancy rights, power of attorney, contract, memorandum of understanding, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, injunction, stay, status quo, attachment, reservation, redevelopment, partnership, joint venture, joint development or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise are hereby requested to notify the same in writing to the undersigned at the address: 1201, Giriraj Tower, Plot No. 5, Sector 20, Roadpali, Navi Mumbai 410218 and/or by email at: shrikant.kherkar@gmail.com within 14 days from the date hereof, failing which, any claim of such person/s shall be deemed to have been waived and/or abandoned and transaction shall be completed.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**:

ALL THAT 5 (Five) fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive numbers 36 to 40(both inclusive) bearing Share Certificate No.8 dated 28th September, 2009 issued by "Sagar Darshan Plaza Co-operative Housing Society Limited" and corresponding ownership rights to **Flat No. 13** admeasuring 585sq. ft. (Built-up area) on the Second Floor of the building known as "**Sagar Darshan**" together with proportionate rights in the common areas, lying being and situate on all that freehold land bearing CTS No. 1023/4 admeasuring 785.97 square meters situate within the limits of Alibaug Municipal Council, Alibaug Ramnath Road, Town and Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

Dated this 26th day of June, 2026

**Shrikant M. Kherkar**
**Advocate**

## जाहीर नोटीस

**या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे-हातनोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, येथील भूमापन क्रमांक ५३, भूमापन क्रमांकाचा उपविभाग १ब + ३, क्षेत्र सुमारे १-०२-४ हे.आर.पी. क्षेत्राची जमीन श्री. प्रदिप नाथालाल दत्तानी उर्फ ठक्कर, यांच्या मालकीची असून, सदर जमीन मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.**

**सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पूराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता ४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक-८७, सेक्टर क्रमांक-१५, सी.बी.डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमीन मिळकतीबाबतचा खरेदी-विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.**

**दिनांक : २६ जून २०२६**

**सही/-**
**श्री. सुनिल जे. गर्ग**
**वकील**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. प्रकाश खंडू साळवे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| २४/९ | ०.११.९० | ०.१० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक २६/०६/२०२६

सही/
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पांडुरंग शंकर तळेकर रा. ११२, एडनवाला कंपाऊंड, एम.जे. रोड, मनोहर डेकोरेटर्स जवळ, परेल, मुंबई ४०० ०१२ यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| ढवर ता.अलिबाग | ३२१ | <br>पो.ख.<br>एकूण | ०-१९-५०<br>०-०२-००<br>०-२१-५० | ४.५० |

वर नमूद भातशेती मिळकतीपैकी श्री. पांडुरंग शंकर तळेकर यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-१४-१० हे. आर., पो.ख. ०-०२-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-१६-१० हे. आर., आकार रु. ४.५० पैसे या मिळकतीबाबत

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : २५/०६/२०२६

सही /-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता :- दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, मौजे पाझर, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीत आमचे अशिल श्रीमती मिना प्रमोद पेरेकर, रत्नांजली पंकज पेरेकर, लंकेश प्रमोद पेरेकर, अतिश प्रमोद पेरेकर, अनुसया प्रमोद पेरेकर उर्फ अस्मिता संतोष सलामत, आश्विनी प्रमोद पेरेकर उर्फ आश्विनी राहुल पोरे, दिपाली प्रमोद पेरेकर उर्फ दिपाली पराग वरसोलकर रा.अलिबाग कोळीवाडा, ता.अलिबाग यांचा खालील दिलेल्या मिळकतीमध्ये अविभाज्य हिस्सा आहे. हिंदू वारसा कायद्याप्रमाणे या आमच्या अशिल देखील सदर मिळकतीच्या सह हिस्सेदार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| पाझर ता.अलिबाग जि.रायगड | ५७ | ०.४०.८०<br>वरकस ०.०४.१०<br>एकूण ०.४४.९०<br>पो.ख.०.०१.८०<br>वर्ग ब ०.०२.००<br>एकूण पो.ख. ०.०३.८०<br>एकूण क्षेत्र ०.४८.७० | १०.३६ रू.पै. |

सदरची मिळकत अन्य त्रयस्थ इसमांस विक्रीबाबत मदन धर्मा दरणे, विद्याधर लक्ष्मण दरणे वैगरे हे प्रयत्न करीत आहेत त्यांची ७/१२ वरील बाकी लोकांबरोबर मिळकत विक्री बाबत बोलणी चालु आहेत असे आमच्या अशिलास अलिकडेच समजले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही बोलणी करू नये. साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, बक्षीसपत्र, भाडेपट्टा इ.कोणत्याही प्रकारचा करार करू नये. असा कोणीही कोणत्याही प्रकारचा करार केल्यास त्या आमचे अशिलाची सक्त हरकत आहे. कारण सदर मिळकतीचे आमचे अशिलसुद्धा सहमालक आहेत. हे सर्वांस कळावे. अशाप्रकारचा कोणीही, कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक नसेल व सदर व्यवहार करणाऱ्या व्यक्ती अगर कंपनी अगर इतर कोणीही यांच्या विरूद्ध आमचे अशिल दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
ता.२५/०६/२०२६

सही/-
अशिलांतर्फे ॲड.
**(ॲड.जी.जी.गोंधळी)**
पत्ता - ॲड.जी.जी.गोंधळी
अंकुर ड्रायफ्रुटस्समोर
जुम्मा मशिदीशेजारी
गोंधळी निवास, शेषनाथ
वाडेकर मार्ग, अलिबाग जि.रायगड
मो.नं.९९२२७१६७८७/८१४९९९७०७७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| चिंचोटी | ७९/१/अ/१ | ०-४३-९०<br>पो.ख.०-०४-८०<br>०-४९-७०<br>पैकी ०-२३-००<br>एवढे क्षेत्र | १०.३८ | दत्तात्रेय चांगू पाटील |
| चिंचोटी | ७९/१/ब/१ | ०-१५-४०<br>पो.ख.०-०१-७०<br>०-१७-१० | ०३.६३ | दत्तात्रेय चांगू पाटील |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेच्या त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरच्या मिळकती खरेदी करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. २६/०६/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मिळकत मालकांकडून जाणे-येणेच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याची बोलणी केली आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत..**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.हे.आर | आकार रु.पै. | मिळकत मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ८७१/२ | १-३०-४०<br>पो.ख. ०-६८-२०<br>१-९८-६० | ४१-६८ | कविता विक्रांत पटवर्धन<br>विक्रांत शरदचंद्र पटवर्धन |

वरील मिळकती पैकी कविता विक्रांत पटवर्धन व विक्रांत शरदचंद्र पटवर्धन यांच्या हिश्श्याच्या ०-२६-१० हे.आर इतक्या क्षेत्रा पैकी ०-०५-८० हे. आर बागायत क्षेत्र या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

वरील वर्णन केलेली मिळकत, खुद्द मालकीची असून निर्वेध व बोजाविरहीत असलेबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, बक्षीस, बोजा, जाणे-येणेचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग
दिनांक: २५/०६/२०२६

सही/
**ॲड.रश्मी शिंदे**
सरिता सदन, जे.एस.एम कॉलेज रोड,
ता. अलिबाग जि. रायगड
मोबाईल नं. ८३८०८०८००२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणोली ता.अलिबाग, जि.रायगड | ६२/२ | जिरायत ०.४८.४०<br>पो.ख. ०.००.६० | ६.६६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हित संबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुरव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येण्याऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक ११/०६/२०२६

**ॲड. अमर अशोक घरत**
मु.पो. थळ, पेठ नाका,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ८८०५०३७४७४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सुप्रिया सुनिल नाईक यांनी खालील नमुद केलेली दुकानगाळा ही मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक अपुर्व अभय पाटील यांचेसोबत स्वाक्षरीत करण्याचे ठरविले आहे. सदरची दुकानगाळा मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे आंबेपूर, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ३३, हिस्सा नं. १+२, क्षेत्र ०-७१-६० हे. आर. पो. ख. ०-१५-४० हे. आर. एकुण क्षेत्र ०-८७-०० हे.आर. आकार १६.३१ रू. पै. या बिनशेती मिळकतीतील नियोजित 'वात्सल्य रेसीडेन्सी' या इमारतीमधील तळ मजल्यावरील वाणिज्य /दुकान गाळा नं. १३ एकुण क्षेत्र ३३३.०० चौरस फुट बिल्ट अप (३०.९४ चौ.मी.) (२४७.०० चौरस फुट कारपेट) हा वाणिज्य गाळा/दुकान गाळा ग्रामपंचायत आंबेपूर घर मालमत्ता नं. १५२८/१३ मिळकतीबाबतचा.

तरी वरील दुकानगाळा मिळकत संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील दुकानगाळा मिळकत विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची दुकानगाळा मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे दुकानगाळा मिळकत विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील**
युगंधर, शॉप नं. ६, ब्राम्हण आळी,
युनियन बँकेजवळ, अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ७७९८८४४४३३

ORNI No. MAHBIL /2009/36619

## महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४१ (२) — बुधवार, जून ३, २०२६/ज्येष्ठ १३, शके १९४८ — पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६३**
**प्राधिकृत प्रकाशन**

**भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग, माणगांव यांजकडून**

**शुद्धीपत्र**

क्रमांक उविअ/भूसं/कात-५/डोंगरोली/एसआर-१७५/२०२४-दुरुस्ती-उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग, माणगांव, यांजकडील जाहीर नोटीस क्र. उविअ/भूसं/कात-५/ डोंगरोली साठवण तलाव/एस आर-१७५/२०२४, दिनांक ८ डिसेंबर २०२५ अन्वये मौजे डोंगरोली, ता. माणगांव, जि. रायगड येथील खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी पृ. क्र. २ व ४ मध्ये दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झाली आहे.

दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची- एक**
**खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील**
**तालुका- माणगांव, जिल्हा- रायगड**

**यापूर्वीचा तपशील**

| अ. क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | डोंगरोली | ८४/० | ०-२६-०० |
| २ | डोंगरोली | १४९/७ क | ०-१२-०० |
| | | एकूण | ०-३८-०० |

**वाचण्याचा तपशील (दुरुस्तीप्रमाणे)**

| अ. क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | डोंगरोली | ८४/१ | ०-२६-०० |
| २ | डोंगरोली | १४१/७ क | ०-१२-०० |
| | | एकूण | ०-३६-०० |

माणगांव,
दिनांक १६ मार्च २०२६.

**जिल्हा संधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण उपविभाग, कोलाडकरिता.**

**डॉ. संदीपान सानप,**
**भूसंपादन अधिकारी,**
**तथा**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सुप्रिया सुनिल नाईक यांनी खालील नमुद केलेली दुकानगाळा ही मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक हरिभाऊ गोसावी पाटील यांचेसोबत स्वाक्षरीत करण्याचे ठरविले आहे. सदरची दुकानगाळा मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे आंबेपूर, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ३३, हिस्सा नं. १+२, क्षेत्र ०-७१-६० हे. आर. पो.ख. ०-१५-४० हे. आर. एकुण क्षेत्र ०-८७-०० हे.आर. आकार १६.३१ रू.पै. या बिनशेती मिळकतीतील नियोजित 'वात्सल्य रेसीडेन्सी' या इमारतीमधील तळ मजल्यावरील वाणिज्य /दुकान गाळा नं.१२ एकुण क्षेत्र ३४५.०० चौरस फुट बिल्ट अप (३२.०६ चौ.मी.) (२५५.०० चौरस फुट कारपेट) हा वाणिज्य गाळा/दुकान गाळा ग्रामपंचायत आंबेपूर घर मालमत्ता नं. १५२८/१२ मिळकतीबाबतचा.

तरी वरील दुकानगाळा मिळकत संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त , पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील दुकानगाळा मिळकत विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची दुकानगाळा मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे दुकानगाळा मिळकत विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड.विकास हरिश्चंद्र पाटील**
युगंधर, शॉप नं. ६, ब्राह्मण आळी,
युनियन बँकेजवळ, अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ७७९८८४४४३३

## निवडक

### रजनी पाटील यांचे निधन



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत पोयनाड येथील भाकरवड गावच्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्या रजनी रमेश पाटील यांचे मंगळवारी (दि.२३) निधन झाले. निधनासमयी त्या ७३ वर्षांच्या होत्या. त्या ग्रुप ग्रामपंचायत पोयनाडच्या सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेल्या माजी सदस्या होत्या. त्यांच्यावर भाकरवड गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी भाकरवड ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष शंकर पाटील, दिलीप पाटील, जितेंद्र पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुलगे, सुना, जावई व नातू असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तर कार्य गुरुवार दि. २ जुलै रोजी दिवलांग येथील ओंकारेश्वर मंदिरात, तर तेरावे रविवार दि.५ जुलै रोजी राहत्या घरी होणार असल्याचे पाटील कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, रजनी पाटील यांच्या निधनाची बातमी कळताच शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.



### कापड बाजारातील गटार तुंबले

**खांदा कॉलनी :** पनवेल शहरातील जय भारत परिसरातील कापड बाजारात सुरू असलेल्या इमारत बांधकामामुळे ड्रेनेज लाईन चोक झाल्याची घटना समोर आली आहे. बांधकामासाठी वापरण्यात आलेली रेती व इतर साहित्य मोठ्या प्रमाणावर रस्त्यालगत साचल्याने ते ड्रेनेज लाईनमध्ये जाऊन पाईप पूर्णपणे बंद झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे परिसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहू लागले असून, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करून चोक झालेली ड्रेनेज लाईन साफ करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले. यंत्रणेकडून करण्यात आलेल्या प्रयत्नांनंतर ड्रेनेज लाईन पूर्णपणे मोकळी करण्यात आली असून, सांडपाण्याचा प्रश्न तात्पुरता मार्गी लागला आहे. दरम्यान, निष्काळजीपणामुळे सार्वजनिक ड्रेनेज व्यवस्था विस्कळीत करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अजून किती जणांचा जीव घेणार?

## पळस्पे-कोण मार्गावरील अपघातांमुळे संताप

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील पळस्पे-डेरवली-कोण मार्गावर मोठ्या मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू आहेत. त्यामुळे याठिकाणी वाहतुकीचा मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे अपघातांतदेखील वाढ होत आहे. या वाढत्या अपघातांच्या मालिकेमुळे स्थानिक ग्रामस्थ, प्रवासी व वाहनचालकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. ''अजून किती जणांचा जीव घेणार?'' असा संतप्त सवाल डेरवलीकरांसह अनेक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### रस्ते सुरक्षा नियम धाब्यावर

रस्ते सुरक्षा नियम धाब्यावर बसवून कररूपाने कोट्यवधी रुपये भरणाऱ्या वाहन चालक, प्रवासी, स्थानिक नागरिकांचा जीव मात्र रस्त्यावर टांगणीला लागल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित रस्ते सुरक्षा यंत्रणा, वाहतूक विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विकासकांनी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा भविष्यात घडणाऱ्या प्रत्येक अपघाताची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी त्यांच्यावरच राहील, असा इशारावजा इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे.




पळस्पे-कोण या मार्गावर सुरू असलेल्या विकासकामांमुळे वाहतुकीचा मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे अवजड वाहनांची बेशिस्त वाहतूक, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि अपुरी सुरक्षा व्यवस्था यामुळे दररोज धोकादायक परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे दिवसा अवजड वाहने एकाच लेनमधून नियंत्रित पद्धतीने चालविणे बंधनकारक करावे. तसेच, या मार्गावर तातडीने ३० कि.मी. प्रतितास वेगमर्यादा लागू करून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, नुकत्याच घडलेल्या भीषण अपघातात एका निष्पाप युवा तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, मृत युवकाचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेने संपूर्ण परिसर हळहळ व्यक्त करत असून संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

पळस्पे-कोण मार्गावरील वाहतूक कोंडी, अपुरी पर्यायी व्यवस्था आणि नियोजनातील त्रुटी यामुळे अनेक वेळा जीवितहानीचे प्रसंग उद्भवत आहेत. वाहतूक नियंत्रण कक्ष व संबंधित यंत्रणा विविध उपाययोजना करत असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सचिव साबीर शेख यांनी या पार्श्वभूमीवर ''शून्य अपघात अभियान'' राबविण्याची मागणी केली आहे. विकासकामे पूर्ण होऊन उड्डाणपूल तयार होईपर्यंत या मार्गावर २४ तास वाहतूक नियंत्रण, सुरक्षा कर्मचारी, दिशा दर्शक, चेतावणी फलक, प्रकाशयोजना आणि अवजड वाहनांचे नियमन प्रभावीपणे करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच पळस्पे-कोण मार्गावर रस्ते सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन न झाल्यास ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा स्थानिक ग्रामस्थ व पत्रकार साबीर शेख यांनी दिला आहे.

तसेच, विकासकामे सुरू असताना रस्ते सुरक्षा नियमांची अंमलबजावणी करणे ही संबंधित कंत्राटदार, विकासक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी असल्याचे सांगत, भविष्यात अशा निष्काळजीपणामुळे कोणतीही जीवितहानी झाल्यास संबंधित कंत्राटदार, विकासक आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## खासगी नोंदणीचा महसुलला फटका

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

राज्यभरात रोड रोलर, जेसीबी, अर्थ-मुव्हिंग इक्विपमेंट, क्रेन, हायड्रा यांसारख्या जड यंत्रसामग्रीच्या वाहनांचा सर्रास व्यावसायिक आणि भाडेतत्त्वावरील कामांसाठी वापर होत आहे. परंतु, त्यांची नोंदणी मात्र 'खासगी' अर्थात परिवहनेतर संवर्गात केली जात असल्याने शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसत असल्याचा गंभीर मुद्दा विधानपरिषदेत आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थित केला आहे. या प्रकारामुळे महसूल गळती होत असल्याचा आरोप करत त्यांनी शासनाला धारेवर धरले आहे.

आमदार पाटील यांनी राज्यातील अशा वाहनांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे का, तसेच व्यावसायिक वापर करणाऱ्या वाहनांसाठी 'टी परमिट' किंवा स्वतंत्र व्यावसायिक नोंदणी बंधनकारक करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, असा सवाल उपस्थित केला. अनेक बांधकाम, औद्योगिक आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये ही वाहने मोठ्या प्रमाणावर वापरली जात असूनही त्यांच्यावर व्यावसायिक वाहनांप्रमाणे नियम लागू होत नसल्याने महसूल नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. त्यावर उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केंद्र शासनाच्या ५ नोव्हेंबर २००४ च्या अधिसूचनेनुसार रोड रोलर, जेसीबी, क्रेन इत्यादी यंत्रसामग्रीची वाहने परिवहनेतर संवर्गात मोडत असल्याचे स्पष्ट केले. वाहन नोंदणीचे नियम निश्चित करण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे असल्याने राज्य शासन त्यानुसार कार्यवाही करत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, १ एप्रिल २०२५ पासून या वाहनांसाठी एकरकमी कर प्रणाली लागू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

## मंगळसूत्र खेचून चोरटा पसार

**पनवेल :** कामोठे येथील सोसायटीच्या पायऱ्यावर चढून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून चोरटा पसार झाला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. या प्रकरणी चोराविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी दोन चोरट्यांनी कामोठे येथील अजिंक्यतारा सोसायटीमध्ये प्रवेश केला. त्यावेळेस सोसायटीमध्ये रहिवासी तेजल मोरे या सामानाची खरेदी करण्यासाठी खाली आल्या होत्या. खरेदी केल्यानंतर त्या घरी येण्यासाठी निघाल्या आणि सोसायटीच्या पायऱ्या चढत असताना चोराने मागून येऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने हिसकावले आणि तो तेथून पळून गेला. या प्रकारामुळे सोसायटीतील नागरिक भयभीत झाले आहेत.

## पावसात संरक्षण भिंत कोसळली

**| रोहा | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील बाहे येथील मोलमजुरी करणारे शंकर अंबाजी देवकर यांच्या घरालगत असलेली संरक्षण भिंत जोराच्या पावसात कोसळली. पाणी वाहून जाणाऱ्या नाल्याच्या पाण्याचा मोठा गुरुळ लागल्याने ही भिंत कोसळल्याचे बोलले जात असून, सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. मात्र, भिंत कोसळल्याने देवकर यांचे मोठे नुकसान झाले आहे.

शंकर देवकर यांचे घर टेकडीवर अधांतरी आहे. त्यामुळे येत्या पावसाळ्यात या घराची पडझड होण्याची भीती त्यांच्या मनात असल्याने त्यांनी स्वखर्चाने घराला संरक्षण मिळावे म्हणून मे महिन्यात संरक्षण भिंत बांधली. याकामी त्यांचे जवळपास ५० हजार रुपये खर्च झाले आहेत. दरम्यान, पावसाने जोरदार हजेरी लावल्याने त्यांच्या घरा शेजारील पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नाल्याला अचानक गुरुल पडला. त्यामुळे त्याचे पाणी घरात आणि संरक्षण भिंतीच्या बांधकामात घुसल्याने ही भिंत पडली, असे त्यांनी सांगितले. तसेच, भिंत कोसळल्याची माहिती गावचे पोलीस पाटील मनोज थिटे आणि ग्रामस्थ यांनी अधिकारी वर्गाला दिली आहे. चिल्हे गावाचे तलाठी रोहित राजने यांनी या घटनेची माहिती घेत त्याचा पंचनामा करून नुकसानग्रस्त घर मालकाला मदत मिळेल, असा दिलासा दिला आहे.

## अल्पवयीन वाहन चालकांमुळे सुरक्षितता धोक्यात

**| उरण | प्रतिनिधी |**



उरण शहरासह ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांकडून दुचाकी वाहने चालविण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या अल्पवयीन वाहन चालकतेचा फटका नागाव येथील एका कुटुंबाला बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१६ जून रोजी नागाव-म्हातवली मुख्य मार्गावरील स्टार कॉम्प्लेक्स परिसरात एका अल्पवयीन मुलाने स्कुटी चालवत प्रथम केगाव येथील प्रशांत दर्णे यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर शाळेत लहान मुलाला घेऊन जाणाऱ्या नागाव काठेआळी येथील हर्षदा म्हात्रे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात हर्षदा म्हात्रे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांच्या मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला होता. अपघातानंतर त्यांना तातडीने खारघर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. परंतु, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर त्यांचे सोमवारी (दि.२२) निधन झाले. त्यांच्या निधनामुळे नागाव परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित मुलाच्या पालकांवर व गाडी मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या घटनेनंतर उरण परिसरात अल्पवयीन वाहनचालकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## दिघोडे-चिर्ले मार्ग चिखलमय

**| चिरनेर | प्रतिनिधी |**



उरण तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित येणाऱ्या दिघोडे-चिर्ले मार्गाची पहिल्याच पावसात दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे हा रस्ता संपूर्ण चिखलमय व पाण्याने भरल्यामुळे वाहन चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. या रस्त्यावरील मोऱ्यांचे काम देखील अपूर्ण असल्यामुळे पाणी जाण्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे रस्त्यात चिखल व माती साचून हा मार्ग चिखलमय झाला आहे. ठेकेदारांकडून या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे, नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. अटल सेतू मार्गे मुंबईहून कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने, या मार्गावर वाहतुकीचा ताण लक्षणीय वाढला आहे. अवजड वाहने या रस्त्यावरून चालत असल्यामुळे हा रस्ता दर्जेदार तयार करायला हवा. मात्र, तसे होत नाही. अशी कामे करून, शासनाचा पैसा पाण्यात जात असताना, शासकीय अधिकारी आपल्या कार्यालयामध्ये निवांत बसून ठेकेदारांचे बिल पास करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. तसेच, या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट झाले असल्याने या कामात संबंधितांनी लक्ष घालण्याची मागणी केली जात आहे.

## पनवेलमध्ये जुन्या वादावरून मारहाण

**पनवेल :** जुन्या वादावरून मारहाण केल्याप्रकरणी तिघांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शिवम वानखेडे हा हरिग्राम येथे राहत असून, तो आणि त्याच्या भावाला रिक्षा प्रवासी भरण्याच्या जुन्यावादावरून किरण दबडे, आकाश यमगर आणि आकाश बरणवाल यांनी शिवीगाळ करून हाताबुक्याने मारहाण केली. तसेच, रात्री अडीच वाजताच्या सुमारास किरण याने शिवम याला ओरियन मॉल रिक्षा नाक्यावर बांबूच्या काठीने डोक्यात मारहाण केली.

**उपकार्यकारी अधिकारी नाखलेंची माहिती** | **जलजन्य आजार रोखण्यासाठी जनजागृती**

## जिल्ह्यात स्टॉप डायरिया अभियान राबविणार


**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शुध्द, स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे जलजीवन मिशनअंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाचा उद्देश आहे. जलजन्य आजार रोखण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाच्या प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता शुभांगी नाखले यांनी दिली आहे.

या अभियानामध्ये गावातील अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र ,सरकारी कार्यालये व प्राथमिक शाळा येथील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया, गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक आजार होत असतात त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येणार आहे. यासाठी गाव स्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांच्या मध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. एकूण सहा आठवडे हे अभियान चालणार असून, प्रत्येक आठवड्यात वेगवेगळ्या वेगवेगळे उपक्रम गाव पातळीवर घेण्यात येणार आहेत.

पाणी शुद्ध करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात येणार आहे व शुद्ध पाण्याचे महत्त्व सांगणेत येणार आहे. या अभियानामध्ये मुख्यतः पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन व त्याची योग्य हाताळणी, स्वच्छता जागृती कार्यक्रम, पाणी गळतीच्या जागा शोधून त्याची दुरुस्ती करणे, पाणी तपासणी बाबत गाव पातळीवर पोस्टर बॅनर्स लावण्यात येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाळा, अंगणवाड्या प्राथमिक आरोग्यकेंद्रे येथे स्वच्छता जागृती कार्यक्रम घेण्यात येणार आहे. ग्रामस्थांमध्ये कचऱ्याच्या वर्गीकरणाच्या बाबतीत जागृती निर्माण करणे यासाठी घरोघरी भेटी देऊन, कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास प्रोत्साहन देणे याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच गावामध्ये घनकचरा नियम २०२६ नुसार कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व हाताळणी याबाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

पाणीपुरवठा योजनेतील पाणी गळती शोधून त्याची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणे, घरगुती स्तरावरील पाणी साठवणुकीच्या टाक्यांची स्वच्छता करणे, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी नादुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याचे स्रोतांची स्वच्छता ठेवणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता याबाबत गावांना सक्षम करण्यासाठी गावातील सर्व घटकांचा या अभियानामध्ये सहभाग घेण्यात येणार आहे.



# दोन खुनांच्या दोन गोष्टी

पावसाचे पाणी आत येते आहे, दरवाजा बंद करा असे एकाचे म्हणणे होते. भांडण झाले. भर चालत्या लोकलमध्ये एकाचा खून झाला. एका मुलीला ठरवलेले लग्न पसंत नव्हते. तिने कट केला. होणाऱ्या नवऱ्याला ४०० फूट उंच कड्यावरून बिनदिक्कत ढकलून दिले. यातील एक प्रकरण मुंबईचे तर दुसरे पुण्याचे आहे. ही महाराष्ट्र नावाच्या तथाकथित प्रागतिक राज्यातली सर्वात अग्रेसर शहरे आहेत. मुंबईमध्ये सगळ्या जगात श्रीमंत असे लोक राहतात. पुण्यात जगभरातले आयटी उद्योग आहेत. पूर्वापार ते विद्येचे माहेरघर होतेच. या शहरांचा आणि महाराष्ट्राचा खूप विकास झाला आहे असे म्हणतात. मोदी, फडणवीस आणि मंडळी सारखी विकास विकास म्हणून जपमाळ ओढत असतात. मधल्या काळात या शहरातली गर्दी, वाहतूक कोंडी, सिमेंट काँक्रिटमुळे धूळ, उन्हाळा, पावसाळ्यात पाणी भरणे हे अतोनात वाढले आहे. याचाच अर्थ या शहरांचा प्रचंडच विकास झाला असला पाहिजे हे उघड आहे. या विकासासोबत इथली माणसेही कशी भयंकर विकसित झाली आहेत याचा प्रत्यय अधूनमधून येत असतो. काही महिन्यांपूर्वी म्हणजे जानेवारीमध्ये पश्चिम रेल्वेच्या लोकलमध्ये दरवाजात गर्दी करण्यावरून किरकोळ बोलाचाली झाली आणि एका गणिताच्या प्राध्यापकाचा खून झाला. थेट तसाच प्रकार मंगळवारी रात्री नालासोपाऱ्याकडे जाणाऱ्या लोकल गाडीत झाला. याच दिवशी पहिल्यांदा बऱ्याच प्रतिक्षेनंतर पाऊस सुरू झाला. त्याचा खरे तर अनेकांना आनंद असायला हवा होता. पण रोशन सुवर्ण याला तो नव्हता. दरवाजा बंद करण्यावरून भांडण झाले व त्याने मयंक लोहार नावाच्या बावीस वर्षांच्या तरुणाला चाकूचे वार करून ठार केले. रोशन सुवर्ण हा अंधेरीला एका कार्गो कंपनीत आपले वडील व भाऊ यांच्यासोबत काम करतो. तेथे त्याला बऱ्यापैकी पैसे मिळत असावेत. कारण मुळात तो अंधेरीहून टॅक्सी करूनच मीरा रोडला जाणार होता. हे अंतर बरेच आहे व कोणी श्रीमंत माणूसच टॅक्सीचा विचार करू शकेल. पाऊस असल्याने तो लोकलने प्रवास करण्यासाठी आला आणि तिथे हा प्रकार घडला.

## चाकू वापरून पाहिला

येण्यापूर्वी तो भरपूर दारू प्यायलेला होता व येताना एका रिक्षावाल्याशीही त्याने भांडण केले होते असे म्हणतात. नंतर लोकलमध्ये दरवाजा बंद करा असे त्याला कोणीतरी सांगण्याचे निमित्त झाले आणि खून झाला. रोशनने काही दिवसांपूर्वीच एक चाकू खरेदी केला होता व तो त्याच्या बॅगेत होता. तो त्याने आधीही वापरला होता का हे तपासात कळेल. कदाचित चाकू बरेच दिवस बॅगेत पडून असल्याने त्याला तो कोणावर तरी चालवून पाहायची इच्छा असेल. रोशन हा तीस वर्षांचा आहे. माणूस म्हणजे काय, त्याचा जीव जाणे म्हणजे काय हे कळण्याची चांगली अक्कल असेल इतका तो मोठा आहे. तरीही त्याने एका क्षणाचाही विचार न करता मयंक लोहारवर वार करून त्याला संपवला. याचे कारण आपल्याला आडवा येणारा किंवा आपल्यापेक्षा वेगळा वागणा बोलणारा इसम त्याला नको होता. त्याला संपवणे हाच सोपा उपाय त्याला वाटत होता. हे जग फक्त आपल्याला राहण्यासाठी आहे, आपल्या सुखासाठी आहे असा या इसमाचा समज असावा. त्या सुखाच्या कथित कल्पनांच्या वाटेत येणारा एखादा दगड असो, झाड असो की एखादा माणूस त्याला ठोकरून देऊन हे पुढे जाऊ पाहतात. रस्त्यावर या लोकांचे वाहन जात असते तेव्हा प्रसंगी इतरांच्या वाहनांना ठोकर देऊन हे पुढे जाऊ पाहतात. रस्ता केवळ आपल्यासाठी आहे व आपली गाडी कायम भरधाव वेगाने सर्वात पुढे धावायला हवी असे यांना वाटते. रोशन सुवर्ण याला खून केल्यावर कोणताही पश्चात्ताप झाला नाही. तो बोरीवलीला उतरून शांतपणे रिक्षाने घरी गेला. आंघोळ, जेवण इत्यादी करून कपडे भरून त्याने आपल्या मंगळुरू या मूळ गावी जाण्याची बस बुक केली. हे सर्व त्याने घरच्यांना सांगितले असावे. तेही याबाबत शांत राहिले ही कमाल आहे. त्यानंतर हा शांतपणे पनवेलला जाऊन बसची वाट पाहत बसला होता. आपण एका इसमाला या जगातून संपवला आहे याची किंचितही खंत त्याला होती असे दिसले नाही.

## व्यापारी संस्कृती आणि विकृती

खुनाचा दुसरा प्रकार त्याहूनही भीषण आहे. सिया गोयल ही केवळ वीस वर्षांची मुलगी आहे. तिचे वाडवडील पुण्याच्या मार्केट यार्डमधील व्यापारी आहेत. व्यापारामध्ये रोज मिळणारा भरपूर पैसा हे पुण्याच्याच नव्हे तर राज्यभरातल्या सर्व मार्केटातील गुजराती, मारवाडी, जैन, सिंधी इत्यादी समाजांचे वैशिष्ट्य झाले आहे. अगदी आपल्या अलिबाग, मुरुड, महाड, पेण अशा छोट्या शहरांमध्येही यांचे वर्चस्व दिसून येते. प्रचंड पैसा व त्या मानाने दुसऱ्या तिसऱ्या पिढीतील मुलांनाही नीट शिक्षण नाही अशी स्थिती या समाजात नेहमी दिसते. पैशांच्या जोरावर राजकारणी, पोलिस, जिल्हाधिकाऱ्यांपासूनचे अधिकारी यांना आपण कसेही विकत घेऊ शकतो याचा अनुभव यांच्यापाशी असतो. याच्या जोरावर सर्व राजकीय पक्षांमध्ये यांचे संबंध असतात. मोदींचा भाजप हा तर यांचाच पक्ष. त्यामुळे यांचा धर्माभिमानही प्रचंड वाढला आहे. भरपूर पैसे खर्च करून मोठमोठे लग्न किंवा इतर समारंभ करणे ही यांची खासियत. सिया गोयलचे लग्न जिच्याशी ठरले होते तो केतन अगरवाल आणि सियाचा प्रियकर व आता खुनाचा आरोप असलेला मदतनीस चेतन चौधरी हे सर्व जण याच व्यापारी वर्गाचा हिस्सा होते. यांच्या लग्नावर १७ कोटी रुपये खर्च होणार होते अशी चर्चा आहे. राजस्थानात अमुक ठिकाणी लग्न, बालीमध्ये प्रीवेडिंग शूटिंग वगैरे पैसे खर्च करण्याचे उद्योग चालू होते. सियाला हे लग्न मंजूर नव्हते. पण वडिलांचे व समाजाचे दडपण इतके असणार की ते सांगण्याची हिंमत तिच्याकडे नसणार. म्हणून तिने केतनला लोहगडावरून ढकलून देण्याचा कट आखला व तडीला नेला. हे तिने कदाचित कोण्या सिनेमात किंवा ओटीटीवरच्या सिरीयलमध्ये पाहिले असावे. पण आपण दुसऱ्या माणसाचा जीव घेतो आहोत याची जाणीव तिच्यामध्ये नसावी. आपल्याला त्रासदायक एखादे एप मोबाईलवरून उडवावे तसेच केतनला उडवून लावू असे तिला बहुदा वाटले असावे. शक्यता हीच आहे की, तिच्या व्यापारी संस्कृतीतल्या घरात याचा रीतीने विचार होत आलेला असावा. सियाने इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतले असणार. बाकी वाचन किंवा मनन यांच्याशी तिचा काही संबंध शून्य असणार. लग्न करून सतत प्रचंड दागिने घालावेत, समारंभ करावेत, हॉटेल, प्रवास यावर खर्च करावेत, माणसांची किंमत पैशावरून ठरवावी हेच तिच्या आयुष्याचे ध्येय असावे. आपण माणूस आहोत म्हणजे काय आहोत याचा विचार करण्याची तिला आजवर कधी गरज नव्हती. कदाचित आता तुरुंगात गेल्यावर तिला ती जाणवेल. तिच्यासोबत तिच्या आईवडिलांना व आजूबाजूच्या व्यापारी संस्कृतीतल्या समाजालाही ती जाणवो ही इच्छा.

**| विचार**

# समस्यांची चर्चा पण संघर्ष नाही

*विचारवंतांची भाषणे अनेकदा सामाजिक परिस्थितीवर आर्थिक आव्हानांवर सविस्तर भाष्य करतात, मात्र या मौलिक चर्चेनंतर फारसे काही घडत नाही, विविध पक्ष फक्त चर्चाच करतात, असा आक्षेप घेतला जातो. माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा तसेच राहुल गांधी यांनी अलिकडेच देशापुढील आव्हानांचे चित्र सविस्तर रेखाटले खरे; मात्र याविरोधात संघर्ष कोण करणार आणि भाजपला आव्हान कसे देणार हे स्पष्ट झाले नाही.*





डॉ. सुकृत खांडेकर

मान्यवर, विचारवंतांची भाषणे अनेकदा सामाजिक परिस्थितीवर आर्थिक आव्हानांवर सविस्तर भाष्य करतात. त्यातून बरेचदा देशापुढील आव्हानांची चर्चा होते, मात्र या मौलिक चर्चेनंतर फारसे काही घडत नाही, विविध पक्ष फक्त चर्चाच करतात, असा आक्षेप घेतला जातो. त्याचेच एक रुप अलिकडे पहायला मिळाले. काँग्रेस समितीच्या वतीने अलिकडेच भारतात येणारी आर्थिक सुनामी या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमाला दिल्लीच्या जेएनयुमधील अर्थशास्त्राचे प्रा. अरूणकुमार, अर्थतज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ संपादक आणि माजी खासदार कुमार केतकर, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख विश्वास उटगी अशी बुध्दीवादी मंडळी उपस्थित होती. प्रमुख भाषण झाले ते माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांचे. प्रदेश काँग्रेसमधील अर्थविषयक चर्चासत्राचा अजेंडा अखिल भारतीय काँग्रेसकडून आला असावा. देशाची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा उसळलेला आगडोंब, पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या दरात झालेली प्रचंड वाढ, विकासदराचे संशयास्पद आकडे, सुशिक्षित तरूणांमधील महाप्रचंड बेरोजगारी या समस्यांच्या पार्श्वभूमीवर हे चर्चासत्र पार पडले. आज सामान्य माणसाचे जीवन सुखावह राहीलेले नाही, राज्यकर्ते आणि जनता यांच्यात फार मोठे अंतर पडले आहे. वृत्तपत्रे आणि टीव्ही वृत्तवाहिन्यांवर वास्तव चित्र मांडले जात नाही. भाजपाचे सरकार केवळ उत्सव साजरे करण्यात आणि घोषणाबाजीत व्यस्त आहे. विरोधी पक्षाला कम जोर करण्यासाठी तपास यंत्रणांचा मुक्तपणे वापर होतो आहे. अशा मुद्यांवर आवाज उठवण्याची वेळ आली असल्याची जाणीव काँग्रेस पक्षाला झाली आहे, असे या निमित्ताने जाणवले. त्या निमित्ताने देशाच्या आर्थिक आरोग्याची तपशीलवार चर्चा झाली.

माजी केंद्रीय मंत्री यशवंत सिन्हा हे या चर्चासत्राचे आकर्षण होते. ते अगोदर आयएएस अधिकारी होते. नंतर चंद्रशेखर आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये मंत्री होते. देशाचे अर्थ आणि परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. मोदी सरकारच्या कामगिरीबाबत झालेल्या मतभेदानंतर ते भाजपाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. वयाची ऐंशी पार करणारे यशवंत सिन्हा हातात काठी घेऊन दोन मजले चढून सभागृहात भाषणासाठी आले. काँग्रेस पक्ष राज्यात आणि केंद्रात दीर्घ काळ सत्तेवर होता, पण मुंबईतील टिळक भवनाला लिफ्ट उभारली नाही, हे आपल्याला इथे येईपर्यंत ठाऊक नव्हते, अशी मार्मिक टिप्पणीही त्यांनी भाषणाच्या सुरूवातीला केली. ज्यांनी अटलबिहारी वाजपेयी किंवा लालकृष्ण अडवाणी यांचा विश्वास प्राप्त केला होता, जे भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून दिल्लीत पत्रकारांना संबोधित करीत असत, त्या यशवंत सिन्हांची ओळख आज मोदीविरोधक म्हणून झाली आहे. कोणाचीही पर्वा न करता सिन्हा आपली भूमिका रोखठोक मांडत असतात. त्यांनी भाजपामध्ये असताना काँग्रेसने देशासाठी काय केले असे प्रश्न कधी विचारले नाहीत. काँग्रेसच्या माजी पंतप्रधानांवर त्यांनी कधी वैयक्तिक टीका केली नाही. आता ते काँग्रेसच्या व्यासपीठावर येऊन मोदी सरकारवर यथेच्छ टीका करू लागले आहेत, मोदींच्या कार्यकाळातील विकासदराबाबत शंका व्यक्त करत आहेत. एवढेच नव्हे तर, देशाला येणाऱ्या आर्थिक सुनामीपासून वाचवायचे असेल तर 'मोदी मस्ट गो' असे परखडपणे सांगत आहेत. राहूल गांधींच्या सुरात सूर मिसळून ते मोदी सरकारवर आगपाखड करताना दिसत आहेत.

भारत सरकार विकासदराचे आकडे फुगवून सांगत आहे असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधिनेच आपल्या अहवालात म्हटले असल्याचे सांगत सिन्हा यांनी त्या अहवालातील काही परिच्छेद वाचून दाखवले. भाजपाचा जोर सतत प्रचारावर आहे, पण वास्तव दूर आहे. ते विकासदर ७.७ असल्याचा दावा करतात पण प्रत्यक्षात ६.५ पेक्षा जास्त नसावा असे ते सांगत आहेत. सरकारची विश्वासार्हता संपली आहे, सरकार वारंवार खोटे बोलत आहे असे सिन्हा यांचे आरोप आहेत. देशातील महागाई, बेरोजगारी यांचा अमेरिका- इराण युध्दाशी काहीही संबंध नाही, तर मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांचा तो परिणाम आहे असे सिन्हा ठासून सांगतात. पंडित नेहरूंपासून वाजपेयींपर्यंत देशाच्या प्रत्येक पंतप्रधानाने देशावर आलेल्या संकटाचा खंबीरपणे मुकाबला केला, मोदी सरकारमध्ये संकटांशी मुकाबला करण्याची इच्छाशक्तीच नाही अशीही टीका सिन्हा यांनी केली. ते पुढे म्हणाले, भारताने अमेरिकेपुढे शरणागती पत्करली आहे. अमेरिकेच्या आदेशाचे भारत पालन करत आहे. त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. भारतासाठी हे शोभादायक नाही, असेही मतप्रदर्शन सिन्हा यांनी केले. अमेरिका-इराण युध्दात पाकिस्तान मध्यस्थी करत होता तेव्हा विश्वगुरू कुठे होते, असाही खोचक प्रश्न सिन्हा यांनी विचारला. आज देशाचे भविष्य संकटात असताना ऑफीससमधून किंवा समाजमाध्यमांवरुन आरोप करून काही साध्य होणार नाही, त्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, अशी पुस्ती त्यांनी जोडली. काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, आताही काँग्रेसने देश वाचवावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

वाजपेयींचे सरकार असताना विरोधकांचा सन्मान केला जात होता, आता विरोधकांनी संपवले जात आहे. यातून देशात भयानक संकट उभे ठाकले आहे, या संकटाचा मुकाबला काँग्रेस पक्षच करू शकतो, ती काँग्रेसची मोठी जबाबदारी आहे, काँग्रेसने जमिनीवर उतरून मुकाबला करण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे असेही सिन्हा यांनी यावेळी म्हटले. या चर्चासत्राचा समारोप करताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी काँग्रेसला रस्त्यावर उतरून स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागणार आहे असे जाहीर करून टाकले. मध्यंतरी दिल्लीमध्ये इंडिया आघाडीची बैठक झाली. या बैठकीत राहुल गांधी यांनी केलेले भाषण काँग्रेस पक्षाने उपलब्ध करून दिले. त्यात राहुल यांनी आता सरकारविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही, असे निक्षून म्हटले. राहुल गांधी या बैठकीत म्हणाले, विरोधी पक्ष कमकुवत आहेत हे सिध्द करण्याचा प्रयत्न होत आहे. लोकांना वाटते, आपण भाजपाचा पराभव कसा करणार? पण आपण एकजुटीने उभे राहिलो, तर भाजपाला हरवणे शक्य आहे. देशात ३५ ते ३७ टक्के मतदार भाजपा आघाडीला मतदान करतात, उर्वरीत विरोधात आहेत. ज्यांना तडजोड करायची होती, ते गेले आहेत, आणखीही जाऊ शकतात. नंतर उरलेल्यांना रस्त्यावर संघर्ष करावा लागेल. भाजप सत्तेत असेपर्यंत सरकारकडून मुक्त आणि नि:ष्पक्ष वातावरणात निवडणूक घेतली जाणार नाही, म्हणूनच आपल्याला प्रतिकाराच्या भूमिकेतूनच जावे लागेल, असे राहूल गांधी यांनी म्हटले.

यशवंत सिन्हा यांचे मनोगत आणि राहुल गांधी यांचा पवित्रा एकमेकांना पूरक आहे. मात्र काँग्रेस खरोखरच रस्त्यावर उतरणार का, हा खरा सवाल आहे. आज तरी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात स्वत:ला झोकून देणाऱ्या तरूणांची फौज दिसत नाही. सरकारवर तोफा डागणारे सेनापती बापट, एस. एम. जोशी, जयप्रकाश नारायण, आचार्य अत्रे, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, प्रबोधनकार ठाकरे असे कोणी नेते समोर नाहीत. मराठी माणसांची एकजूट करण्यासाठी रस्त्यावर उतरणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आज नाहीत. इंदिरा गांधी सरकारविरूध्द देशव्यापी आंदोलन उभारणारे जयप्रकाश नारायण नाहीत. महागाईच्या विरोधात रस्त्यावर उतरणाऱ्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर किंवा कमल देसाई नाहीत. लोकपालच्या मागणीसाठी जंतरमंतरवर आंदोलन करून साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेणारे कोणी अण्णा हजारे पुढे आलेले नाहीत. कॉक्रोच जनता पार्टीने केलेल्या आंदोलनाला मिडियातून प्रसिध्दी मिळत नाही. मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरले तर पोलीस किती गुन्हे दाखल करतील याचा कल्पनही नाही. नेत्यांच्या घरी इडी, आयटी किंवा सीबीआयच्या किती नोटीसा येतील हे सांगता येत नाही. भाजपने केलेल्या पक्षफोडीनंतर विरोधी पक्ष कमजोर झाले आहेत. त्यामुळे सरकारविरोधात लढायला रस्त्यावर कोण उतरणार, असा प्रश्न पडतो. यशवंत सिन्हा यांनी एकूण सामाजिक स्थितीचे सविस्तर चित्र रेखाटले असले तरी पुढे येऊन भाजपविरोधात संघर्ष कोण करणार आणि भाजपला आव्हान कसे देणार हे स्पष्ट होत नाही.

# छत्रपती शाहू महाराज - सामाजिक न्यायाचे जनक

मंगेश चिवटे

भारताच्या इतिहासात ज्या राजांनी समाजातील गोरगरीब, मागास, उपेक्षित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिलं,त्यात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे नाव अग्रणी घेतलं जातं.राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जून,१८७४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे घाटगे घराण्यात झाला.त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर,आईचे नाव राधाबाई.राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव. दरम्यान १७ मार्च, १८८४ रोजी शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले.

मागासवर्गीयांचे जीवनमान सुधारून त्यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात **आरक्षण कायदा** लागू करून मागासवर्गीयांसाठी ५० टक्के सरकारी नोकऱ्या राखीव ठेवण्यात आल्या. याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण, जातीभेद निर्मूलन, स्त्री शिक्षणास प्राधान्य, महिला संरक्षण कायद्याची निर्मिती, विधवा पुनर्विवाहचा कायदा, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, जोगिनी व देवदासी प्रथेचे उच्चाटन, महार वतन खालसा, बलुतेदार पद्धती व बालविवाह पद्धतीवर कायद्याने बंदी हे समाजोपयोगी निर्णय अमलात आणले. म्हणूनच त्यांना **सामाजिक समतेचे प्रवर्तक** म्हटलं जातं.

शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करून समाजातील आहेरे अन् नाहीरे यातील दरी मिटविण्यासाठी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

मागासवर्गीय जाती-जमाती व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना शिक्षणाची कवाडं खुली केल्याशिवाय त्यांचा बौद्धिक, सामाजिक, आर्थिक विकास होणार नाही,हे जाणून शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचं करून त्यावरील शैक्षणिक शुल्क माफ केलं. ते थोर समाजसुधारक व लोकहितवादी राजे होते.

शाहू महाराज हे शेतकऱ्यांचे कैवारी होते.शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचे लक्ष्य गाठण्यासाठी त्यांनी *राधानगरी धरण* ची निर्मिती केली.त्यांच्या कल्पनेतून साकारलेले *कोल्हापूर टाईप बंधारे* हे आज सर्वत्र रोल मॉडेल ठरले आहेत.कृषीविषयक आधुनिक धोरणाचा प्रसार व्हावा,या उद्देशाने त्यांनी कोल्हापूर येथे *किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट* ची स्थापना केली.इतकेच नव्हे तर,शेतकऱ्यांनी शेतीसाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करावा,यासाठी त्यांनी आधुनिक अवजारांचे एक म्युझियम उभारले.शेतकऱ्यांनी उद्योगांमध्ये शिरून उद्यमशील व्हावे,असा मोलाचा उपदेश त्यांनी रयतेला दिला.शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी,यासाठी शाहू महाराज नेहमी आग्रही असत.

आपण केवळ शेतकरी व सैनिक होऊन चालणार नाही,तर उद्योजक- उद्यमशील होणे तितकेच गरजेचं आहे*,असा उपदेश त्यांनी रयतेला केला. या पार्श्वभूमीवर सन १९०६ मध्ये त्यांनी *स्पिनिंग अँड व्हिविंग मिल* तथा *राजाराम इंडस्ट्रीयल स्कूलची स्थापना केली*.याशिवाय वडिलांच्या स्मरणार्थ *जयसिंगपूर बाजारपेठ* उभारली. आपण सर्वप्रथम उद्यमशील व्हावे,यासाठी शाहू महाराजांनी आपल्या दोन्ही सुपुत्रांना उद्यमशील केलं.कोल्हापूर संस्थानात उद्योगाचे जाळे निर्माण करून लाखो लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविला.त्यामुळे आजही शाहूंची दूरदृष्टीचा राजा म्हणून जनमानसात ख्याती आहे. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात संगीत,नाट्य व चित्रपट क्षेत्रातील नामवंत कलाकारांना राजाश्रय दिला.त्यात भास्करबुवा बखले, अल्लादिया खां, केसरबाई केरकर, मोनूबाई कुर्डीकर, शालीग्राम, गोविंदबुवा, निवृत्तबुवा सरनाईक आदी कलावंत कोल्हापूर नगरीत नावरूपाला आले. त्याचप्रमाणे शाहीर विठ्ठल ढोणे, रामचंद्र माळी, लहरी हैदर हे नामवंत शाहीर तसेच बालगंधर्व, शंकरराव सरनाईक, हिराबाई बडोदेकर अशा नाट्य कलाकारांची येथे जडणघडण झाली. त्यांनी पॅलेस थिएटर उभारले. याशिवाय कागलकर पॉवर हाऊस हीदेखील शाहू महाराजांचीच देन आहे.उल्लेखनीय गोष्ट म्हणजे शाहू महाराज हे उत्तम कुस्तीगीर होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी नवोदित कुस्तीगिरांसाठी कोल्हापूर संस्थानात अनेक तालमी उभारल्या, कुस्तीचे आखाडे बांधले. त्यातून कोल्हापूर संस्थानात अनेक नामवंत मल्ल नावरूपाला आले.ही तर शाहू महाराजांची पुण्याईच म्हणावी.

शाकुंतल, मृछकटिक,मानापमान ही गाजलेली नाटके तर,पुंडलिक,राजा हरिश्चंद्र हे चित्रपट आणि कलामहर्षी दादासाहेब फाळके,दादासाहेब तोरणे,बाबुराव पेंटरसारख्या ज्येष्ठ श्रेष्ठ कलावंतांना मानाचं पान देऊन त्यांना कीर्तिमान केलं.त्यामुळे ह्या कलाकारांना आपल्या अप्रतिम अभिनयाचा जनमानसाच्या मनावर ठसा उमटवता आला.ह्या सर्व गोष्टी पाहिल्यावर शाहू महाराज हे कलावंतांचे आधारवड होते,हे दृष्टोत्पत्तीस येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शाहू महाराजांनी घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करून शाहू महाराजांनी त्यांना अर्थसहाय्य दिलं. बाबासाहेब हे बॅरिस्टर झाल्याचे कळल्यावर शाहू महाराजांना खूप आनंद झाला. त्यांनी लगेचच कोल्हापूरहून मुंबईला प्रस्थान करून बाबासाहेब ज्या डबकी चाळीत रहात होते,तेथे जाऊन त्यांची भेट घेत त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत त्यांचे अभिनंदन केलं.कोल्हापूर संस्थानाचा कीर्तिमान राजा बाबासाहेबांना मुंबईत जाऊन एका चाळीत सदिच्छा भेट घेतो. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला साधेपणा प्रकर्षाने प्रतिबिंबित होतो.महत्वाचे म्हणजे शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष राजा होते. महाराष्ट्रातील महायुती सरकारने शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाचा अंगिकार केला आहे. मागास जनजातीच्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटनांच्या मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत केलं आहे. याशिवाय मागासवर्गीय घटकांसाठी महाराष्ट्र सरकारतर्फे राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.त्याचप्रमाणे १० अन् १२ वीच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या मुला-मुलींसाठी *राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना कार्यान्वित केली आहे.

त्याचप्रमाणे गुणवत्ता प्राप्त मागास विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विदेशात जाण्यासाठी सरकारकडून सर्वप्रकारचे सहाय्य दिलं जात आहे.अशा तत्सम योजना शैक्षणिक कारणांसाठी मागास समाजाच्या मुला-मुलींसाठी राज्य सरकारने कार्यान्वित केल्या आहेत. महायुती सरकार हे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे पाईक असून, शाहू-फुले-आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते आहे. शाहू महाराज हे आमचे आदर्श असून, त्यांनी प्रज्वलित केलेली सामाजिक समतेची मशाल अखंडपणे तेवत ठेवण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.अत: आम्ही मराठीजन वंदनीय शाहू महाराजांना त्रिवार मानाचा मुजरा करतो.

**लोकसंसद**

## तरुणाईमधील नैतिक मूल्यांचा ऱ्हास

आयुष्याचा जोडीदार पसंत नसेल तर घरच्यांशी उघडपणे संवाद साधण्याचा पर्याय असताना तसेच लग्न मोडण्याचा, घटस्फोटाचा कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना, नापसंत जोडीदाराच्या हत्येचा इतका थंड डोक्याने कट रचून त्याला यमसदनास पाठवावे ही आजच्या तरुण पिढीतील क्रूर मानसिक विकृतीच म्हणावी लागेल. नुकतीच पुण्यातील लोहगड किल्ल्यावर घडलेली केतन अग्रवाल हत्या घटना असो किंवा अलीकडच्या काळात घडलेल्या अशा प्रकारच्या काही घटनांवरून हे स्पष्टपणे दिसून येत आहे. या घटनांवरून आजच्या तरुणाईमधील नैतिक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास, क्षणिक सुखासाठी, संपत्तीच्या लोभासाठी कोणत्याही थराला जाण्याची प्रवृत्ती आणि कायद्याचा नसलेला धाक स्पष्टपणे दिसून येतो. खरे तर काही लोकांमध्ये नैतिकतेची चाड मुळातच पूर्णपणे संपलेली असते. राग, वासना, लोभ या भावना इतक्या तीव्र होतात की सदसद्विवेक बुद्धीचा विसर पडतो. क्षणिक सुखासाठी हिंसक मार्ग निवडण्याची त्यांची मानसिक विकृती याला कारणीभूत ठरते. सायकोपॅथिक प्रवृत्ती असलेल्या अशा लोकांमध्ये इतरांबद्दल सहानुभूती नसते. नको असलेल्या जोडीदाराचा जीव गेल्यावरही त्यांना दुःख होत नाही, उलट त्याच्यापासून आपली सुटका झाली याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. अशा घटना रोखण्यासाठी समाजात नैतिक मूल्यांची जपणूक होणे, नातेसंबंधांमधील पारदर्शकता वाढणे आणि अशा गुन्ह्यांसाठी अत्यंत कठोर आणि जलद शिक्षा मिळणे गरजेचे आहे की जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे करण्यासाठी कोणी धजावणार नाही.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**| दिनविशेष**

# लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधमीतील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

- श्याम बसप्पा ठाणेदार, ठाणे

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२६ जून**

१) श्री. रमाकांत गजानन सावंत
चेंढरे, अलिबाग, २६-६-१९४३

२) आशा ललित ओसवाल
चेंढरे, अलिबाग, २६-६-१९५४

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ, अलिबाग**

# प्रजाहितदक्ष छत्रपती शाहू महाराज



**संजीव मोरे**

२६ जून म्हणजे छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस. अशा राजाच्या हा जन्म दिवस आहे ज्या राजाने स्व:हितापेक्षा जनहिताला प्रथम प्राधान्य दिले आहे. माझे सर्वस्व गेले तरी बेहत्तर पण माझी प्रजा सूखी राहिली पाहिजे, अशा उदात्त हेतूने प्रेरित झालेला हा राजा. या देशात असे दोनच राजे होऊन गेले की, ज्याची आठवण या देशातील जनतेच्या ह्रदयात आहे आणि ज्यांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी केली जाते ते कतृत्वाने महान राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज होत. कल्पना करा, ज्याने स्वत:च्या सत्तेपेक्षा जनतेच्या हक्कांना अधिक महत्व दिले, ज्याने राज सिंहासनावर बसून सामाजिक क्रांती घडवली. आरक्षण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी शंभर वर्षापूर्वी क्रांतिकारक निर्णय घेतले आणि त्यामुळेच हा राजा आजही जनतेच्या ह्रदयात जिवंत आहेत, ते एकमेव राजे म्हणजे राजर्षी शाहू महाराज. अशा या राजाचा जन्म सन १८७४ मध्ये कागल (कोल्हापूर) घाडगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव हे यशवंतराव असे होते आणि पुढे जाऊन ते सामाजिक न्यायाचे प्रखर पुरस्कर्ते म्हणून उदयास आले. लहान वयातच त्यांच्या आयुष्यात एक अत्यंत महत्वाचे राजकीय वळण आले.

१७ मार्च १८८४ रोजी शाहू महाराजांना कोल्हापूर गादीवर दत्तक घेण्यात आले. याचवेळी त्यांना शाहू छत्रपती हे नाव देण्यात आले आणि त्यांच्या भविष्यातील राज्य कारभाराची पायाभरणी सुरू झाली. राज्य कारभाराची जबाबदारी स्विकारण्यापूर्वी त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वत:ला सक्षम बनवले. सन १८८९ ते १८९४ दरम्यान महाराजांनी धाखाड येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. या शिक्षणामुळे त्यांच्या विचारात आधुनिकता आणि सामाजिक जाण यांचा दृढ पाया निर्माण झाला. याच काळात त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही एक महत्वपूर्ण टप्पा आला. सन १८९१ मध्ये शाहू महाराज यांचा विवाह बडोद्याचे गुणाजीराव खानवीलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात एक निर्णायक क्षण आला. २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराज यांचा कोल्हापूर संस्थानाचा राज्याभिषेक झाला आणि यादिवसापासून त्यांनी प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली आणि सामाजिक परिवर्तनाच्या युगाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.

सन १८९६ मध्ये शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात स्वस्त धान्याची दुकाने केली. या निर्णयामुळे गरीब आणि शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आणि प्रभावी राज्यकारभाराचे एक उदाहरण निर्माण झाले. यानंतर त्यांचे राज्यकारभारात सामाजिक क्रांतीला निर्णायक दिशा देणारी एक ऐतिहासिक घटना घडली. सन १८९९ मध्ये शाहू महाराज यांच्याशी संबंधीत प्रसिध्द वेदोक्त प्रकरण घडले. या प्रकरणातून ब्राह्मणेतर समाजातून धार्मिक अधिकारासाठी त्यांनी ठाम भूमिका घेतली आणि सामाजिक समतेच्या लढ्याला नवे वळण मिळाले. सामाजिक न्यायाबरोबरच त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण पाऊले उचलली. सन १९७१ मध्ये शाहू महाराज यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डींगची स्थापना केली. या वसतीगृहामुळे गरीब व वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आणि सामाजिक उन्नतीचा मार्ग अधिक खुला झाला. यानंतर त्यांचे राज्यकारभारात सामाजिक न्यायाच्या दिशेने एक अत्यंत क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला. २६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा केली. या निर्णयामुळे भारतात सामाजिक न्यायाचा एक नवा अध्याय सुरू झाला आणि बहूजन समाजाच्या सक्षमीकरणाला भक्कम दिशा मिळाली. सामाजिक सुधारणा करतांना संस्थानांच्या विकासासाठी त्यांनी पाणी व्यवस्थापन आणि शेती व्यवस्थापनासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सन १९०७मध्ये शाहू महाराज यांच्या पुढाकाराने राधानगरी धरणाच्या कामाला सुरूवात केली. या प्रकल्पामुळे सिंचन सुविधा उपलब्ध झाल्या.

शाहू महाराजांनी सामाजिक सुविधा आणि प्रबोधनाच्या चळवळीला अधिक बळ देण्यासाठी त्यांनी महत्वपूर्ण संघटनात्मक पाऊले उचलली. ११ जानेवारी १९९१ रोजी शाहू महाराज यांच्या प्रयत्नाने कोल्हापूर येथे सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. या उपकरणामुळे अंधश्रध्दा व जातीव्यवस्था यांच्या विरूध्द जनजागृती निर्माण झाली आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळीला नवीन वेग मिळाला. बहुजन व अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न करत नवीन शैक्षणिक सुविधा उभारल्या. सन १९९९ मध्ये शाहू महाराज यांनी मिस क्लार्क होस्टेलची स्थापना केली. या वसतीगृहामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित निवास व शिक्षणाची संधी मिळाली आणि सामाजिक समतेच्या ध्येयाला अधिक बळ प्राप्त झाले.

३१ जानेवारी १९२० छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुकनायक या वृत्तपत्राला २५००/- रूपये आर्थिक मदत केली. या आर्थिक सहकार्यामुळे दलितांच्या प्रश्नांना सार्वजनिक व्यासपीठ मिळाले आणि सामाजिक जागृतीच्या चळवळीला नव्याने बळ प्राप्त झाले. अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीला संघटीत दिशा देण्यासाठी त्यांनी नेतृत्वाची महत्वपूर्वक भूमिका बजावली. मार्च १९२० दरम्यान छत्रपती शाहू महाराज यांनी माणगांव येथे झालेल्या अस्पृश्य निवारण परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. याच परिषदेत त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व दलितांचे नेतृत्व करावे कारण त्यांना त्यांच्यात नेतृत्वाचे गुण दिसत होते. शिवाय त्यांनी भरसभेत स्पष्ट केले की, डॉ. आंबेडकर हे अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्व असून ते भविष्यात संपुर्ण देशाचे नेतृत्व करू शकतील असे भाकीत देखील त्यांनी वर्तवले आणि खरोखरच डॉ. आंबेडकर हे पुढे देशाचे महत्वाचे नेते म्हणून उदयाला आले.

सामाजिक न्याय आणि जनकल्याणासाठी आयुष्यभर झटणाऱ्या या महान राजाचा जीवन प्रवास अखेर संपला. ६ मे १९२२ रोजी शाहू महाराज यांचे मुंबईत पन्हाळा लॉजवर निधन झाले. त्यांच्या या अकाली निधनामुळे समाज सुधारणेच्या चळवळीला फार मोठे नुकसान पोहोचले, एक मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु, त्यांची विचारसंपदा आणि कार्य आजही प्रेरणादायी ठरते. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांचा जीवनप्रवास हा केवळ एका राजाचा इतिहासच नाही, तर तो आहे सामाजिक न्याय, समता आणि जनकल्याणाची प्रेरणादायी कथा.

शिक्षण, आरक्षण आणि अस्पृश्यता निवारण्याच्या माध्यमातून शाहू महाराज यांनी दाखवून दिले की, खरा राजा तोच जो आपल्या सत्तेपेक्षा जनतेच्या हक्कांना अधिक महत्व देतो. त्यांचे आयुष्य आपल्याला शिकवते. समाजात बदल घडवायचा असेल तर धाडसी निर्णय, प्रगत विचार, आणि जनतेच्या प्रती असलेली खरी बांधिलकी आवश्यक असते. म्हणूनच आजही शाहू महाराज हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्व नाही तर ते आहेत सामाजिक क्रांतीचे प्रतीक, एक प्रेरणा, एक मार्गदर्शक. चला त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात उतरवूया आणि समानता, शिक्षण व सामाजिक जबाबदारी यांच्या माध्यमातून एकूण, देशाच्या प्रगतीसाठी आपला वाटा निश्चित करूया. आज शाहू महाराजांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या पवित्र आणि पावन स्मृतींना अभिवादन करूया.

पान १ वरून

## ‘राम-लखन’ला शेकापचा अल्टिमेटम

कदापि सहन करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देहेन-भाकरवड हा पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत आहे. या गावाला जोडणारा पूल शासनाच्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आला होता. त्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती प्राप्त झाली. या पुलाचे काम सप्टेंबरपासून सुरू झाले. पर्यायी पूल बांधून देण्यात आला होता. मात्र, दहा महिने होत आले, तरी पुलाचे काम पूर्ण झाले नाही. मंगळवारपासून जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. या पावसात बुधवारी सकाळी पर्यायी पूल वाहून गेला. त्यामुळे शाळकरी मुलांसह वयोवृद्ध नागरिक, महिलांचे प्रचंड हाल झाले. दोन्ही गावांचा संपर्क तुटल्याचा त्रास नागरिकांना झाला. ही बाब शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या निदर्शनास आली. त्यांनी गुरुवारी सकाळी घटनास्थळी धाव घेतली. तेथील ग्रामस्थ, महिलांना भेटून त्यांच्यासोबत संवाद साधला. त्यांची समस्या जाणून घेतली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त करीत चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, या पुलाचे काम अद्याप झाले नाही. त्यामुळे दोन गावांचा संपर्क तुटला आहे. रुग्णांना कसे न्यायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थ्यांची शाळा बुडाली. या गावांमध्ये पाण्याचा प्रश्न आहे. त्यानंतर सुरु असलेल्या पुलाच्या कामाची माहिती घेतली. सप्टेंबरमध्ये कार्यादेश असताना दहा महिन्यांत काम का पूर्ण झाले नाही, असा संतापजनक सवाल चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला.

यावेळी अलिबाग तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, अनिल पाटील, विलास म्हात्रे, विजय पाटील, कौशिक पाटील, मोरा गुरुजी, दिगंबर म्हात्रे, निलेश चवरकर, विक्रांत वार्डे यांच्यासह इतर मान्यवर, ग्रामस्थ शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म्हसळ्याचे ग्रामीण रुग्णालय ‘आजारी’

वैद्यकीय सेवा मिळत नाही. गंभीर रुग्णांना उपचारासाठी अन्य ठिकाणी धाव घ्यावी लागत असून, आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधांचीदेखील प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. एक्स-रे मशीन असले तरी त्याद्वारे केवळ छातीचा एक्स-रे काढला जात असल्याची माहिती आहे. तसेच रक्त तपासणीसाठी आवश्यक असलेली सीबीसी मशीन उपलब्ध असूनही तिचा वापर होत नसल्याची बाबही समोर आली आहे. त्यामुळे अनेक तपासण्यांसाठी रुग्णांना खासगी प्रयोगशाळांचा आधार घ्यावा लागत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, आपत्कालीन सेवेसाठी असलेली १०८ रुग्णवाहिका महिन्यातील बहुतांश दिवस बंद अवस्थेत असल्याचे सांगितले जात आहे. ग्रामीण भागातील अपघातग्रस्त किंवा गंभीर रुग्णांसाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची असताना तिचा नियमित लाभ नागरिकांना मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

प्रसूतीनंतर महिलांसाठी आवश्यक असलेला स्वतंत्र कक्ष नसल्याने मातांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. इतकेच नव्हे तर, रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना पिण्याच्या पाण्याचीही पुरेशी व्यवस्था नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयातील मूलभूत सुविधांबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, ३० बेड क्षमतेची सुसज्ज इमारत असलेल्या या रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी शासनाने ७० लाख ३२ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र, इमारतीवर लाखो रुपयांचा खर्च करण्यापेक्षा त्या इमारतीत सेवा देणारे डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारी उपलब्ध करून देणे अधिक गरजेचे असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

‘‘इमारतींच्या दुरुस्तीसाठी निधी मिळतो, पण रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर आणि कर्मचारी कुठे आहेत?’’ असा संतप्त सवाल आता तालुक्यातील नागरिक उपस्थित करत आहेत. आरोग्य व्यवस्थेतील या गंभीर त्रुटींकडे शासन आणि आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देऊन रिक्त पदे भरावीत, अन्यथा ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हसळा ग्रामीण रुग्णालयातील मनुष्यबळाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून, केवळ इमारती नव्हे तर आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.

## परत आलात तर मारुन पाठवेन

आईवरुन शिवीगाळ केली.

आता येऊ नका माझ्याकडे. आलात तर मारणार, अशी थेट धमकीच त्यांनी पत्रकारांना दिली. मी आता जे बोलतोय, ते रेकॉर्ड करुन ठेवा. तुम्ही आता माझ्याकडे विचारायला आलात तर मार खाणार. हे लिहून घ्या. रेकॉर्ड करा. माझ्याकडे आलात तर मार खाणार. काय तक्रार करायची आहे ती करा. पोलिसांसमोर सांगतोय. बस झालं आता, खूप सहन केलं, अशा शब्दांत पाटलांनी पत्रकारांना धमकावलं. अवघ्या चार दिवसांपूर्वी शिंदेसेनेत गेलेल्या, सत्ताधारी झालेल्या पाटील यांनी पत्रकारांना थेट मारुन टाकण्याची धमकी दिली.

शिंदेसेनेत गेल्यापासून संजय पाटील वादात

दोन दिवसांपूर्वीही संजय पाटील यांनी धमकीची भाषा वापरली होती. माझ्या नादाला लागू नका. मी याआधी पाच लोकांना ठार केलंय आणि आता आंदोलन केल्यास घरात घुसून बॉम्ब टाकेन, अशी थेट धमकी खासदार पाटील यांनी दिली होती. याप्रकरणी शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांना पत्र लिहिलं आहे. संजय पाटलांवर कारवाई करा, अन्यथा मला कोर्टात जावं लागेल, असा सूचक इशारा राऊतांनी पत्रातून दिला आहे.

## लोणावळा-अलिबाग एसटीचा अपघात

काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अपघाताच्या वेळी बसमध्ये एकूण ५२ प्रवासी प्रवास करत होते. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही किंवा कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेत एसटी बसचे नुकसान झाले असून, प्रवाशांना मोठा धक्का बसला.

दरम्यान, वारंवार घडणाऱ्या अशा अपघातांच्या पार्श्वभूमीवर एसटी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधित विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## जुलैच्या पहिल्या आठवड्यात एनडीआरएफ रायगडात

महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संभाव्य आपत्तीचा धोका लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने यंदा पूर्वतयारीवर भर दिला आहे. विशेषतः दरडप्रवण आणि पूरग्रस्त भागांवर लक्ष ठेवण्यात येत असून, स्थानिक प्रशासन, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि पोलीस दल यांच्याशी समन्वय साधून उपाययोजना करण्यात येत आहेत.

दरम्यान, एनडीआरएफचे २० हून अधिक प्रशिक्षित जवान महाड येथे तैनात राहणार असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने बचाव आणि मदतकार्य सुरू करता येणार आहे. त्यामुळे संभाव्य नैसर्गिक संकटाच्या काळात जिल्ह्याला मोठा आधार मिळणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर रायगड प्रशासनाने सज्जतेचा इशारा दिला असून, नागरिकांनीही सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दि.बांच्या नावासाठी शेकाप आक्रमक

येथील रिल्स स्टार रश्मिता पोपेटा यांनी चिंचपाडा येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवसापासूनच विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि दि.बा. पाटीलप्रेमींनी उपोषणस्थळी गर्दी करण्यास सुरुवात केली असून, आंदोलनाला सर्व स्तरातून वाढता पाठिंबा मिळत आहे. उपोषणस्थळी भेट देताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी भाजपवर टीका करत, समाजाच्या भावनांशी प्रामाणिक राहण्याची वेळ आली आहे. लोकप्रतिनिधींनी केवळ सत्तेच्या दबावाखाली न राहता समाजाच्या न्याय्य मागणीसाठी उभे राहिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. यावेळी त्यांनी रश्मिता पोपेटा यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन केले.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी बाळाराम पाटील यांच्याशी संपर्क साधून आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. आंदोलन अधिक तीव्र होण्यापूर्वी शासन स्तरावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्यानंतर शेकाप नेते अतुल म्हात्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला. यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके, शेकाप नेते राजेश केणी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

दि. बा. पाटील यांच्या नावाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रायगड जिल्हा शाखेनेही जाहीर पाठिंबा दिला आहे. जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, ज्येष्ठ नेते केसरीनाथ पाटील, उपाध्यक्ष अतुल चव्हाण, शहराध्यक्ष सुजित सोनवणे यांच्यासह मनसे पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंब्याचे लेखी पत्र सादर केले. दरम्यान, लोकनेते दि.बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील यांनीही उपोषणस्थळी भेट देऊन रश्मिता पोपेटा यांची विचारपूस केली. मात्र, या भेटीनंतरही आंदोलनकर्त्यांमधील काहींनी नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले.

**‘आये आयलू’च्या घोषणांनी दादूसने रंगवले वातावरण**

लोकगीतांचा लोकप्रिय गायक संतोष दादूस उर्फ संतोष चौधरी यांनीही उपोषणस्थळी भेट देत आंदोलनाला पाठिंबा दिला. ‘‘आये आयलू‘‘च्या घोषणांनी आणि आगरी बोलीतील गीतांनी त्यांनी आंदोलनस्थळावरील वातावरण भारावून टाकले. त्यांच्यासोबत मुंबईतील अनेक कलाकारही उपस्थित होते. दिवसभर गंभीर आणि चिंतेचे वातावरण असताना दादूस यांच्या उपस्थितीने आंदोलनकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले. सुमारे अर्धा तास त्यांनी सादर केलेल्या गीतांमुळे आंदोलनस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## कुरुळजवळ अपूर्ण रस्ता ठरतोय जीवघेणा

धरल्यानंतर या समस्येची तीव्रता आणखी वाढली आहे. अपूर्ण रस्त्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे निर्माण झाले असून, वाहनांना या खड्ड्यांमधून मार्ग काढावा लागत आहे. दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. अनेकदा वाहनांना खड्ड्यांचा जबरदस्त धक्का बसत असून, वाहनांचे नुकसान होण्याच्या घटना घडत आहेत. तसेच अचानक खड्डे चुकविताना किंवा वाहनांवर नियंत्रण ठेवताना अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

याशिवाय, काही ठिकाणी सिमेंट काँक्रिटचा उंच रस्ता आणि त्यानंतर अचानक सुरू होणारा डांबरी रस्ता यामध्ये मोठी उंचीची तफावत असल्याने वाहने जोरात आदळत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्यास ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत आहे. वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघाताची शक्यता वाढली असून, कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून वारंवार तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. कोट्यवधी रुपयांचा प्रकल्प असूनही कामातील संथगती, अपूर्णता आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना शेकापचे युवा नेते अवधूत पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला. कुरुळ परिसरातील रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने नागरिक आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा संबंधित विभागाने तातडीने काम पूर्ण करून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, कुरुळ परिसरातील अपूर्ण रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून वाहनचालकांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

## जातवैधता प्रमाणपत्रे रखडली

प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर २१ नोव्हेंबर २०१६ पासून जिल्हानिहाय कार्यालये कार्यरत झाली. सध्या राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ही कार्यालये असून, कोकण विभागात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे आणि पालघर येथे समित्या कार्यरत आहेत. अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय तसेच विविध प्रवर्गांतील विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी करून त्यांना जातवैधता प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी या समित्यांवर आहे.

अर्जदाराने ऑनलाइन अर्ज सादर केल्यानंतर त्याची छापील प्रत व आवश्यक कागदपत्रे कार्यालयात जमा करावी लागतात. त्यानंतर समितीमार्फत संबंधित कागदपत्रांची तपासणी, पडताळणी आणि विविध विभागांकडून अहवाल मागविण्याची प्रक्रिया राबविली जाते. मात्र याच टप्प्यावर मोठ्या प्रमाणात विलंब होत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, दहावी आणि बारावीच्या निकालानंतर उच्च शिक्षण, अभियांत्रिकी, डिप्लोमा, वैद्यकीय तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू झाली आहे. अशा प्रवेश प्रक्रियेत जातवैधता प्रमाणपत्र हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज असल्याने जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी वाढत आहे. मात्र, प्रमाणपत्र मिळण्यात होणाऱ्या विलंबामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

माहितीनुसार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यांतील जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे एकूण ३ हजार ९७६ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. त्यापैकी केवळ ४२२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, ३ हजार ५५४ प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे, रायगड जिल्ह्यात प्राप्त झालेल्या १ हजार ७० प्रकरणांपैकी तब्बल ९४२ प्रकरणे अजूनही निकाली निघालेली नाहीत.

रायगड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय पूर्वी अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे होते. मात्र, इमारत धोकादायक घोषित झाल्यानंतर हे कार्यालय सध्या चेंढरे येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. सध्या अकरावी-बारावी विज्ञान शाखा, अभियांत्रिकी आणि डिप्लोमा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठी लगबग सुरू आहे. अशावेळी आवश्यक त्रुटींची पूर्तता वेळेत होत नसल्याने अनेक अर्ज रखडल्याची बाब समोर आली आहे.

मे महिन्यात शाळांना सुट्टी असल्यामुळे पडताळणीसाठी पाठविण्यात आलेले दाखले वेळेवर प्राप्त झाले नाहीत. याशिवाय तहसील कार्यालयांकडून आवश्यक असलेले गाव नमुना क्रमांक १४ चे दाखले आणि इतर अहवाल वेळेत उपलब्ध न झाल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. विविध स्तरांवर आवश्यक माहिती आणि कागदपत्रे वेळेवर न मिळाल्यामुळे पडताळणी प्रक्रियेला खीळ बसल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधित विभागांकडून अपेक्षित तत्परता दाखविली जात नसल्याचा आरोप होत असून, त्याचा सर्वाधिक फटका व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. काही विद्यार्थ्यांनी अर्ज उशिरा सादर केल्यानेही प्रकरणे प्रलंबित राहिल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड**

**कोटेशन**

मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या खालील नमुद केलेल्या कामाकरीता इच्छुक पुरवठादारांकडून कोटेशन मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कोरी निविदा पत्रकाची किंमत | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मुरूड नगरपरिषदचे JCB MH06BU ४७०८ या गाडीचे दुरूस्ती करणे | १०० | ५०० |
| २. | मुरूड नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन जागेवरील weighBridge चे दुरूस्ती करणे बाबत. | १०० | ५०० |

१. कोरी निविदा पत्रके दिनांक २९/०६/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.
२. सदर कामाची इसारा रक्कम रोख स्वरुपात दिनांक ०६/०७/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत येईल.
३. सदर कामांच्या निविदा दिनांक ०६/०७/२०२६ रोजी पर्यंत सायं. ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत येतील.
४. प्राप्त निविदा दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यांत येतील.
५. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदांबाबत कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

म्यु.जा.क्र.३०४/आरोग्य/२०२६-२७
मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरुड जंजिरा, जि.रायगड
दिनांक :- २५/०६/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend. 9/26-27 RFX 7000040494 | Work of AMC for servicing/ repairing/ overhauling of various make 36kV breaker and supply of parts for the same at various S/stn under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 26-27 & 27-28 **Tender Fee: Rs. 5000/-+ GST** | Limited to Rs. 150.00 Lakhs |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 24.06.2026 to 09.07.2026 up to 11:00 hrs, Opening date: 09/07.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
**Tel No.** 022- 27459624, **Mob. No.** 8412050202
**E-mail ID** se7200@mahatransco.in

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# विद्यार्थ्यांचे प्रवेश धोक्यात

## बहुजन विद्यार्थी संघटना आक्रमक; तहसीलदारांना निवेदन



| पाली | प्रतिनिधी |

उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयीन प्रवेशासाठी अत्यंत आवश्यक असणारे जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात प्रशासकीय त्रुटींमुळे प्रचंड अडथळे निर्माण होत आहेत. ५० वर्षांपूर्वीचे जुने जन्म-मृत्यूचे अनुसूचित जातीत असल्याचा पुरावा दर्शवणारे महसुली दस्तावेज केवळ मोडी लिपीत उपलब्ध आहेत. मात्र, सुधागड तहसीलदार कार्यालयाकडे हक्काचा मोडी लिपी वाचक उपलब्ध नसल्याने शेकडो गरीब व वंचित विद्यार्थ्यांचे प्रवेश धोक्यात आले आहेत. या गंभीर समस्येकडे शासन आणि प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा संताप व्यक्त करत बहुजन विद्यार्थी संघटनेने बुधवारी (दि. २४) निवासी नायब तहसीलदारांना निवेदन सादर केले.

यावेळी बहुजन विद्यार्थी संघटनेचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष निशांत पवार, सुधागड तालुका अध्यक्ष ॲड. सुशिल गायकवाड, उपाध्यक्ष अक्षय गायकवाड, संपर्क प्रमुख चेतन भालेराव तसेच जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुरेश गायकवाड, निसार चौधरी आणि मिलिंद तुकाराम शिंदे यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन देण्यात आले आहे. सध्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू असून, अनुसूचित जाती आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अलिबाग येथील जात वैधता कार्यालय समाज कल्याण विभागाकडून ५० वर्षांपूर्वीचे जुने पुरावे मागवले जातात. हे जुने महसुली व कुळ वहिवाट विभागातील रेकॉर्ड्स केवळ मोडी भाषेत उपलब्ध आहेत. हे दस्तावेज वाचून त्याचा अधिकृत अनुवाद करून देणारे तज्ज्ञ वाचक शासकीय पातळीवर उपलब्ध नसल्यामुळे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सरकार आणि प्रशासनाला बहुजन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याची काहीही चाड उरलेली नाही, असा थेट आरोप आंदोलनकर्त्यांनी व निवेदनकर्त्यांनी यावेळी केला. तसेच, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे एकाही विद्यार्थ्याचे ॲडमिशन रद्द झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील दिला आहे.

**प्रशासकीय त्रुटींमुळे प्रचंड अडथळे**

### प्रशासकीय भूमिका

या संदर्भात सुधागड-पालीचे नायब तहसीलदार भारत फुलपगारे यांना आंदोलनकर्त्यांनी विचारले असता त्यांनी सांगितले की, तहसीलदार कार्यालयामार्फत मोडी वाचक उपलब्ध करून घेण्यासाठी आम्ही आमच्या पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. या समस्येबाबत आणि मोडी लिपी वाचकांच्या कमतरते बाबत आम्ही वरिष्ठ पातळीवर सविस्तर अहवाल पाठवून कळविले आहे, असे सांगण्यात आले.

> **तहसीलदार कार्यालयात तात्काळ आणि कायमस्वरूपी मोडी लिपी वाचकाची नियुक्ती करण्यात यावी. मोडी लिपी वाचक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी मार्ग किंवा मुदतवाढ मिळवून द्यावी.**
> **- बहुजन विद्यार्थी संघटना**

## रस्त्यावरील खड्ड्यांमुळे पावसाळ्यात त्रास

**खोपोली** : वन विभागाच्या परवानगीअभावी ताकई फाट्यावरून अष्टविनायकापैकी वरदविनायकाचे मंदीर असलेल्या महड गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वनविभागाने डांबरीकरण करू न दिल्यामुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे पहिल्याच पावसात या खड्ड्यांना तलावाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने नागरीकांमधून संताप व्यक्त होत आहे. महड गावातून ताकई फाट्यावर जोडणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असून, तो पेण-खोपोली रस्त्याला जोडणारा रस्ता आहे. श्री वरदविनायकाच्या दर्शनासाठी एक्सप्रेसवरून किंवा अलिबाग येणारे भाविक येथूनच जातात. तसेच, पुंडलिकाच्या मंदीरातही दशक्रिया विधीसाठी दररोज लोक येतात. त्याचप्रमाणे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पादचाऱ्यांना या रस्त्यावर चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

## नौपाडा स्मशानभूमीसाठी भूखंडाची मागणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

नौपाडा गावासाठी आजघडीला स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गावासाठी पूर्वी स्मशानभूमीची व्यवस्था होती; मात्र, सिडकोच्या नियोजनातील त्रुटींमुळे ती जागा संपादित करण्यात आली. एमजीएम रुग्णालयासाठी भूखंड देताना त्यामध्ये स्मशानभूमीची जागाही समाविष्ट झाल्याने नौपाडा गाव स्मशानभूमीच्या सुविधेपासून वंचित राहिले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नौपाडा गावाला पर्यायी स्मशानभूमीसाठी स्वतंत्र भूखंड उपलब्ध करून देणे आवश्यक होते. मात्र, सिडकोने याबाबत योग्य ती कार्यवाही न करता वर्षानुवर्षे टाळाटाळ केल्याने आजतागायत गावासाठी स्मशानभूमीचा भूखंड उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण असून ही समस्या तातडीने सोडविण्याची मागणी होत आहे. नौपाडा गावातील नागरिकांच्या या मूलभूत प्रश्नासाठी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

## सखल भागात पाणी तुंबले

**खांदा कॉलनी** : सोमवार पासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी तुंबण्याचे प्रकार घडले आहेत. मोठ्या प्रमाणात कोसळलेल्या पावसामुळे काही ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. अनेक ठिकाणी पालिकेकडून समाधानकारक अशी नाले सफाई झाली नसल्यामुळे, तसेच अनेक ठिकाणी रस्त्याच्या काँक्रीटीकरण व गटारांची कामे सुरू असल्याने शहरातील अनेक भागात पाणी साठण्याचे प्रकार घडले. त्यामुळे अनेकांची चांगलीच धावपळ झाली.

## पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांना निरोप



| पेण | प्रतिनिधी |

पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांची कालमर्यादेनुसार महाड ग्रामीण पोलीस ठाण्यात बदली झाली असून, त्यांच्याजागी महाड पोलीस ठाण्यातून पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यानिमित्ताने पेण पोलीस ठाण्याच्या सभागृहात निरोप व स्वागत समारंभाचेआयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुंद हे होते. कार्यक्रमात पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील, शांतता समितीचे सदस्य तसेच पोलीस कर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी गेल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यशैली, शिस्तप्रियता आणि जनसंपर्क याबद्दल अनेकांनी भावना व्यक्त केल्या. नवीन नियुक्त झालेले पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी आपल्या भाषणात संदीप बागुल यांनी निर्माण केलेली शिस्त आणि कामकाजाची पद्धत कायम ठेवत नागरिकांच्या सहकार्याने उत्तम कार्य करण्याची ग्वाही दिली. तर, निरोप समारंभात बोलताना संदीप बागुल यांनी आपल्या कार्यकाळात पोलीस कर्मचारी, पत्रकार, शांतता समितीसदस्य, पोलीसपाटील आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भविष्यात पुन्हा पेणमध्येकाम करण्याची संधी मिळाल्यास आनंदाने ती स्वीकारेन, असेही त्यांनी सांगितले.

## दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी बससेवा



| माणगाव | प्रतिनिधी |

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शैक्षणिक प्रवासासाठी प्राप्त झालेल्या टाटा विंगर स्कूल बसचे उद्घाटन सोमवारी (दि.२३) पार पडले. सुमन रमेश तुलसीयानी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या उदार सहकार्याने विद्यालयाला ही स्कूल बस प्राप्त झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची दीर्घकालीन गरज पूर्ण होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तुलसीयानी ट्रस्ट हेड ॲडमिनिस्ट्रेशन अँड प्रोजेक्ट मनीष रूपानी, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक, शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील, नाना पालकर स्मृती समिती सहसचिव प्रवीण पाटील, माणगाव पोलीस निरिक्षक संजय बांगर, दीपक जाधव, सतीश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. बसच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रवासाला नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रवासाला नवी दिशा, हा संदेश देत हा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

## वडिलांना लाकडी काठीने मारहाण

**पनवेल** : मुलाने वडिलांना काठी आणि लोखंडी कोयत्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना पनवेलमध्ये घडली. विकी नारायण विटकर असे मारहाण करणाऱ्या मुलाचे नाव असून, त्याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातील फिर्यादी नारायण किसन विटकर हे सोमटणे येथे राहत असून, त्यांचा मुलगा विकी विटकर याने त्यांना दारूच्या नशेत शिवीगाळ केली आणि लाकडी काठी व लोखंडी कोयत्याने डोक्यावर, तोंडावर मारून त्यांना जखमी केले.

## रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा

**रोहा** : रोटरी क्लब ऑफ रोहाच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात संपन्न झाला. यावेळी दिनेश जैन यांनी अध्यक्षपदी, आशिष दळवी यांची सचिवपदी तर अशोक पार्टे यांनी खजिनदारपदी निवड करण्यात आली. यावेळी नवीन कार्यकारिणीतील इतर पदाधिकाऱ्यांनीही पदग्रहण केले. या सोहळ्यासाठी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट नितीन ढमाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. असिस्टंट गव्हर्नर इलेक्ट मधुबाला निकम यांची विशेष उपस्थिती लाभली. या सोहळ्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोह्यातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये रोहा अष्टमी नगर परिषदेच्या अध्यक्षा वनश्री शेडगे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रोहा कार्याध्यक्ष समीर शेडगे, इस्रो भेटीसाठी निवड झालेली विहान तेलंगे, ज्येष्ठ गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, वाचनालयाचे अध्यक्ष किशोर तवाडे, राजेंद्र जाधव, सागर जैन, विश्वजीत लुमन, उद्धव आव्हाड, दिलीप सोलंकी आदींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात रोटरीच्या समाजोपयोगी कार्याची दिशा अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## राजेंद्र कोथे यांना एसीपीची जबाबदारी



| कळंबोली | प्रतिनिधी |

नवी मुंबई पोलीस दलातील कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोथे यांची नवी मुंबई डायल ११२ शाखेच्या "सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी)" पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल पोलीस विभागासह सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राजेंद्र कोथे यांनी आपल्या सेवाकाळात कळंबोली हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी कारवाई करणे, नागरिकांना न्याय व सुरक्षितता मिळवून देणे तसेच पारदर्शक व लोकाभिमुख पोलीस प्रशासन राबविणे यामध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या डायल ११२ या आपत्कालीन सेवा व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वगुणांचा लाभ नव्या जबाबदारीतून अधिक प्रभावीपणे मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मालधक्का जलमय

**खांदा कॉलनी** : पनवेल शहरात मंगळवारी संध्याकाळपासून सुरू झालेल्या पावसाने रात्री मुसळधार स्वरूप धारण केल्याने अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. मालधक्का परिसरातील नाल्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते, तर नाल्याच्या कडेला कचऱ्याचे ढीगही दिसून आले. पावसाचे पाणी वेगाने बाहेर काढण्यासाठी प्रशासनाकडून पंपाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, सकाळच्या वेळेत पंप चालविण्याची जबाबदारी असलेली व्यक्ती घटनास्थळी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पाणी निचऱ्याच्या कामात विलंब झाल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये होती.

## स्मृतिप्रीत्यर्थ शालेय साहित्याचे वाटप



| उरण | प्रतिनिधी |

कै. जनार्दन शंभा घरत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सेंट्रल स्कूल जसखार येथे शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील १०० विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. सूरज मढवी यांनी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करण्याचा संदेश दिला. याप्रसंगी जसखार गावाचे माजी सरपंच रमाकांत म्हात्रे यांनी प्रस्ताविकामध्ये कै. जनार्दन शंभा घरत यांच्या सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले सर्व शालेय साहित्य उद्योगपती जगदीश घरत यांनी उपलब्ध करून दिले. तसेच, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

**अभिनयानंतर पत्रकारिता क्षेत्रात पाऊल** | **प्रथम श्रेणी पटकावून घवघवीत यश**

## मनाली करणची उत्कृष्ट कामगिरी



| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील तेलंगे गावची तरुणी मनाली करण हिने पत्रकारिता क्षेत्रात आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर मे महिन्याच्या अंतिम परीक्षेत थेट प्रथम श्रेणी पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

दर्जेदार पत्रकार घडवणाऱ्या नाशिक येथील भारत सरकार मान्यता प्राप्त, नीती आयोग व जिल्हा निबंधक कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या "दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार अकॅडमी"चा वृत्तपत्र विद्या पदविका परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला आहे. त्यात मनालीने हे यश मिळवले आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा कृतिका मराठे यांच्या हस्ते व स्वाक्षरीने तिला अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पत्रकारितेत पाऊल ठेवण्यापूर्वी मनालीने सांस्कृतिक आणि रंगभूमीच्या क्षेत्रातही आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. एका नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून पुढे येत असलेल्या या तरुणीच्या याचे कौतुक सध्या सर्वत्र केले जात आहे. यापूर्वी तिने "लढा", "मेलो डोलो मारून गेलो", "आता हो म्हण", "निर्णय", "कोकणचा पोर" आणि "एकलव्य" अशा विविध नाटकांमध्ये उत्कृष्ट काम केले आहे. तसेच, "कोकणची राधा नमन" आणि "पी.टी. केस" या शॉर्ट फिल्म्समध्येही तिने चमकदार कामगिरी केली आहे. यापूर्वी सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय राहिलेल्या मनालीने पत्रकारिता क्षेत्रात काम करत असतानाच, या क्षेत्राची अधिकृत पदविका प्राप्त करावी, असा खंबीर निर्णय घेतला होता.

या तरुणीने कला आणि पत्रकारिता अशा दोन्ही क्षेत्रांत मिळवलेल्या घवघवीत यशामुळे तिच्या कुटुंबातील सदस्यांसह संपूर्ण तालुक्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. एका ग्रामीण भागातील तरुणीने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश खेचून आणल्यामुळे तिचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून, राजकीय नेत्यांकडून आणि हितचिंतकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> **कला असो वा पत्रकारिता, समाजाचे वास्तव मांडणे हेच माझे ध्येय आहे. एक लेखणीधारकरूपे समाजातील अन्यायाविरुद्ध सडेतोड आसूड ओढणे, तसेच ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब, सामान्य जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते न्याय्य पातळीवर सोडवणे हाच माझा मुख्य उद्देश आहे. तळागाळातील नागरिकांचा बुलंद आवाज बनून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी मी सदैव कटिबद्ध राहीन.**
> **- मनाली करण**

# निवडक



## ॲड. रंजना भोसले यांचा सत्कार

**पाली** : नुकत्याच पार पडलेल्या बार काउन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा निवडणुकीत ॲड. रंजना भोसले यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या निवडणुकीत त्यांनी प्रथम पसंतीची सर्वाधिक मते मिळवीत विजय संपादन केल्यामुळे त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे. विजयानंतर पहिल्यांदाच ॲड. रंजना भोसले यांनी रविवारी (दि.२२) सुधागड तालुक्याला भेट दिली. यावेळी ढोकशेत येथे त्यांच्या विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचा सत्कार करण्यासाठी ॲड. सुशील गायकवाड आणि ॲड. दीपिका गायकवाड यांच्यासह आरपीआय नेते सुनिल गायकवाड, शांताराम जाधव, ॲड. प्रफुल्ल सोनावणे, लोणावळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष जयेश देसाई यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ आणि वकील बांधव उपस्थित होते. ॲड. रंजना भोसले यांनी मिळवलेले हे यश ही केवळ त्यांची वैयक्तिक उपलब्धी नसून, सुधागडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी घटना असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



## रोहिदास वाड्यातील वीज केबल दुरुस्त

**पनवेल** : शहरातील रोहिदास वाडा परिसरातील आदित्य महादेव, मारुती आर्केड, जय श्रीराम, सनशाईन वसुंधरा तसेच इतर अनेक इमारतींमध्ये बुधवारी दि.२४ रोजी रात्रीपासून पहाटे ४ वाजेपर्यंत वीज केबलमध्ये बिघाड झाल्याने वीजपुरवठा कमी-जास्त होत होता. परिणामी पाण्याचे पंप आणि लिफ्ट सेवा देखील बंद पडली होती. या समस्येबाबत गुरूवारी (दि.२५) सकाळी परिसरातील काही रहिवाशांनी नगरसेवक राजू सोनी, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी तसेच त्यांचे सहकारी मंदार देसाई यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता सातपुते यांच्याशी संपर्क साधून पाठपुरावा केला. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी एमएसईबी कार्यालयाजवळील दत्त मंदिर डीपी ते पोटे मसाले डीपी दरम्यानची खराब झालेली थ्री-फेज केबल बदलून दिली. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला असून पाणीपुरवठा आणि लिफ्ट सेवा पूर्ववत सुरू झाली आहे.




## सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन भेट

**पनवेल** : के.व्ही. कन्या हायस्कूलमध्ये रोटरी क्लबच्यावतीने सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन प्रदान करून सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या कार्यक्रमाला क्लबचे अध्यक्ष निलेश पोटे, हितेश राजपूत, व्ही.सी. म्हात्रे, चारूदत्त भगत, ऋग्वेद कांडपीळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान शाळेच्या मुख्याध्यापिकांनी व्ही.सी. म्हात्रे, अध्यक्ष निलेश पोटे तसेच रोटरी क्लबचे आभार व्यक्त करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. उपस्थितांनीही या उपक्रमाचे स्वागत करत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

## ममता थोरे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**माणगाव** : नगरसेविका ममता थोरे-शेट यांनी एलएलबी हि मानाची पदवी संपादन केली असून, त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नगरसेविका ॲड. ममता थोरे-शेट यांनी वकील होण्याचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अथक परिश्रम, जिद्द, ध्येय, चिकाटी ठेवून माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयातून एलएलबीचे शिक्षण घेतले. ही परीक्षा त्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून वकील होण्याचा मान मिळविला आहे. ममता थोरे-शेट या गेली साडेचार वर्षांपासून माणगाव नगरपंचायतीच्या नगरसेविका आहेत. त्यानंतर त्यांनी वॉर्डातील विकासकामांना प्राधान्य देऊन विविध विकासाची कामे केली. त्याचबरोबर गुणवंतांचा आदर सन्मान करण्यातही त्या आग्रेसर असतात. त्यांना समाजसेवेची प्रचंड आवड असल्याने त्या वकील झाल्याने बहुजन समाजातील नागरिकांच्या आशा आता पल्लवित झाल्या आहेत.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : रु १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फॅमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- **रखवालदार/सफाईकामगार** पाहिजे संपर्क-८७८८०२१५१०
- **ड्रायव्हर पाहिजे** संपर्क - ९४२२६९४२०३
- **ऑफिस स्टाफ आवश्यक,** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८
- **मंगल ग्रेन स्टोअर्स बाजारपेठ** अलिबागमध्ये कामासाठी मुल व मुली पाहिजेत. संपर्क : ७८७५९९००९२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु. पै |
|---|---|---|
| १४३/१/अ/३ | एकूण क्षेत्र १-१७-०० हे. आर या पैकी मनीष बालकृष्ण गुप्ता याचे मालकीचे खाते क्र.८१८ ज्याचे क्षेत्र ०-३७-०० हे. आर या जमीन मिळकतीबाबत. | ०.२८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २५/०६/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत व त्या निवासी सदनिकेचे मालक/कब्जेदार सौ. पुजा विनोद पाटणकर व अभिषेक विनोद पाटणकर रा. ७०२ मनोरमा को. ऑ.हौ. सोसा. हिंदु कॉलनी, कर्वे हॉस्पिटल जवळ, नवपाडा, ठाणे यांच्याकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे व सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरोसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे रेवदंडा ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग १०४, हिस्सा नं. २३/५ या बिनशेती मिळकतीवरील रजनीगंधा कॉम्प्लेस मधील मालमत्ता क्रमांक ३२५८/१६, सदनिका क्रमांक २०४, क्षेत्र ६४० चौ. फुट (५९.४७ चौ. मी.) ग्रामपंचायत रेवदंडा, ता. अलिबाग ही निवासी सदनिका मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.**

वर नमुद केलेल्या सदर निवासी सदनिकेवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध) झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
कळावे.

अलिबाग,
तारीख : २६/०६/२०२६

**ॲड. सागर विजय पाटील**
पत्ता - मु. घर नं.१६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी, ता.अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ९९२२५६७८९१

## जाहीर नोटीस

या सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे चंदरगांव, ता.सुधागड, जि.रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री. मनदीप सिंह जंजुहा यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक मे. अविष्कार रिॲलिटी प्रा.लि.तर्फे प्रो.प्रा.श्री.गुरुनाथ प्रभाकर लवेकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ३० | १ | २.३४.००<br>पोट ख. ०.५५.००<br>एकूण : २.८९.०० यापैकी ०.८०.०० क्षेत्राचे | १.०० |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सुधागड
ता. २६/०६/२०२६.

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील मे. समीरा लाईफ स्टाईल्स प्रा. लि. व श्री. समीर अनिल नेरुरकर (हिंदू अविभक्त कुटुंब) यांना खालील अनुसूचीत वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये (यापुढे ''सदर मिळकत'') हक्क, मालकी हक्क व हितसंबंध प्राप्त झालेले आहेत.

सदर मिळकतीचे अभिलेख धारक मे. एन. के. ॲग्रो फार्म तर्फे प्रोप्रायटर श्री. केतन रसिकलाल शाह (यापुढे ''विक्रेते'') यांचेसोबत आमचे अशीलांचा दि. ४ मार्च २०२१ रोजीचा करारनामा (Memorandum of Understanding) झालेला असून, ठरलेला संपूर्ण मोबदला रु. १,१२,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख मात्र) विक्रेत्यांना अदा करण्यात आलेला आहे, तो विक्रेत्यांनी स्वीकारलेला आहे, व त्या अनुषंगाने माहे सप्टेंबर २०२२ मध्ये सदर मिळकतीचे खरेदीखत निष्पादित करण्यात आलेले आहे.

आमचे अशीलांच्या निदर्शनास आले आहे की, संपूर्ण मोबदला स्वीकारूनही विक्रेते सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री/हस्तांतरण/गहाण अथवा अन्य प्रकारे व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. याद्वारे तमाम जनतेस सावध करण्यात येते की, सदर मिळकतीमध्ये आमचे अशीलांचे विद्यमान हक्क व हितसंबंध असल्याने, सदर मिळकतीसंदर्भात विक्रेत्यांशी अथवा त्यांचेमार्फत दावा करणाऱ्या कोणाशीही कोणताही व्यवहार जसे की, खरेदी-विक्री, अदलाबदल, बक्षीस, गहाण, प्रभार, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विकास करार, मुखत्यारपत्र अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करू नये.

कोणीही व्यक्ती/संस्था वरील सूचनेकडे दुर्लक्ष करून सदर मिळकतीसंदर्भात कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार आमचे अशीलांच्या हक्कांच्या व प्रलंबित न्यायालयीन कार्यवाहीच्या (lis pendens) अधीन राहील, संपूर्णतः सदर व्यक्तीच्या स्वतःच्या जोखमीवर व खर्चाने राहील, आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, व त्या व्यवहारास आमचे अशील कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

**अनुसूची**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - धोकवडे, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९१८, एकूण क्षेत्र ००.३०.१० (हे. आर. चौ. मी.) आकार ५ रु. ११ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः
उत्तरेस आणि त्या दिशेने :भूमापन क्रमांक व उपविभाग ९१७
दक्षिणेस आणि त्या दिशेने : आवास गावची हद्द
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ९१३ आणि ९१४
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १९१
ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/०६/२०२६

**क्काड्रा लीगल**
**वकील आणि सॉलिसिटर्स**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**
**भागीदार**

## अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
## अलिबाग-रायगड

### -: जाहीर सूचना :-

बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार व ग्राहकांस कळविणेत येते की, बँकेची चौल शाखा दि.०२/०७/२०२६ पासून खालील ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

**स्थलांतरीत पत्ता-** थेरोंडा फाटा, रामेश्वर अपार्टमेंट समोर,
रेवदंडा रोड, ता.अलिबाग जि.रायगड
पिन. ४०२२०२

## दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**नोंद./प्रशासकीय कार्यालयः** २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉईंट, मुंबई-२१. **वसुली विभागः** प्लॉट क्र.-८/सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (प), ४१०२०६. **दूरध्वनी क्र.** ०२२-२७४५८८६२८ **ईमेल पत्ताः** recovery@ncbmumbai.com

रजि. ए.डी.

**संदर्भः एनसीबी/एचओ/आरईसी/१२७/२०२६-२७.** **दिनांकः २५.०६.२०२६**

प्रति,
**सौ. प्रमीला के.पी.**
**निवासाचा पत्ताः** सदनिका क्र. ६, २रा मजला, रिषभ सीएचएस लि., प्लॉट क्र. ३०६, सेक्टर २१, नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६.

प्रिय महोदय,

**विषयः सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये सूचना.**

तुमच्या विनंतीवरून, तुम्हाला बँकेद्वारे दि. २५.०६.२०१९ रोजी खाते क्र. एचएसएलएन-५ (५-४३२-५) नुसार रु. १८.०० लाख या रकमेकरिता गृह कर्ज सुविधा मंजूर केली होती आणि दि. १५.०७.२०१९ रोजी नेरूळ शाखेद्वारे विविध संपत्तीच्या बदल्यात बँकेच्या नावे सुरक्षित हितसंबंध निर्माण करून रु. १८.०० लाखांचे वाटप करण्यात आले होते. सदर गहाणवट कर्ज सुविधेचे संबंधित तपशील आणि तुमच्याद्वारे बनविण्यात आलेल्या प्रतिभूती करारपत्र (त्रे)/दस्तऐवज परिशिष्ट अनुक्रमे 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद करण्यात आले आहेत. तुम्ही सदर करारपत्र(त्रे)/दस्तऐवज(जां)नुसार सदर वित्तीय सहाय्याच्या परताव्याकरिता हमीसह वित्तीय सहाय्य प्राप्त केले आहे.

तसेच सदर वित्तीय सहाय्य प्राप्त करतेसमयी, बँकेच्या नावे प्रतिभूती हितसंबंध निर्माण करून शीर्षक करारनामा/ नोंदणीकृत गहाणखत जमा करून गहाणखत तयार करण्यात आले होते. अशा गहाणखताशी संबंधीत दस्तऐवज देखील परिशिष्ट 'ब'मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

तारण मालमत्तांचे संबंधित तपशील विशेषतः अनुसूची 'क' मध्ये नमूद करण्यात आले आहेत. वरील सदर वित्तीय सहाय्य/ऋण सुविधेचे व्यवहार अनियमित झाले आहेत आणि भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे मालमत्ता वर्गीकरणाशी संबंधी वेळोवेळी पारित निर्देश/मार्गदर्शक तत्त्वांनुसार दि. ०२.०५.२०२६ रोजी कर्ज 'अनुत्पादक मालमत्ता' म्हणून वर्गिकृत करण्यात आले आहे.

सदर वित्तीय सहाय्य खालील व्यक्तींच्या वैयक्तिक हमीद्वारे सुरक्षित आहेतः
**एचएसएलएन-५ (५-४३२-५) करिता : १) श्री. उदयन वेलायुधन**
**२) श्री. मेदापरमपिल गंगाधरन सदाशिवन**

वारंवार विनंती करूनही, तुम्ही सदर देय रक्कम/थकबाकी दायित्वे परतारा करण्यात अयशस्वी ठरला आहात आणि त्याकडे दुर्लक्ष केले आहे. म्हणून, बँक याद्वारे तुम्हाला "सदर कायद्याच्या" कलम १३ (२) अंतर्गत ही सूचना बजावून, या सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत बँकेस खाली नमूद केलेले तुमचे दायित्व पूर्णपणे फेडण्याची मागणी करत आहे.

सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत सूचना.

दिनांक ३१.०५.२०२६ रोजी नुसार एचएसएलएन-५ (५-४३२-५) करिता बँकेकडे तुमची देय असलेल्या थकबाकीची रक्कम रु. १४,८२,३३१.७० (अक्षरी चौदा लाख ब्याऐंशी हजार तीनशे एकतीस रुपये व पैसे सत्तर फक्त) आहे. तुम्ही दि. ०१.०६.२०२६ पासून पुढे दोन्ही खात्यांमधील उपरोल्लेखित रकमेवर करारात्मक दराने व्याज तसेच आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादी देण्यास देखील जबाबदार आहात.

जर तुम्ही या कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत या सुचनेच्या अटींनुसार, दिनांक ३१.०५.२०२६ रोजी नुसार एचएसएलएन-५ (५-४३२-५) ची उपरोल्लेखित रक्कम रु. १४,८२,३३१.७० (अक्षरी चौदा लाख ब्याऐंशी हजार तीनशे एकतीस रुपये व पैसे सत्तर फक्त) पुढील व्याज/आनुषंगिक खर्च, शुल्कासह बँकेला परत करण्यात अयशस्वी ठरल्यास, बँक कलम १३ च्या उप-कलम (४) अंतर्गत आणि सदर कायद्याच्या इतर लागू तरतुदींनुसार तपशीलवार नमूद केलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरेल.

तुम्हाला हे देखील सूचित करण्यात येते की, कलम १३ च्या उप-कलम १३ नुसार, बँकेची लेखी संमती घेतल्याशिवाय तुम्हाला या सुचनेच्या परिशिष्ट 'क' मध्ये तपशीलवार नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही.

ही नोटीस बँकेच्या इतर कोणत्याही लागू कायद्याच्या तरतुदीनुसार आवश्यक वाटेल अशा इतर कृती किंवा कायदेशीर कारवाई सुरू करण्याच्या अधिकारांवर कोणताही पूर्वग्रह न ठेवता जारी केली आहे.

आपला विश्वासू,
**(श्री. आकाश घोलप), अधिकृत अधिकारी**

प्रत रवानाः
**एचएसएलएन-५ (५-४३२-५) करिताः**
**१. श्री. उदयन वेलायुधन**
**निवासी पत्ताः खोली क्र. २१३, प्लॉट क्र. २, सुंदरम सीएचएस, खारिदास पवार मार्ग, बँक ऑफ बडोदाजवळ, सेक्टर १, नेरूळ पूर्व, नवी मुंबई-४००७०६.**
**२. श्री. मेदापरमपिल गंगाधरन सदाशिवन**
**निवासाचा पत्ताः सदनिका क्र. ६, २रा मजला, रिषभ सीएचएस लि., प्लॉट क्र. ३०६, सेक्टर २१, नेरूळ, नवी मुंबई - ४००७०६.**

तुम्हाला सल्ला देण्यात येतो की, तुमच्याद्वारे बनविण्यात आलेल्या हमीनुसार सूचनेमध्ये उल्लेखित रकमेचा भरणा करावा.
**(श्री. आकाश घोलप), अधिकृत अधिकारी**
सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत सूचना.

**परिशिष्ट 'अ'**

| सुविधेचे नाव | दि. ३१.०५.२०२६ रोजीनुसार व्याजासह थकबाकी |
|---|---|
| एचएसएलएन-५ दि. २५.०६.२०१९ रोजी मंजूर | मुद्दल रक्कमः रु. १४,७०,३३२.७०<br>व्याजाची रक्कमः रु. ११,९९९.००<br>**एकूण थकबाकी रक्कमः रु. १४,८२,३३१.७० (अक्षरी चौदा लाख ब्याऐंशी हजार तीनशे एकतीस रुपये व पैसे सत्तर फक्त)** |

**परिशिष्ट 'ब'**
(सर्व पूरक दस्तऐवज आणि गहाणखत बनविल्याचा पुरावा असलेल्या दस्तऐवजांसह प्रतिभूती दस्तऐवजांचा तपशील)

| अ. क्र. | बनविलेल्या दस्तऐवजांचे नाव | एचएसएलएन-५ | |
|---|---|---|---|
| | | दस्तऐवज बनविल्याचा दिनांक | मंजूर रक्कम |
| १ | डिमाण्ड प्रॉमिसरी नोट | १५.०७.२०१९ | रु. १८,००,०००.०० |
| २ | कर्जाकरिता करारपत्र | "-" | "-" |
| ३ | धारणाधिकार आणि सेट ऑफचे पत्र | "-" | "-" |
| ४ | जामीनदार/सह-बाध्य यांच्याद्वारे धारणाधिकार आणि सेट-ऑफचे पत्र | "-" | "-" |
| ५ | जामीनाचे पत्र | "-" | "-" |
| ६ | हमी | "-" | "-" |

**अनुसूची - 'क'**
**भाग-। बँकेकडील प्राथमिक प्रतिभूतीचे तपशीलः**
मालमत्ते/त्तांचे नाव आणि त्यांचा तपशील
**मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणखत**
**सदनिका क्र. ३०२, ३रा मजला, इमारत "साई निवास", प्लॉट क्र. बी-५४, सेक्टर-१९बी, उलवे, ता.-पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई.**
**मोजमाप २४.०७५ चौ.मी. कार्पेट + ८.०३० चौ.मी. गच्ची**
**वरील मालमत्तेच्या गहाणखतासाठीच्या कागदपत्रांचा तपशीलः**
१) मे. साई दत्त डेव्हलपर्स, प्रोप्रा. श्री. एम. जी. सदाशिवन आणि सौ. प्रमीला के.पी. यांच्या दरम्यान बनविलेले दिनांक ०२.०१.२०१८ रोजीचे मूळ विक्री करारपत्र. दस्तऐवज पावती क्र. PVL5/79/2018 आणि पावती क्र. ७९ दिनांक ०२.०१.२०१८.
२) मे. साई दत्त डेव्हलपर्सला प्रदान केलेल्या रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) करिता मूळ भरणा पावती क्र. ००१८ दिनांक १७.०१.२०१८.
३) मे. साई दत्त डेव्हलपर्सला प्रदान केलेल्या रु. ७०,०००/- (रुपये सत्तर हजार मात्र) करिता मूळ भरणा पावती क्र. ००२१ दिनांक २९.०५.२०१९.
४) दि नॅशनल को-ऑप. बँक लि. यांनी सौ. प्रमीला के. पी. यांच्याकरिता बनविलेले दि. १७.०७.२०१९ रोजी नुसार समन्याय्य गहाणवट पावती क्र. १४०४ संबंधी सूचनेची मूळ नोटीस, दस्तऐवज अनुक्रमांक पीएनएल३-१४०१-२०१९.
५) मे. साई दत्त डेव्हलपर्स द्वारे दि. ३०.०५.२०१९ रोजी पारित केलेली मूळ बिल्डर एनओसी.
६) सीईआरएसएआय अहवाल दि. ०१.०८.२०१९ ची प्रत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड, विद्या ऋषिकेश गायकवाड, तनवीर नबीसाब जमादार यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे-

**मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६ | एकुण क्षेत्र ३२-९८-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ३-२०-०० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १२-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २६/०६/२०२६

**वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता-दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पवेळे, ता.अलिबाग जि.रायगड येथील भूमापन नं.४२ हिस्सा नं.२+३ आणि त्यातील खंडाळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील घर क्र.७३ अशी संपूर्ण मिळकत तिचे विद्यमान मालक सौ.निता सतिश ठक्कर, श्री.देवांग हरिदास ठक्कर, श्री.गौतम छन्नालाल लेऊआ, श्री.भरत भिखसिंग राजपुरोहित व श्री.शैतानसिंग भिखसिंग राजपुरोहित यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लिन, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४(चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकतीं या निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग
तारीख : २४.०६.२०२६

सही/-
**(ॲड.सुरेंद्र नारायण जोशी)**
ए-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक वंदिता टिकम सराफ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे नवघर तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३९९ | एकुण क्षेत्र ३-०६-०० हे आर पॉ | ०-८७ |
| ४०० | एकुण क्षेत्र १-८०-०० हे आर पॉ | ०-३१ |
| ४०१ | एकुण क्षेत्र ५-२६-०० हे आर पॉ | १-०७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार. गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/०६/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
## जाहीर नोटीस

जा.क्र.६२९/२०२६
**दिनांक : २३/०६/२०२६**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ६ | ९८३ | चिमणबाग | पक्के सिमेंट बांधकाम ६९७ चौ. फुट | अनंता महादेव कोळगावकर | किरणदेवी गोपीकिशन दमाणी |
| २ | ५ | ११२९/९७ | साई सुधा अपार्ट | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४५५ चौ. फुट | अनघा किशोर वैद्य | किशोर राजाराम वैद्य<br>दिपंकार किशोर वैद्य<br>स्वागता तुषार वालावलकर |
| ३ | ५ | २१०४/९ | निर्वाणा गृह सह. संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ५९३ चौ. फूट | जय चामुंडा डेव्हलपर्स तर्फे श्री. फेनिल रतिलाल पटेल, श्री. भार्गव रतिलाल पटेल | सोनल जितेंद्र पाटील |
| ४ | २ | | राधा गोविंद नगर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १६३८ चौ. फुट | वंदना शिवराम पाटील<br>संदेश शिवराम पाटील<br>तुषार शिवराम पाटील | संदेश शिवराम पाटील |
| ५ | २ | १७९९ | गोंधळपाडा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम चौ फुट | प्रसाद सदानंद सुर्वे | प्रसाद सदानंद सुर्वे<br>पूजा प्रसाद सुर्वे |
| ६ | २ | १५९५/१२ | सिमरन को.ऑप. हो. सोसा | आर.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ८९० चौ. फुट | प्राची प्रविण जोशी | मंगल दिपक झावरे<br>दिपक पांडुरंग झावरे |
| ७ | ५ | २०८५/१२ | गुरवनगर रस्ता श्री सद्गुरू कबीर स्मृती भवन | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला ३८९.२७ चौ. फुट | श्री सद्गुरू कबीर एंटरप्रायझेस तर्फे श्री. संजय वैजनाथ मेहता | अनघा आशिष भगत<br>शालिनी दिवाकर म्हात्रे |
| ८ | ५ | | पिंपळभाट | पक्के सिमेंट बांधकाम चौ. फुट घर | रमेश रामचंद्र घरत | वैभव रमेश घरत |
| ९ | ५ | ७६७/३ | दै. कृषीवल सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका | सुनील मधुकर पाटील | मीनाक्षी सूर्यकांत पाटील<br>सुलभा मंगेश भगत |
| १० | ६ | ७६२/१५ | शिवसागर सह. गृहनिर्माण संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका १ मजला ५२० चौ. फुट | सौ. सुनंदा सुधाकर वडके<br>सुधाकर नारायण वडके | सचिन सुरेश म्हात्रे |
| ११ | २ | १७००/१ | शर्वरी सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका तळमजला ६०३ चौ. फुट | समिक्षा संजिर पाटील<br>संजिर गजानन पाटील | जनाबाई शांताराम पाटील<br>सुनील महादेव पाटील |
| १२ | २ | २१६९/१४ | ॲकॉन्स प्रिव सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम सदनिका २ मजला ५३२ चौ. फुट | अजित जयराम जाधव | भक्ती रूपेश भगत |
| १३ | ५ | २१०४/१ | निर्वाणा गृह सह. संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५८१ चौ. फुट | जय चामुंडा डेव्हलपर्स तर्फे श्री. फेनिल रतिलाल पटेल, श्री. भार्गव रतिलाल पटेल | गौरांग प्रशांत खेडेकर |
| १४ | ६ | | बिग स्प्लॅश हॉटेल | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १३२७२ चौ. फुट | श्री. नाझ चौधरी | अभिराज महेंद्र दळवी<br>प्रशांत मधुसूदन नाईक<br>मिलिंद गजानन चव्हाण |
| १५ | २ | २१३८/१ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला सदनिका ५९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | सौ. निलीमा नरेश पाटील |
| १६ | २ | २१३८/२ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | अक्षता जयेंद्र पाटील |
| १७ | २ | २१३८/३ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | दिनेश सुधाकर खंडाळकर<br>नेहा दिनेश खंडाळकर |
| १८ | २ | २१३८/७ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ ला मजला सदनिका ५१५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | ज्योती गौरव ठाकूर |
| १९ | २ | २१३८/८ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ ला मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | अशोक यशवंत आंबोलकर<br>अस्मिता अशोक आंबोलकर |
| २० | २ | २१३८/९ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ ला मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | श्री. अनुप प्रमोद राणे |
| २१ | २ | २१३८/१० | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला सदनिका ५९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | प्रसाद अरूण थळे |
| २२ | २ | २१३८/११ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | स्मिता स्वप्निल म्हात्रे<br>निहीत जयंत शिंदे |
| २३ | २ | २१३८/१२ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | ऋतुजा प्रथमेश ठाकूर<br>प्रथमेश प्रविण ठाकूर |
| २४ | २ | २१३८/१३ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला सदनिका ५९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | विलास जगन्नाथ भोनकर<br>प्रमिला विलास भोनकर |
| २५ | २ | २१३८/१४ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | करण गणेश जाधव |
| २६ | २ | २१३८/१५ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | अक्षता सुजित ठाकूर<br>सुजित दिनेश ठाकूर |
| २७ | २ | २१३८/१६ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ६ मजला सदनिका ५९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | सुषमा राजेंद्र ठाकूर |
| २८ | २ | २१३८/१७ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ६ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | सागर दत्तात्रेय सरदेसाई<br>जयंत सागर सरदेसाई |
| २९ | २ | २१३८/१७ | प्रज्योत देवस्थळ सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ६ मजला सदनिका ३९५ चौ. फुट | प्रज्योत रिआलिटी तर्फे गौरव प्रविण घरत | सागर दत्तात्रेय सरदेसाई<br>हर्षदा सागर सरदेसाई |

सही/-
**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग

# तळा तालुक्याचे अस्तित्वच धोक्यात

## ।। निवडणुकीत रोजगाराच्या आश्वासनांची खैरात ।। कुटुंबांचे मोठ्या शहरांकडे स्थलांतर

। तळा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्याची दिवसेंदिवस होत असलेली दयनीय अवस्था चिंतेचा विषय बनली आहे. मात्र रोजगाराच्या संधींचा अभाव, वाढते स्थलांतर आणि घटती लोकसंख्या यामुळे तालुक्याच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. स्थानिक तरुणांना प्रत्येक निवडणुकीत रोजगाराच्या आश्वासनांची खैरात केली जाते. मात्र निवडणुका संपल्यानंतर ही आश्वासने हवेत विरल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.



रोजगारनिर्मितीसाठी ना शासनाकडून ठोस प्रयत्न झाले, ना लोकप्रतिनिधींनी प्रभावी पुढाकार घेतला, अशी खंत स्थानिक व्यक्त करत आहेत. परिणामी अनेक कुटुंबांनी रोजगाराच्या शोधात मुंबईसह मोठ्या शहरांकडे स्थलांतर केले आहे. या स्थलांतराचा सर्वाधिक परिणाम शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे.

तालुक्यातील शाळांच्या पटसंख्येत मोठी घट झाली असून गेल्या काही वर्षांत १३ पेक्षा अधिक शाळांना कुलूप लागले आहे. फळशेत, कासेवाडी, मालूक कोंड, महागाव, महुरे, सोलमवाडी, बहुलेवाडी, कोणथरे, जांभाडी वस्ती, पुसाटी तळे, उसर खुर्द, वावे मांद्रज आणि तांबडी येथील शाळा बंद झाल्या आहेत.

एकेकाळी गावागावांत शाळा सुरू व्हाव्यात म्हणून ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले होते. पुढील पिढी घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगत अनेकांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून शाळा गावात आणल्या. मात्र, आज त्याच शाळांच्या इमारती ओस पडत असून काही ठिकाणी दोन खोल्यांच्या शाळेत दोनच विद्यार्थी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.


सध्या तालुक्यात ८४ शाळा कार्यरत असून त्यापैकी २५ शाळांची पटसंख्या पाच किंवा त्याहून कमी आहे.

### पुनर्वसन होणे गरजेचे

तळा तालुक्याचा हा उतरता आलेख रोखण्यासाठी शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने रोजगारनिर्मिती, उद्योगविकास आणि ग्रामीण पुनर्वसनाच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे. अन्यथा वाढते स्थलांतर आणि घटती लोकसंख्येमुळे भविष्यात तळा तालुक्याचे अस्तित्वच धोक्यात येण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मराठी माध्यमाच्या शाळांमधील घटत्या पटसंख्येला इंग्रजी माध्यमाच्या वाढत्या आकर्षणाला कारणीभूत ठरवत असले, तरी स्थानिकांच्या मते हे वास्तवापासून दूर आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये ८० टक्केहून अधिक घरे बंद असून उरलेल्या घरांत प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक राहतात. अशा परिस्थितीत शाळांमध्ये विद्यार्थी येणार तरी कुठून, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. लोकसंख्या घटल्याने तालुक्याचा आर्थिक समतोलही ढासळला आहे. बाजारपेठा ओस पडत आहेत, स्थानिक व्यवहार कमी होत आहेत आणि विकासाचा वेग मंदावला आहे. रोजगार, पायाभूत सुविधा, वाहतूक, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप होत आहे.

# रस्त्यावरील झाडाच्या फांद्या हटविण्याची मागणी



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड सुपेगाव रोहा रस्त्यावर सुपेगाव नजीकच्या रस्त्यावर झुकलेल्या वाकलेल्या झाडाच्या फांद्या वाहनचालकांची डोकेदुखी ठरत असून संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे याकडे दुर्लक्ष असल्याबद्दल वाहनचालक व प्रवासी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. फणसाड अभयारण्य व मुरुड-जंजिरा पर्यटनात रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर अन्य ठिकाणाहून काशिदचा समुद्र किनारा, फणसाड अभयारण्य, मुरुड-जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी रोहा सुपेगांवमार्गे मुरुड रस्ता जवळ असल्याने या रस्त्यावर शनिवार-रविवार व सुट्टीच्या दिवशी वाहनांची वाढती वर्दळ असते. काही बळणात विशेष करून आदाड फाट्यापासून सुपेगांव ते तळेखार फाट्याकडे जाताना उतारावर समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाच्या संबंधित बांधकाम खात्याने यात लक्ष पुरवून सुपेगांव रस्त्यालगत खाली आलेल्या झाडाच्या फांद्या हटविणत करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करतील काय? असा सवाल पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून विचारला आहे.

# निवडक

## फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचवा

**खरोशी :** राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन संवाद सभेत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले या मालिकेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करत फुले दांपत्यांचा विचार घराघरात पोहोचविण्यासाठी समाजाने एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन केले. गुगल मिट्च्या माध्यमातून आयोजित या सभेला राज्यभरातील संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक बांधव तसेच ओबीसी बहुजन समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संघटनेचे सरचिटणीस संतोष भोजने यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा क्षीरसागर-कदम यांनी तर आभार प्रदर्शन लहू राक्षे यांनी केले.

## 'द लाइफ फाउंडेशन'तर्फे मदत

**पाली/बेणसे :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मद लाइफ फाउंडेशनच्या वतीने अलिबाग व सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये वह्या वितरण करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमांतर्गत दोन्ही तालुक्यातील एकूण ३२१ जिल्हा परिषद शाळांमधील दहा हजार विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच हे साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. अलिबाग तालुक्यासाठीचा वह्या वितरण कार्यक्रम चेंढरे ग्रामपंचायत सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास गटशिक्षण अधिकारी कृष्णा पिंगळे तसेच द लाइफ फाउंडेशनच्या सह-संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त पूनम लालवानी प्रमुख उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध शाळांच्या प्रतिनिधींना वह्यांचे सुपूर्द करण्यात आल्या. सुधागड तालुक्यातील मुख्य रायगड जिल्हा परिषद शाळा पाली क्रमांक २ येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास गटशिक्षण अधिकारी साधुराम बांगरे सर तसेच पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ज्येष्ठांची माधवबागेत आरोग्य सहल



**अलिबाग :** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून रेवदंडा येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी माधवबाग, खोपोली येथे विशेष आरोग्य सहलीचे आयोजन करण्यात आले. निसर्गरम्य वातावरणात आयोजित या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य तपासणी, योग मार्गदर्शन आणि देवदर्शनाचा लाभ एकाच वेळी मिळाला. ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध आरोग्य समस्यांचा विचार करून माधवबाग खोपोलीचे हेल्थ एक्झिक्युटिव्ह तुषार पाटील यांनी अत्यंत माफक दरात बीपी, वजन, उंची, ईसीजी, शुगर आदी तपासण्यांचे विशेष पॅकेज उपलब्ध करून दिले. कार्यक्रमादरम्यान योग प्रशिक्षक अरुण जाधव यांनी योगाची प्रात्यक्षिके सादर करत ज्येष्ठांना नियमित व्यायाम आणि योगाचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य तपासणी, योग मार्गदर्शन, वर्षासहल आणि देवदर्शन अशा विविध अनुभवांनी समृद्ध झालेल्या या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आनंदाला अक्षरशः उधाण आले होते.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**अलिबाग :** सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालय स्तरावर राबविण्यात येत असतो. त्यानुसार जिल्हास्तरावरील लोकशाही दिन सोमवार (दि.६) जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अर्जदाराने आपल्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारीचे निराकरण करण्याकामी लोकशाही दिनाकरिता अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

# बोरवाडी केंद्रात वह्या वाटप

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील गांगवली - खारबाचीवाडी येथील बेटर सोसायटी फाऊंडेशनतर्फे तालुक्यातील बोरवाडी केंद्रातील चाच, बोरवाडी, घोडशेतवाडी, धामणी, कुंभे या पाच शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम गुरुवारी (दि.२५) जून रोजी तालुक्यातील बोरवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



बहुजन समाजातील गोरगरीब, गरजू विद्यार्थ्यांना, नागरिकांना काही मदतीचा हात मिळावा यासाठी आमचे फाऊंडेशन नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे फाऊंडेशन काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे केंद्र शाळा बोरवाडी यांनी चांगल्याप्रकारे आयोजन केल्याने बनगुले यांनी केंद्राच्या सर्व शिक्षकांचे मनापासून आभार व्यक्त करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास शिक्षक भाविका कदम, योगेश शेलार, पूनम निजापकर,रत्नाकर महाले,हेमंत शिर्के, नर्मदा मुळे, अशोक जाधव आदी बोरवाडी केंद्रातील शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# मुरुडमध्ये ३६२ मि.मी.पाऊस



**कोर्लई :** मुरुडमध्ये पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. गुरुवारी सकाळी ८ ०० वा.पर्यंत ७८ मि.मी. तर आतापर्यंत ३६२ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. २१ जून पासून मान्सूनच्या आगमनाने नागरिकांना दिलासा मिळाला तर शेतकरी राजा सुखावला.

# उल्हास नदीचा पात्रात दगडी संरक्षण भिंत

## बामचा मळा येथील पाण्याचा प्रवाह बदलणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पात्रालगत दगडी संरक्षण भिंत बांधली जात आहे.कर्जत नगरपरिषद हद्दीत हे बांधकाम सुरू असून त्या संरक्षण भिंतीचा मोठा फटका शनी मंदिर परिसराला बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, त्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यासाठी पालिकेची परवानगी नसताना तसेच संबंधित जागेची सरकारी मोजणी झालेली नसताना संरक्षण भिंत बांधली जात असल्याने त्या बेकायदा कामाला राजकीय आशीर्वाद असावा असा आरोप सामाजिक कार्यकर्ते ॲड ऋषिकेश जोशी यांनी केला आहे.



कर्जत शहरातून वाहत जाणाऱ्या उल्हास नदीच्या लागून आकुर्ले येथील बामचा मळा या ठिकाणी संरक्षण भिंत बांधली जात आहे. पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता संरक्षण भिंत बांधण्याचे कार्य सुरू आहे. कर्जत नगरपरिषद हद्दीत असलेल्या विभागातील ही कामे केली जात असताना कर्जत नगरपरिषदकडून त्या कामाकडे डोळेझाक केली जात आहे. त्यामुळे भविष्यात मोठ्या महापूराला कर्जत शहरातील नागरिकांना सामोरे जावे लागेल अशी भीती सामाजिक कार्यकर्ते ॲड. जोशी यांनी व्यक्त केली आहे. या भिंतीमुळे उल्हास नदीला महापूर आल्यानंतर पुराचे पाणी हे समोरच्या भागात जाऊन त्या परिसरात पाणीच पाणी होऊ शकते. समोरच्या बाजूला असलेल्या महावीर पेठ तसेच शनी मंदिर परिसराला पुराचा धोका संरक्षण भिंतीमुळे वाढला आहे.

दुसरीकडे ज्या भागात संरक्षण भिंत उल्हास नदीच्या तीरावर बांधली जात आहे. त्या जागेची रीतसर मोजणी भूमिअभिलेख कडून करण्यात आली नसल्याचा आरोप ॲड जोशी यांनी केला आहे. त्यामुळे भविष्यातील धोका लक्षात घेऊन ही संरक्षण भिंत तत्काळ तोडून टाकण्यात यावी अशी मागणी ॲड. जोशी यांनी केली आहे.

# दामिनी पथकाकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा, कुडली येथे दामिनी पथकांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रावणी भोईर व पोलीस कॉन्स्टेबल सागर रसाळ यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षा, शिक्षण आणि आत्मविश्वास याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रावणी भोईर यांनी विशेषतः मुलींशी संवाद साधत गुड टच-बॅड टच, वैयक्तिक सुरक्षितता, आत्मसंरक्षण तसेच कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाला बळी न पडता त्वरित मदत घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले.



शाळा, घर किंवा प्रवासादरम्यान कोणतीही अडचण आल्यास ती शिक्षक, पालक किंवा विश्वासू व्यक्तींना तात्काळ सांगावी, असे त्यांनी आवाहन केले. पोलीस कॉन्स्टेबल सागर रसाळ यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली व आत्मविश्वास वाढण्यास आणि चांगले नागरिक बनण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी किंवा अडचणीच्या वेळी ११२ या आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. तुमच्या मदतीसाठी पोलीस नेहमीच तत्पर आहेत, असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सुशीला म्हात्रे, मोहन राठोड, अविनाश जाधव संदीप राठोड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. दामिनी पथकाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा, जागरूकता व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

# ममदापूर गावातील रस्त्याची दुरुस्ती

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळविकासप्राधिकरणामधील ममदापूर गावाकडे रस्त्यावर बिल्डर करून करण्यात आलेला मातीचा भराव यामुळे रस्त्यावर पाण्याचे तळे निर्माण झाले होते. प्रसार माध्यम आणि समाज माध्यमांवर याबाबत माहिती प्रसारित झाल्यानंतर मदापूर ग्रामपंचायतीकडून तत्काळ उपाययोजना करण्यात आली.



ग्रामपंचायतने आपल्या निधीमधून जेसीबी आणि डंपरच्या सहाय्याने मातीचा भराव बाजूला करून घेतला. दरम्यान, जिल्हा परिषद सदस्यांचे उपस्थितीत बिल्डरकडून बुजवण्यात आलेल्या मार्गिका देखील खुली करून घेत नैसर्गिक पाणी वाहून जाण्यास मदत झाली.

ममदापूर गावामध्ये जाणारा रस्ता पहिल्याच पावसात पाण्याने भरून गेल्याने गावकऱ्यांचा रस्ता बंद झाला होता. यामुळे या ठिकाणी रस्त्यावर गुडघाभर पाण्यात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

ग्रामस्थांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासक प्रतीक गायकवाड, ग्रामसेवक गणेश बढे यांनी खड्डे तसेच ज्या बिल्डरने मातीचा भराव टाकला होता. तेथे रस्त्यात असलेला मातीचा भराव बाजूला करून या ठिकाणी जे बाजूला करून घेतला. त्या ठिकाणी गुडघाभर पाणी साचले होते या पाण्याचा निचरा करून या ठिकाणी हा खड्डा बुजवण्यात आला.

# आत्मा प्रशिक्षणास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। चणेरा । प्रतिनिधी ।

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या किसान गोष्टी व प्रक्षेत्र भेट तसेच शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन विषयावरील एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास रोहा, माणगाव आणि तळा तालुक्यातील सुमारे ७५ शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कृषी विज्ञान केंद्र, रोहा येथे पार पडलेल्या या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती, हवामान बदल आणि मत्स्यसंवर्धनाविषयी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तलाठी यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर कृषी विज्ञान केंद्रातील मत्स्य तज्ज्ञ माधव गीते यांनी शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन या विषयावर सविस्तर माहिती दिली. त्यांनी शेततळ्यासाठी योग्य जागेची निवड, पाण्याची उपलब्धता, पाण्याचा पी. एच., मत्स्यपालनासाठी उपयुक्त माशांच्या जाती, मत्स्यबीजांची निवड, खाद्य व्यवस्थापन आणि मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. तसेच माशांमध्ये आढळणारे विविध रोग व त्यावरील नियंत्रण उपायांची माहिती देत शेततळ्यातील मत्स्यपालन हा शेतीला पूरक आणि अतिरिक्त उत्पन्न देणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी या व्यवसायाचा अवलंब करून आर्थिक उत्पन्न वाढवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी मत्स्यपालन, पीक व्यवस्थापन, हवामान बदल तसेच शेतीतील नव्या तंत्रज्ञानासंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. संबंधित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करत त्यांना व्यावहारिक आणि तांत्रिक मार्गदर्शन केले.

## राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी । विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

# शिष्यवृत्ती माहिती कार्यक्रमाचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील जे. एस. एम. महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व समाज कल्याण कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय दिन व लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिष्यवृत्ती माहिती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. निळकंठ शेरे व वाणिज्य विभागप्रमुख डॉ. प्रेम आचार्य प्रमुख व्यख्याते म्हणून उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, शिष्यवृत्ती समितीप्रमुख प्रा. के. बी. चौगुले, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. श्वेता पाटील, समाज कल्याण कार्यालयाच्या अधीक्षक माधुरी पाटील, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक प्रसाद लवटे, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी मोनिका काळे, मंदाकिनी कांबळे, तसेच समाज कल्याण कार्यालयातील पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय दिन व राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण गायकवाड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रम आयोजनाचा उद्देश व हेतू स्पष्ट केला. तसेच, त्यांनी राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक, शैक्षणिक व आरक्षणविषयक कार्यातील योगदान विशद केले व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. समाज कल्याण कार्यालय अधीक्षक माधुरी पाटील यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले व समाज कल्याण कार्यालयाच्या कामाची माहिती दिली. यावेळी समाज कल्याण कार्यालयातर्फे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समग्र वाङ्मय हा ग्रंथ प्राचार्य व उपप्राचार्य यांना भेट दिला. तसेच, विद्यार्थ्यांना संविधान उद्देशिका प्रतीचे वाटप करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, अश्विनी आठवले व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. श्वेता पाटील यांनी केले. तसेच, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अश्विनी आठवले यांनी केले.




## राशीभविष्य

- **मेष** : मेहनतीचं योग्य फळ मिळेल. व्यावसायिक स्थिती उत्तम राहील. विद्यार्थ्यांना प्रगती साधता येईल.
- **वृषभ** : संमिश्र ग्रहमानामुळे प्रगतीत कमी-अधिक राहील. डोळ्यांचे विकार संभवतात. विचारानं रहावं.
- **मिथुन** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. कौटुंबिक कलह वेळीच टाळावा. हितशत्रूंपासून सावध असावं.
- **कर्क** : भागीदारी व्यवसायात काळजी घ्या. कसल्याही आमिषाला भूलू नका. थोरांचा सहवास लाभेल.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात प्रगती होईल. स्थावर प्रश्नात तडजोड करावी. मित्रमंडळी, नातलगांचं सहकार्य राहील.
- **कन्या** : प्रयत्नात सातत्य ठेवावं. व्यवसायासाठी प्रवास लाभदायी ठरेल. कार्यात विशेष प्रगती होईल.
- **तूळ** : वादग्रस्त बाबींपासून दूर रहावं. कायदेशीर प्रकरणात सावधगिरी बाळगावी. प्रकृतीची काळजी घ्या.
- **वृश्चिक** : इतरांवर विसंबून राहू नका. उधारीचे व्यवहार टाळावेत. प्रवासात चोरी अथवा नुकसान संभवतं.
- **धनु** : वैयक्तिक समस्या सतावतील. वरिष्ठांची नाराजी ओढवून घ्याल. उष्णतेचे विकार तापदायक ठरतील.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत प्रगती होईल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील.
- **कुंभ** : बोलताना शब्दाचा वापर जपून करावा. विरोधकांवर मात करू शकाल. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **मीन** : कार्याची योग्य दखल घेतली जाईल. बऱ्याच गोष्टी मनाजोग्या होतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

स्टाईल स्टेटमेंट

## बेल्टने द्या ट्विस्ट

बेल्ट आजवर पँटसोबत कॅरी केला जायचा. आता मात्र तो साडी, ड्रेस, इव्हिनिंग गाऊन, स्कर्ट, वेस्टर्न ड्रेस यापैकी कशावरही कॅरी करता येतो. मुख्य म्हणजे बेल्टमुळे आपल्या लूकला ट्विस्ट देता येतो. तुम्हीही विविध पेहरावांसोबत बेल्ट अगदी बिनधास्त कॅरी करू शकता. यासाठी बॉलिवूड बेब्जकडून प्रेरणा घेता येईल.

* मधल्या काळात साडीवर बेल्ट लावण्याची फॅशन खूपच लोकप्रिय झाली. हा ट्रेंड आता चांगलाच फोफावला आहे. मध्यंतरी शिल्पा शेट्टीने गुलाबी रंगाच्या रफल साडीवर स्लिक बेल्ट कॅरी केला होता. या एका बेल्टमुळे शिल्पाचा हा लूक चांगलाच भाव खाऊन गेला.

* कतरिना कैफनेही फ्लोरल साडीवर त्याच डिझाइनचा बेल्ट लावला होता. तिने या साडीवर फुल स्लीव्हजचा ब्लाउज घातला होता. बेल्टने कॅटच्या लूकला चार चाँद लावले होते. **(क्रमश:)**

## २६ जून

दिन विशेष

- **२०१५ :** भारताच्या विश्वनाथन आनंदची नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत उपविजेतेपदापर्यंत झेप.
- **२०१७ :** नव्या शैक्षणिक धोरणाची आखणी करण्याकरता ज्येष्ठ शास्त्रज्ञ के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षेतेखाली नऊ सदस्यांची समिती स्थापन.
- **२०१८ :** पंजाब नॅशनल बँक गैरव्यवहारातील फरारी आरोपी नीरव मोदी याच्या प्रत्यार्पणासाठी विशेष न्यायालयाने सक्तवसुली संचलनालयाला परवानगी दिली.

सफर देशांची

## पॅसिफिक महासागरातला सॅमोआ

सॅमोआ हा पॅसिफिक महासागरातला एक देश आहे. १९६२ मध्ये हा भाग न्यूझीलंडपासून वेगळा झाला. उपुलू आणि सावाई ही इथली प्रमुख बेटं असून नऊ बेटांनी हा भूभाग बनला आहे. 'इंडिपेंडंट स्टेट ऑफ सॅमोआ' हे या देशाचं अधिकृत नाव. हवाई बेटं आणि न्यूझीलंड यांच्या मध्यभागी हा देश आहे. सॅमोअन आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा. सॅमोआतल्या नऊ बेटांवर ज्वालामुखी आहेत. या देशाचा जास्तीत जास्त भूभाग सावाई आणि उपुलू बेटांवर आहे. ॲपिया ही या देशाची राजधानी आणि सॅमोआतलं एकमेव शहर. पॅसिफिक महासागरातल्या रिंग्ज ऑफ फायर भागात हा देश आहे. या भागात भूकंप आणि ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. माउंट सिसिली हे सॅमोआतलं सर्वात उंच शिखर. सावाई बेटावर ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. लालोमानू हा इथला प्रसिद्ध समुद्रकिनारा आहे. इथली पांढरी वाळू पर्यटकांचं लक्ष वेधून घेते. सावाई बेटांवरचा आफू आवू धबधबाही खूप सुंदर आहे. या देशात फिरण्यासारखी बरीच ठिकाणं आहेत. हा देश कृषी उत्पादनांची निर्यात करतो. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय आहे.

### पंचांग

**शुक्रवार, २६ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ शु. १२ (छ. संभाजी महाराज जयंती / मोहरम), चंद्रराशी : तूळ, नक्षत्र : विशाखा, योग : सिद्ध, सूर्योदय ६.०५ सूर्यास्त ७.१८


### फॉरवर्ड्स

**ज़िन्दग़ी में मिला हर वो शख़्स होली सा था...**

**कुछ रंग भरतें ग़ये तो कुछ रंग बदलतें ग़ये...!**

आरोग्यमंत्र

## बहुगुणी मुळा



विविध भाज्या आणि फळांमध्ये अनेक पोषक घटक असतात. जीवनसत्त्वं, खनिजं, तंतुमय पदार्थ, प्रथिनांनी समृद्ध फळं आणि भाज्या खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. अनेक आजारांना प्रतिबंध होऊ शकतो. जीवनसत्त्वं आणि खनिजांचा असाच एक मुबलक स्रोत म्हणजे मुळा. मुळ्याची भाजी, कोशिंबिर, पराठे केले जातात. सॅलड म्हणूनही मुळा खाल्ला जातो. मुळ्यातून शरीराला बरेच आवश्यक पोषक घटक मिळतात. तर अशा या बहुगुणी मुळ्याच्या लाभांची माहिती घेऊ.

*मुळ्यात शरीराला आवश्यक असणारी कर्बोदकं, प्रथिनं आणि फॉस्फरस व लोहासारखे घटक असतात. ॲनिमिया असणाऱ्यांनी मुळा खायला हवा. मधुमेहावरही मुळा गुणकारी ठरतो.

* पांढरा शुभ्र पण चवीचा थोडा तिखट, बराचसा उग्र आणि थोडासा कडवट मुळा औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. * मुळा ही बारमाही भाजी आहे. त्यामुळे मुळ्याचा वरचेवर आहारात समावेश करायला हवा. राहता.* मुळ्याच्या सेवनाने हृदयविकाराला दूर ठेवता येतं. तसंच यात रक्तातलं वाढलेलं कोलेस्टरॉल कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे हृदयाशी संबंधित त्रास असणाऱ्यांनी मुळा खायला हवा. * मुळ्यात पाचक गुणधर्म आहेत. गॅस, आम्लपित्ताचा त्रास असेल तर मुळा खायला हवा. * सर्दी-सायनससारख्या व्याधीतही मुळा गुणकारी ठरू शकतो. मुळव्याधीचा त्रास असणाऱ्यांनीही मुळा खायला हवा. यामुळे आराम मिळू शकतो.

### वेगळ्या वाटा

काहींना फोटो काढण्याचा छंद असतो. काही गायन, वादनात पुढे असतात. काहींची चित्रकला, शिल्पकला चांगली असते. तुम्ही तुमच्या या छंदाचंच व्यवसायात रुपांतर करू शकता. छंदांच्या माध्यमातून उद्योगाचं गणित जुळवणारी अनेक मंडळी आपल्या आसपास आहेत. छंदांना व्यवसायाचं रुप देण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

* सर्वात आधी तुमच्या छंदांची यादी करा. तुम्ही नेमके कशात कुशल आहात याचा अंदाज घ्या. तुमचा हा छंद चांगलं उत्पादन किंवा सेवा म्हणून कशाप्रकारे सादर करता येईल याचा विचार करा. **(क्रमश:)**

## शिक्षण घ्या फलोद्यान शास्त्राचं

करिअरवाटा



फळझाडं आणि फूलझाडांची लागवड करणं, त्यांची योग्य निगा राखणं, फळा-फुलांची वेळच्या वेळी काढणी करणं, योग्य साठवणूक करणं तसंच योग्य पॅकिंग करून विक्रीस पाठवणं ही संपूर्ण प्रक्रिया अभ्यासण्याजोगी असते. या संदर्भात व्यवस्थित शिक्षण घेतल्यास फायदेशीर व्यवसाय उभा राहू शकतो.
देशातील जमिनीची उत्पादकता पूर्णपणे वापरली जावी यासाठी फलोद्यान शास्त्राचं ज्ञान असणारे लोक या व्यवसायात उतरणं गरजेचं आहे. वास्तविक आपल्या देशात फळं आणि भाज्यांच्या उत्पादनाची क्षमता प्रचंड आहे. त्यादृष्टीने फलोद्यान शास्त्राच्या अभ्यासक्रमाला भरपूर वाव आहे. हेच प्रशिक्षित विद्यार्थी वैयक्तिक किंवा सार्वजनिक बागा फुलवतात. फळे, फुले, भाज्या आणि शोभिवंत झाडांची लागवड करतात. अनेक कंपन्या, कारखाने, शाळा, महाविद्यालये परिसरात बागा लावतात. त्यांच्या देखभालीसाठी तज्ज्ञ माणूसच हवा असतो. अशा अनेक ठिकाणी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना बियांचं संकलन, झाडांची लागवड, त्यांची निगा, सजावट, झाडांवरील कीड आणि रोगांबाबत करावयाच्या उपाययोजना आदींवर काम करावं लागतं. म्हणूनच यासंदर्भातील अभ्यासक्रम पूर्ण करुन चांगल्या व्यवसायाची उभारणी करणं सहजशक्य आहे.

खेचाखेची

### डोळ्यासमोर असतं, पण...

**नवरा:** चहा पावडर कुठेय?
**बायको:** तुम्हा पुरूषांना काही काम सांगितलं ना, की जीव अगदी नकोसा करतात.
समोर वस्तू ठेवलेली असते, पण डोळ्यांना दिसत नाही.

भांडी ठेवायचं कपाट उघडा, मसाल्याच्या खणामध्ये बोर्नव्हिटाचा डबा ठेवलाय. त्यावर मीठ असं लिहीलंय. त्यात चहा पावडर आहे.

### वेगळं काही

मध्यंतरी झिंबाब्वे, नामिबिया, बोट्सवाना आणि झांबिया या देशांमध्ये हत्तींची संख्या प्रचंड वाढली होती. जगातल्या हत्तींच्या एकूण संख्येपैकी अर्ध्यापेक्षा जास्त हत्ती या देशांमध्ये होते. त्यामुळे हे देश हत्ती विकून उत्पन्न मिळवण्याच्या प्रयत्नात होते. हत्तींच्या विक्रीसाठी ग्राहक देशांचा शोधही ते घेत होते. दुबई आणि चीनने मिळून त्यावेळी झिंबाब्वेकडून ९७ हत्ती विकत घेतले होते. झिंबाब्वेला आपल्याकडचे तब्बल ३० हजार हत्ती विकायचे होते. त्यावेळी त्या देशातल्या हत्तींची संख्या जवळपास ८४ हजार इतकी होती. इच्छुक देशांनी संपर्क साधण्याचं आवाहन झिंबाब्वेने केलं होतं. या माध्यमातून मिळणारं उत्पन्न पर्यावरण रक्षणासाठी वापरण्यात येणार होतं.

## दुधाने करा सौंदर्यसाधना

फॅशन पॅशन



सध्याच्या लॉकडाउनच्या काळात सौंदर्यप्रसाधनं उपलब्ध होत नाहीत. त्यातच ब्युटी पार्लर्सही बंद आहेत. असं असलं तरी तुम्ही घरगुती साहित्यात सौंदर्यसाधना करू शकता. यात दुधाचं महत्त्वाचं स्थान आहे. दुधाचा वापर करून तुम्ही त्वचेचं सौंदर्य खुलवू शकता. दुधात प्रथिनं भरपूर प्रमाणात असतात. प्रथिनांच्या कमतरतेमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. तसंच केस गळू लागतात. म्हणूनच आहारात दूध तसंच दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करायला हवा. यासोबतच सौंदर्यप्रसाधन म्हणूनच दूध वापरता येईल.

* चेहऱ्यावरील मुरूमांची समस्या दूर करण्यासाठी दुधात थोडे मीठ घालून ते चेहऱ्याला लावा. यामुळे बराच फरक पडू शकतो. * कच्च्या दुधात थोडं गुलाबपाणी घालून चेहऱ्याला लावल्याने त्वचा उजळते. * त्वचेचं टॅनिंग किंवा काळपटपणा घालवण्यासाठी दुधात थोडा लिंबाचा आणि बटाट्याचा रस घालून मिश्रण तयार करा. हे मिश्रण चेहरा आणि हातापायांना लावून ठेवा. वाळल्यावर पुसून टाका. त्वचेचा काळपटपणा दूर होईल. * सायीत थोडी हळद घालून चेहरा आणि मानेवर चोळा. काही दिवसात त्वचा उजळलेली दिसेल.

## सुडोकू १२०


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | | | |
| | १ | ५ | | | | | ३ | |
| | | ६ | १ | ३ | | | ९ | |
| १ | | २ | ३ | | | ९ | | ८ |
| | | | २ | ८ | ७ | | | |
| ३ | | ८ | | | ९ | ७ | | ४ |
| | ३ | | | ७ | २ | ४ | | |
| | ८ | | | | | ५ | १ | |
| | | | | | | | | ६ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ X ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | ६ | ५ | ९ | १ | ८ | ३ | ४ |
| ५ | १ | ८ | ७ | ४ | ३ | ९ | २ | ६ |
| ३ | ४ | ९ | ८ | २ | ६ | १ | ७ | ५ |
| १ | ९ | ३ | २ | ६ | ७ | ४ | ५ | ८ |
| ४ | ८ | ५ | ३ | १ | ९ | २ | ६ | ७ |
| ६ | २ | ७ | ४ | ८ | ५ | ३ | ९ | १ |
| ९ | ५ | ४ | १ | ७ | २ | ६ | ८ | ३ |
| ७ | ६ | १ | ९ | ३ | ८ | ५ | ४ | २ |
| ८ | ३ | २ | ६ | ५ | ४ | ७ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १२०



**आडवे शब्द :-**
१) न्याहारी
५) पोटात होणारा एक रोग
८) श्री नरेन्द्र मोदी यांचे राज्य
११) परिस्थिती
१२) गोसावी, भटक्या मनुष्य
१४) अर्धी ओंजळ
१६) खबदाडी
१८) पातळ खांब
१९) तोंडीच्या विरुद्ध, लिहिलेले
२०) विरक्त माणूस
२१) हलविता येणारी संपत्ती
२२) तपासनीस, परीक्षा घेणारा
२५) अर्धे अंग लुळे पडणे
२६) न घाबरणारा
२७) क्रमाप्रमाणे
२९) तजवीज
३१) रममाण
३४) एक कोल्हापुरी दागिना
३५) रंग बदलणारा प्राणी
३७) निकट
३९) भाद्रपद शु.३च्या दिवशी सुवासिनी स्त्रिया पार्वतीची पूजा करतात ती
४३) अखेर
४५) कान
४६) उंट हाकणारा
४७) युक्ती
४८) काठ, बाजू
४९) फार गार वा गरम नसलेले
५१) कठोर,पांढुरकारंग
५३) हेकट, हट्टी
५५) छोटा डोंगर
५७) प्रकाशणारा किटक
५८) रोमांचक, चित्तथरारक
६०) आकडा, मांडी
६१) रसाळ
६३) गवंडी
६४) थप्पड, आघात
६६) शनीचा खडा
६८) कल्लोळ, गोंधळ, जोराचे ओरडणे
६९) शरीर
७०) पाठोपाठ, लगेच
७३) दरवाजा
७४) प्रभात
७५) बारा वर्षाचा काळ
७७) सवाद्य (मिरवणूक)
८०) एक श्वास रोग
८१) धमकी
८३) अनेक लोकांना एकत्र येणास मनाई
८५) कृष्णसखी
८७) सप्तस्वरातील पहिला स्वर
८८) जिम्मेदार
८९) वर-वधू

**उभे शब्द:-**
१) तिरंगा ध्वजावरील चिन्ह
२) जमीन खोदण्याचे एक हत्यार
३) कष्ट, त्रास
४) रस्त्यावरची वर्दळ
५) पाणी
६)व्याज आकारणीची द.सा.द.शे.पद्धतीचे पूर्ण रूप
७) दारूचा एक प्रकार
८) गुरे राखणारा
९) बस्तान, टिकाव
१०) तंबाखुचे सुगंधी चूर्ण
१३) दैववान, श्रीमंत
१५)तात्पर्यार्थ
१७) दिल्लीचे विमानतळ
२०) भिंतीतील कपाट
२२) पंख
२३) रक्त
२४) हात
२८) गौप्यस्फोट, बोलून दाखविणे
३०) कोंडा, भूस
३२) दालचिनी
३३) सोने
३४) आकार धारण करणे
३६) डावखोरा
३८) रंग
४०) निरुद्योगी
४१) बारीक कणांची दमट साखर
४२) आईवडील
४४) घोड्याची गाडी
४५) कट्टर, ठाम मताचा
४८) बडबड
५०) एकाग्र नजर
५२) कणीदार पीठ
५३) आनंद, मोद
५४) गरीबांवर दया दाखविणारा, परमेश्वर
५६) कोवळा अंकुर
५७) लबाडीचा हेतू
५८) प्रत्येक दिवशी
५९) मानवी कत्तल
६०)आतल्या बाजूचे, समाविष्ट
६२) प्रश्नोत्तर
६३) सीतापती
६५) आजच्या आधीचा दिवस
६७) बरोबर आलेला फौजफाटा
६८) कुंभाराची भट्टी
६९) चुलता
७१) महाराष्ट्राजवळचे एक चिमुकले राज्य
७२) अवस्था, स्थिती
७४) संतोष, आनंद
७६) अधिकाराचे स्थान, गीत
७८) एक रंगीत कंदमूळ
७९) त्वेष, आवेश
८०) धाक, वचक
८२) मला
८४) दुबळा, गरीब
८६) भगर

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भारतीय महिला ठरल्या चॅम्पियन

## ।। यजमान न्यूझीलंडचा उडवला धुव्वा ।। नवनीत, सुनीलिताचा विजयात मोठा वाटा




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या महिला हॉकी संघाने अंतिम फेरीच्या लढतीत यजमान न्यूझीलंड महिला हॉकी संघावर २-० असा विजय मिळवला आणि एफआयएच नेशन्स करंडकाच्या जेतेपदावर मोहर उमटवली. भारताच्या दीपिका सहरावत हिने या स्पर्धेमध्ये सर्वाधिक सहा गोल करीत धमक दाखवली. भारताचे हे दुसरे नेशन्स कप विजेतेपद आहे, यापूर्वी त्यांनी २०२२ मध्ये या स्पर्धेचे पहिले विजेतेपद पटकावले होते.

महाराष्ट्रातील साताऱ्याच्या ऋतुजा पिसाळ हिने या स्पर्धेत शानदार कामगिरी करीत अजिंक्यपदात मोलाचा वाटा उचलला.

जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या भारताने १० व्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडला हरवले. या सामन्यात नवनीत कौर आणि सुनीलिता टोप्पो यांनी गोल करून भारताला विजेतेपद मिळवून दिले.

अंतिम सामन्यात लालरेम्सियामी हमारजोतेला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार मिळाला, तर दीपिकाने सहा गोल करून अमेरिकेच्या श्ले सेसासोबत संयुक्तपणे सर्वाधिक गोल करण्याचा मान मिळवला.

अनुभवी स्ट्रायकर नवनीत कौरने सामन्यातील पहिला पेनल्टी कॉर्नर गोलमध्ये रूपांतरित करून पहिल्या पाच मिनिटांतच भारताला आघाडी मिळवून दिली. सुरुवातीला आघाडी घेतल्यानंतर, भारतीय महिला हॉकी संघाने उत्कृष्ट कामगिरी केली आणि पहिल्या क्वार्टरमध्ये आणखी चार पेनल्टी कॉर्नर मिळवले, त्यापैकी शेवटचा त्यांचा पहिला पेनल्टी कॉर्नर होता. सुनीलिता टोप्पोने ड्रॅग-फ्लिकवर मिळालेल्या अप्रतिम डिफ्लेक्शनचा फायदा घेत चेंडू गोलमध्ये टाकला आणि भारताला दोन गोलची आघाडी मिळवून दिली.भारताने पहिल्या क्वार्टरमध्ये पूर्णपणे वर्चस्व गाजवले, प्रतिस्पर्धी संघाच्या सर्कलमध्ये आठ वेळा प्रवेश केला आणि एकूण पाच पेनल्टी कॉर्नर मिळवले.

पाहुण्या संघाने दुसऱ्या क्वार्टरची सुरुवात आक्रमकपणे केली. पण सलीमा टेटे आणि तिच्या संघाने खेळावर नियंत्रण मिळवले. भारताने पहिल्या हाफच्या अखेरपर्यंत २-० अशी आघाडी कायम ठेवली. न्यूझीलंडने तिसऱ्या क्वार्टरमध्येही आक्रमण सुरू ठेवले आणि सामन्यात पुनरागमन करण्यासाठी अधिक आक्रमकपणे खेळ केला. पण, भारतीय बचावफळीने प्रतिस्पर्धी संघाला कोणतीही संधी दिली नाही, ज्यामुळे गोलरक्षक बिचू देवी खारीबामला फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत. चौथ्या क्वार्टरच्या सुरुवातीला;ब्लॅक स्टिक्स;ला सामन्यातील पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. पण त्यांना या संधीचे सोने करता आले नाही. अखेरीस भारताने हा सामना २-० ने जिंकला.

### भारतीय संघाचा लागणार कस

अंतिम सामन्यातील विजयासोबतच पुढील हंगामात भारतीय महिला संघाचे एफआयएच हॉकी महिला प्रो लीगमध्ये पुनरागमनही झाले. अंतिम सामन्यात लालरेम्सियामीने प्लेअर ऑफ द मॅचफ पुरस्कार मिळवला, तर दीपिकाने सहा गोलांसह स्पर्धेत संयुक्तपणे सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा मान मिळवला.

एफआयएच नेशन्स कप जिंकल्यामुळे भारताला २०२६-२७ हंगामासाठी एफआयएच प्रो लीगमध्ये पुन्हा बढती मिळाली. ही स्पर्धा हॉकीसाठी लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिक पात्रता फेरी म्हणूनही काम करेल. प्रो लीगच्या २०२४-२५ हंगामात गुणतालिकेत तळाशी राहिल्यामुळे भारतीय संघाला एफआयएच नेशन्स कपमध्ये सहभागी होण्यास भाग पडले. न्यूझीलंड एफआयएच महिला नेशन्स कपची गतविजेती होती. त्यांनी मागील स्पर्धा जिंकली होती. पण उपविजेत्या आयर्लंडला आपले स्थान देऊन प्रो लीगमध्ये बढती नाकारली होती. एफआयएच नेशन्स कप २०२६ मध्ये भारत अजिंक्य राहिला. संघाने प्रथम अमेरिका, जपान आणि उरुग्वे यांच्यावर प्रत्येकी एका गोलने विजय मिळवून आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर उपांत्य फेरीत चिलीला ६-० ने पराभूत करून त्यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

# निवडक

## नागोठण्यातील खेळाडू महाराष्ट्राच्या संघात



**नागोठणे :** पिंच्याक सिलाट हा इंडोनेशियन मार्शल आर्ट्स खेळ आहे हा खेळ ५ प्रकारात खेळला जातो. १४ व्या ज्युनिअर राष्ट्रीय पिंचाक सिलाट स्पर्धा स्पर्धा दिनांक २५ ते २८ जून २०२६ रोजी नाशिक येथे होणार आहेत. या स्पर्धेचे विशेष म्हणजे रायगड जिल्यातील नागोठणे विभागातील १० खेळाडूंची या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये नागोठणे शहरातील श्रीयश शेडगे, जय गोळे, जय कुलकर्णी, शिवशांत सारगे, प्रांजळ खारपुडे, अनिश पालकर, रियांश सारले (वरवठणे), शौर्य धसाडे (वणी), राकेश पवार (वेलशेत) व प्रीत माळी (आंबेघर) या दहा खेळाडूंचा समावेश आहे. निवड झालेल्या या खेळाडूंना प्रशिक्षक मास्टर धनंजय जगताप यांचे विशेष मार्गदर्शन लागले आहे. निवड झालेल्या या खेळाडूंचे सर्व स्तरांवर कौतूक होत आहे.

## कोलंबियाची बाद फेरीत मुसंडी

**ग्वादालाहारा :** फिफा विश्वचषक स्पर्धेत 'ग्रुप के'मधील एका चुरशीच्या सामन्यात कोलंबियाने डीआर काँगोचा १-० असा पराभव केला. या विजयासह कोलंबियाने बाद फेरीतील आपले स्थान पक्के केले आहे. एस्टाडिओ ग्वादालाहारा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात क्रिस्टल पॅलेसचा स्टार खेळाडू डॅनिएल मुनोझ याने उत्तरार्धात केलेला गोल सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. कोलंबियाच्या संघाने गोल करण्यासाठी तब्बल २० पेक्षा अधिक सातत्याने प्रयत्न केले. मात्र, डीआर काँगोचा गोलरक्षक लायोनेल म्पासी याने गोलपोस्टसमोर भिंतीसारखे उभे राहत कोलंबियाचे अनेक प्रयत्न हाणून पाडले. म्पासीने सामन्याच्या पहिल्या २० मिनिटांतच ५ उत्कृष्ट सेव्हज केले. १९९८ च्या विश्वचषकात जमैकाच्या वॉरन बॅरेटने अर्जेंटिनाविरुद्ध केलेल्या कामगिरीनंतर, पहिल्या २० मिनिटांत ५ सेव्हज करणारा म्पासी हा पहिलाच गोलरक्षक ठरला..कोलंबियाच्या सातत्यपूर्ण आक्रमणामुळे सामन्याच्या ७६ व्या मिनिटाला अखेर त्यांना यश आले. मुनोझने मारलेला एक वेगवान शॉट काँगोच्या बचावपटूला लागून (डिफ्लेक्ट होऊन) थेट जाळ्यात गेला. या गोलरक्षकाकडे हा चेंडू रोखण्यासाठी कोणतीही संधी नव्हती. या संपूर्ण स्पर्धेत मुनोझचा हा दुसरा वैयक्तिक गोल आहे. डीआर काँगोला अद्यापही बाद फेरीत पोहोचण्याची अपेक्षाया पराभवानंतरही डीआर काँगोचे स्पर्धेतील आव्हान अद्याप संपलेले नाही. रविवारी होणाऱ्या सामन्यात जर त्यांनी उझबेकिस्तानचा पराभव केला, तर तेही बाद फेरीत प्रवेश करू शकतात. विशेष म्हणजे, काँगोने आपल्या गटात तिसरे स्थान मिळवले आणि दुसऱ्या गटात थॉमस टुचेल यांच्या मार्गदर्शनाखालील इंग्लंडचा संघ अव्वल राहिला, तर अंतिम ३२ च्या फेरीत इंग्लंड आणि डीआर काँगो आमनेसामने येऊ शकतात.



## कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये अभिजितचे यश

**रत्नागिरी :** जगप्रसिद्ध आणि अत्यंत कठीण अशा ९० किमीच्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये रत्नागिरीच्या अभिजित पड्याळ यांनी झेंडा रोवला. सकाळी सुरू झालेल्या या मॅरेथॉनमध्ये ९ तास ५१ मिनिटे धावून त्यांनी ही मॅरेथॉन पूर्ण केली आहे. पड्याळ यांनी या स्पर्धेत प्रथमच भाग घेतला असून त्यांनी फिनिश लाइन पूर्ण केल्याचे ऑनलाइन माध्यमातून समजल्यानंतर रत्नागिरीत जल्लोष करण्यात आला. दर्बान ते पीटरमॅरिट्झबर्ग दरम्यान अत्यंत खडतर अशा मार्गावर ही मॅरेथॉन झाली. पड्याळ हे सुवर्णसूर्य फाऊंडेशनचे संस्थापक संचालक प्रसाद देवस्थळी यांच्यासोबत स्पर्धेत उतरले होते. सुवर्णसूर्य फाऊंडेशन, रत्नागिरी सायकलिस्ट क्लब, टीम कोकण कोस्टल व टीम गणपतीपुळे अल्ट्रा मॅरेथॉन यांच्या माध्यमातून अभिजित पड्याळ यांचे अभिनंदन करण्यात आले. रत्नागिरीत होणाऱ्या कोकण कोस्टल व गणपतीपुळे अल्ट्रा मॅरेथॉन या स्पर्धांसाठी दक्षिण आफ्रिकेत आलेल्या हजारो धावपटूंना येण्याचे निमंत्रण देण्यात आले असून पुढच्या काही वर्षांत जगभरातील स्पर्धक येऊ लागतील, असा विश्वास सुवर्णसूर्य फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.




## यूएस ओपन बॅडमिंटनचे सेनकडे नेतृत्व

**वॉशिंग्टन :** यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत अनुभवी लक्ष्य सेन आणि उदयोन्मुख खेळाडू तन्वी शर्मा भारताचे नेतृत्व करतील. पुरुष गटात किदाम्बी श्रीकांतसह इतर अनेक भारतीय बॅडमिंटनपटू एकेरी स्पर्धेत आपले नशीब आजमावतील. महिला एकेरी स्पर्धेत एकूण सात भारतीय बॅडमिंटनपटू सहभागी होतील. लक्ष्य सेनला या स्पर्धेत दुसरे मानांकन असून पहिल्या फेरीत त्याचा सामना बेल्जियमच्या ज्युलियन कॅरेगीशी होईल. या महिन्याच्या सुरुवातीला इंडोनेशिया ओपनमध्ये पहिल्याच फेरीत बाहेर पडल्यानंतर, लक्ष्य पुनरागमन करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. श्रीकांत पुरुष एकेरीतील आपला पहिला सामना चायनीज तैपेईच्या लियाओ झुओ-फू विरुद्ध खेळेल. आणखी एक भारतीय बॅडमिंटनपटू सनिथ दयानंद, जपानच्या चौथ्या मानांकित युदाई ओकिमोतो विरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. एस. शंकर मुथुसामी सुब्रमण्यन यांनीही मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले असून त्यांचा सामना एका पात्रता फेरीतून आलेल्या बॅडमिंटनपटूशी होईल. महिला एकेरीमध्ये, पाचवी मानांकित तन्वी शर्मा आणि सहावी मानांकित देविका सिहाग सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या प्रयत्नात असतील. त्या अनुक्रमे जागतिक क्रमवारीत ३२ व्या आणि ३४ व्या स्थानावर आहेत. १७ वर्षीय तन्वी जर्मनीच्या इव्हॉन ली विरुद्ध आपला पहिला सामना खेळेल, तर देविकाचा सामना पेरूच्या इनेस लुसिया कॅस्टिलो सालाझारशी होईल. महिला दुहेरीमध्ये त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद भारताचे प्रतिनिधित्व करतील.

## इंग्लंडच्या उपांत्य फेरीत प्रवेश



। लंडन । वृत्तसंस्था ।

इंग्लंडने वेस्ट इंडिजला ३८ धावांनी पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. यजमान संघ सध्या सुरू असलेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. गट २ च्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने २० षटकांत सात गडी गमावून १८६ धावा केल्या, तर वेस्ट इंडिजला २० षटकांत पाच गडी गमावून केवळ १४८ धावाच करता आल्या. डॅनी वायट-हॉजचे शानदार अर्धशतक आणि गोलंदाजांच्या शिस्तबद्ध कामगिरीने इंग्लंडच्या विजयाचा पाया रचला. सामना जिंकून देणाऱ्या ६५ धावांच्या खेळीसाठी वायट-हॉजला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. नाणेफेकीनंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या इंग्लंडची सुरुवात डळमळीत झाली. एमी जोन्स लवकर बाद झाली, पण डॅनी वायट-हॉजने सूत्रे हाती घेतली. तिने अनेक प्रभावी चौकारांसह ४२ चेंडूंमध्ये ६५ धावा केल्या.

नाईटने ४३ धावांची वेगवान खेळी केली. या दोघींनी मधल्या फळीत महत्त्वपूर्ण भागीदारी रचून संघाला मजबूत स्थितीत आणले. ऑफ-स्पिनर अश्विनी मुनिसार वेस्ट इंडिजसाठी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली, तिने चार षटकांत ४२ धावा देऊन दोन बळी घेतले. १८७ धावांचे लक्ष्य गाठताना, कर्णधार हेली मॅथ्यूजच्या रूपाने वेस्ट इंडिजला मोठा धक्का बसला. मॅथ्यूज १४ धावांवर बाद झाली.

इंग्लंडच्या फिरकी गोलंदाजांनी नियमित अंतराने बळी घेत सामन्यावर नियंत्रण ठेवले. चार्ली डीनने दोन बळी घेऊन वेस्ट इंडिजचा धावगतीचा वेग कमी केला. सोफी एक्लेस्टोन आणि लिन्सी स्मिथ यांनीही किफायतशीर गोलंदाजी केली. वेगवान गोलंदाज लॉरेन बेलनेही एक महत्त्वपूर्ण बळी घेतला. मधल्या फळीत, चिनेल हेन्री आणि जहझारा क्लॅक्स्टन यांनी झुंजार खेळी करत पाचव्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी केली. हेन्रीने नाबाद ५१ धावा केल्या, पण तिला दुसऱ्या टोकाकडून साथ मिळाली नाही. अखेरीस, वेस्ट इंडिजला त्यांच्या निर्धारित २० षटकांत केवळ १४८/५ धावांपर्यंतच मजल मारता आली, ज्यामुळे इंग्लंडला ३८ धावांनी सामना जिंकता आला

## सेरेना विल्यम्स विम्बल्डनसाठी सज्ज

। लंडन । वृत्तसंस्था ।

अमेरिकन टेनिसपटू सेरेना विल्यम्स पुन्हा एकदा ग्रँडस्लॅम स्पर्धेत पुनरागमन करण्यास सज्ज झाली आहे. २३ वेळा ग्रँडस्लॅम विजेत्या ठरलेल्या सेरेनाला विम्बल्डन २०२६ च्या एकेरी स्पर्धेसाठी अंतिम वाइल्डकार्ड देण्यात आले आहे. जवळपास चार वर्षांनंतर मोठ्या स्पर्धेत एकेरीतील हा तिचा पहिलाच सहभाग आहे. सेरेनाला तिची मोठी बहीण, व्हीनस विल्यम्ससोबत दुहेरी स्पर्धेसाठी आधीच वाइल्डकार्ड मिळाले होते. सात वेळा विम्बल्डन चॅम्पियन राहिलेल्या सेरेनाने या प्रतिष्ठित स्पर्धेत शेवटचा सहभाग २०२२ मध्ये घेतला होता. ती पहिल्याच फेरीत फ्रेंच टेनिसपटू हार्मोनी टॅनकडून पराभूत झाली होती. त्याच वर्षी अमेरिकन ओपनमधील तिचा प्रवास तिसऱ्या फेरीतच संपला होता. त्यावेळी, सेरेनाने टेनिसमधून निवृत्तीची घोषणा केली नव्हती, ती या खेळात एका नवीन टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे म्हटले होते. गेल्या वर्षी तिने डोपिंगविरोधी चाचणी कार्यक्रमात पुन्हा प्रवेश केल्यानंतर, तिच्या पुनरागमनाबद्दलच्या चर्चा वाढल्या होत्या. तसेच तिने कॅनेडियन युवा टेनिसपटू व्हिक्टोरिया म्बोकोसोबत महिला दुहेरित खेळत टेनिस कोर्टवर पुनरागमन केले. त्यानंतर तिने चेक प्रजासत्ताकची टेनिसपटू कॅरोलिना मुचोव्हासोबत दुहेरी स्पर्धेतही भाग घेतला. आता सर्वांच्या नजरा विम्बल्डनवर असतील, जिथे सेरेना पुन्हा एकदा एकेरीच्या कोर्टवर उतरेल आणि आपल्या शानदार कारकिर्दीत एक नवीन अध्याय सुरु करण्याचा प्रयत्न करेल. या वर्षीची विम्बल्डन स्पर्धा २९ जून ते १२ जुलै दरम्यान होणार आहे.



## बॅडमिंटनमध्ये नॉकआऊट वॉरियर्स विजयी

**नाशिक :** निवेकच्या बॅडमिंटन कोर्टवर २ ऱ्या निवेक विमेन्स बॅडमिंटन लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नॉकआउट वॉरियर्स संघाने अंतिम लढतीत फेव्हर्स फ्युरिज संघावर विजय मिळवत विजेतेपद मिळविले. राऊंड रॉबिन पद्धतीने खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत सर्व सामने दुहेरी प्रकारात खेळविले गेले. चुरशीच्या खेळल्या गेलेल्या अंतिम लढतीत २-२ अशा बरोबरीनंतर नॉकआउट वॉरियर्सच्या जोडीने चांगला समन्वय साधत हा निर्णायक सेट २१- १७ असा जिंकून या स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावे केले. या स्पर्धेत चार संघांनी सहभाग नोंदवला प्रत्येक संघामध्ये १६ वर्षे वयोगटापासून ते ६१ वर्षे वयोगटांच्या खेळाडूंचा समावेश होता. विजेत्या संघातील खेळाडूंना शर्मिला कुलकर्णी, नितीन धात्रक, नितीन वागस्कर, गौरव धारकर, पराग एकांडे, अमित राजपूत यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## बॉब ब्लेअर यांचे निधन

**लंडन :** न्यूझीलंडचे माजी वेगवान गोलंदाज बॉब ब्लेअर यांचं इंग्लंडमध्ये निधन झाले. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने ब्लेअर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या स्मरणार्थ, न्यूझीलंड संघ नॉटिंगहॅम इथे इंग्लंड विरुद्धच्या तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी हातावर काळी पट्टी बांधणार आहे. १९५२ ते १९६४ दरम्यान न्यूझीलंडसाठी १९ कसोटी सामने खेळलेल्या ब्लेअर यांनी ४३ बळी घेतले. देशांतर्गत क्रिकेटमधील त्यांची कामगिरी तर त्याहूनही प्रभावी होती, जिथे त्यांनी ५९ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये ३३० बळी घेतले. १९५६-५७ चा हंगाम त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय ठरला, जेव्हा त्यांनी केवळ ९ च्या सरासरीने ४६ बळी घेतले होते.

## भारताचा टेनिस संघ जाहीर



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अखिल भारतीय टेनिस संघटनेने जपानमध्ये होणाऱ्या २०व्या आशियाई खेळांसाठी भारतीय टेनिस संघाची घोषणा केली आहे. पुरुष गटातील भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागल आणि महिला गटातील अव्वल टेनिसपटू सहजा यमलपल्ली भारतीय संघाचे नेतृत्व करतील. अध्यक्ष नंदन बल यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने पुरुष आणि महिला गटांसाठी प्रत्येकी सहा टेनिसपटूंचा संघ निवडला आहे. आशियाई खेळांमध्ये भारताची दमदार कामगिरी सुनिश्चित करण्यासाठी या संघात अनुभवी खेळाडूंसोबतच तरुण प्रतिभावान टेनिसपटूंचाही समावेश आहे. भारतीय पुरुष संघात एकेरी गटासाठी सुमित नागल (जागतिक क्रमवारी २७७), मानस धामणे (३७८) आणि दक्षिणेश्वर सुरेश (४७८) यांची निवड झाली आहे. दुहेरीतील विशेषज्ञ युकी भांब्री (जागतिक क्रमवारी २४), एन. श्रीराम बालाजी (६१) आणि अनिरुद्ध चंद्रशेखर (९०) यांची संघात निवड झाली आहे. राखीव टेनिसपटूंमध्ये करण सिंग, ऋत्विक बोलिपल्ली आणि निकी कालियांडा पूनाचा यांचा समावेश आहे. महिलांच्या गटात, भारताची अव्वल टेनिसपटू सहजा यमलापल्ली (जागतिक क्रमवारी ३३२), तसेच वैष्णवी अडणकर (३९६) आणि वैदेही चौधरी (४१७) यांची एकेरीसाठी निवड झाली आहे. दुहेरीच्या संघात ऋतुजा भोसले (१२५), प्रार्थना थोंबरे (१८१) आणि अंकिता रैना (१८५) यांचा समावेश आहे. राखीव टेनिसपटूंमध्ये जिल देसाई आणि श्रुती अहलावत यांचा समावेश आहे.२० वे आशियाई खेळ या नावाने १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जपानमधील आयची आणि नागोया येथे आयोजित केले जातील. भारतीय टेनिस संघटनेने निवड झालेल्या टेनिसपटूंना शुभेच्छा दिल्या असून त्यांच्या तयारीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

## साई सुदर्शनचे धमाकेदार शतक

। कोलंबो । वृत्तसंस्था ।

अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यात मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरलेल्या साई सुदर्शनने श्रीलंका अ संघाविरुद्धच्या अनौपचारिक कसोटी सामन्यात शानदार पुनरागमन केले आहे. सुदर्शनने अप्रतिम फलंदाजीचे प्रदर्शन करत शानदार शतक झळकावले असून, आपण सध्या उत्तम फॉर्ममध्ये असल्याचे त्याने दाखवून दिले आहे. विशेष म्हणजे कसोटी सामना असूनही सुदर्शनने एकदिवसीय सामन्याच्या शैलीत वेगाने धावा कुटल्या.

ऋतुराज आणि पडिक्कल अपयशीभारत अ संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर असून, आजपासून उभय संघांतील पहिल्या अनौपचारिक कसोटी सामन्याला सुरुवात झाली आहे.

सामन्याच्या पहिल्याच दिवशी भारताकडून साई सुदर्शन आणि आयुष पांडे यांनी डावाची सुरुवात केली. मात्र, आयुष पांडे अवघ्या २५ धावांवर बाद झाला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलला केवळ १२ धावा करता आल्या. कर्णधार रुतुराज गायकवाडने खेळपट्टीवर काही वेळ तग धरला, परंतु तोदेखील २२ धावांवर बाद झाला. एका बाजूने ठराविक अंतराने विकेट्स पडत असतानाही, साई सुदर्शनने दुसरी बाजू खंबीरपणे लावून धरली. त्याने प्रथम आपले अर्धशतक आणि त्यानंतर दिमाखात शतक पूर्ण केले. १३० चेंडूंत १४ चौकारांसह सुदर्शनचे शतकसाई सुदर्शनने या डावात अत्यंत आक्रमक पवित्रा घेत अवघ्या १३० चेंडूंमध्ये आपले शतक साजरे केले. या खेळीत त्याने १४ नेत्रदीपक चौकार ठोकले. ही खेळी पारंपरिक कसोटीच्या बचावात्मक शैलीला छेद देणारी आणि एकदिवसीय सामन्याची आठवण करून देणारी होती.

## एकदिवसीय विश्वचषक विजयाला ४३ वर्षे पूर्ण | इंडिजचा पराभव करून सर्वांचे अंदाज ठरवले खोट

# भारतीय क्रिकेटचा सुवर्ण दिवस

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या १९८३ च्या एकदिवसीय विश्वचषकातील ऐतिहासिक विजयाला ४३ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा एक असा ऐतिहासिक क्षण होता ज्याने भारतीय क्रिकेटचे चित्रच बदलून टाकले. कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली, २५ जून १९८३ रोजी लॉर्ड्सवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य वेस्ट इंडिजचा पराभव करून सर्वांचे अंदाज खोटे ठरवले आणि अनपेक्षित विजय मिळवला. हा विजय अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. या विजयाने क्रिकेटला देशातील एक प्रचंड लोकप्रिय खेळ बनवले आणि जागतिक क्रिकेटमध्ये भारताच्या वर्चस्वाची पायाभरणी केली.



कपिल देव यांच्या संघाने विजेतेपद मिळवताना, त्या स्पर्धेत विजेतेपदाचे प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या वेस्ट इंडिजवर अविश्वसनीय विजय संपादन केला. १९७५ आणि १९७९ च्या विश्वचषकात भारताची कामगिरी निराशाजनक होती आणि संघ साखळी फेरीच्या पुढे जाऊ शकला नव्हता. मात्र, त्यानंतरच्या या मोठ्या स्पर्धेत (१९८३) भारताने आपल्या प्रभावी कामगिरीने क्रिकेट विश्वाला चकित केले.

१९८३ चा वनडे विश्वचषक ६० षटकांचा खेळला गेला. अंतिम सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिज आमनेसामने होते. वेस्ट इंडिजने त्यापूर्वी झालेले दोन्ही विश्वचषक जिंकले होते, त्यामुळे भारतासाठी सामना सोपा नव्हता. १९८३ पूर्वी १९७५ आणि १९७९ चा विश्वचषक खेळला गेला होता. या दोन्ही स्पर्धांमध्ये भारतानं फक्त एकच सामना जिंकला होता. वेस्ट इंडिज पहिल्या दोन विश्वचषकांचा विजेता होता आणि तिसऱ्या हंगामातही विजयाचा प्रबळ दावेदार होता. असे असतानाही भारताने सर्वांना आश्चर्यचकित करुन स्पर्धा जिंकली. या विश्वचषकानंतर भारतातील क्रिकेटचा चेहरामोहराच बदलला आहे.

### १८३ धावांचा बचाव

अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना १८३ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून अँडी रॉबर्ट्सने ३ विकेट घेतल्या. माल्कम मार्शल, मायकेल होल्डिंग यांनी प्रत्येकी २-२ विकेट घेतल्या.इंडिजच्या आक्रमक फलंदाजीसमोर हे सोपे लक्ष्य वाटत होते. परंतु, कॅरेबियन संघ १४० धावांवर ऑलआउट झाला. भारताने सामना ४३ धावांनी जिंकला आणि विजेतेपद पटकावत नवा इतिहास लिहिला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)